सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित


सोलापूर | मंगळवार, १२ ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २७४ । पाने १२ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



नि आजूबाजूला लक्ष विचलित करणाऱ्या हजारो गोष्टींपासून स्वत:ला वेगळं ठेवून केवळ पवित्र उद्देशासाठी कार्य करीत राहायला हवे. स्वत: समुद्रात दीपस्तंभासारखे उभे राहून कोट्यवधी समाजबांधवांना मार्ग दाखवावा. असे अनेक संघ कार्यकर्ते देशाचे चित्र बदलवू शकतात.

**प्रा. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# पाकिस्तानच्या धमक्यांना मोजत नाही

## भारताने जनरल आसिम मुनीर, ट्रम्प यांना सुनावले ● पहिल्यांदाच मित्रदेशाच्या भूमीवरून धमक्या

### अमेरिकेच्या मदतीमुळेच चिथावणीखोर वक्तव्ये



◆ **नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

पाकिस्तानी लष्करप्रमुख आसिम मुनीरने अमेरिकेच्या भूमीवरून दिलेल्या अण्वस्त्रांच्या धमकीवर भारताने अतिशय कठोर प्रतिक्रिया व्यक्त केली. धमक्या देणे पाकिस्तानची नेहमीचीच सवय आहे. आम्ही अशा धमक्यांना काडीचीही किंमत देत नाही. जेव्हा जेव्हा अमेरिकेची मदत मिळते तेव्हा पाकिस्तान उड्या मारत असतो, अशा शब्दात जनरल मुनीर आणि डोनाल्ड ट्रम्प यांना खडसावले. तसेच पहिल्यांदाच मित्रदेशाच्या भूमीवरून धमक्या देण्यात आल्या, असा आरसा भारताने अमेरिकेला दाखवला.

अमेरिकेत दिलेल्या भाषणादरम्यान पाकिस्तानचे लष्करप्रमुख आसिम मुनीर यांनी भारताला दिलेल्या अण्वस्त्रांच्या धमकीवर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने कठोर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. मुनीर यांचे वक्तव्य बेजबाबदार असून, पाकिस्तान प्रादेशिक आणि जागतिक सुरक्षा कशाप्रकारे धोक्यात टाकत आहे, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. अमेरिकेचा पाठिंबा मिळताच पाकिस्तानी लष्कर खरे रंग दाखवते, अशी टीका भारताने केली.

मुनीर सध्या अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत. भारताकडून कोणताही धोका निर्माण झाल्यास पाकिस्तान अर्धे जग खाली खेचेल. आम्ही अण्वस्त्रधारी आहोत. बुडत असल्याचे लक्षात आल्यास, आम्ही आपल्यासोबत अर्धे जग घेऊ, असे मुनीर यांनी रविवारी झालेल्या रात्रीभोज कार्यक्रमात म्हटले होते.

मुनीर यांना उत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, शेजारील देशाच्या कृती केवळ प्रादेशिकच नव्हे, तर जागतिक सुरक्षेसाठीही धोका निर्माण करणाऱ्या आहेत, ज्यामुळे जगाला पाकिस्तानच्या अणुक्षमतेबद्दल चिंता करण्याचे कारण मिळाले आहे.

पाकिस्तानी लष्करप्रमुखांनी पुन्हा एकदा अण्वस्त्रांच्या संदर्भात अत्यंत बेजबाबदार वक्तव्य केले आहे. पाकिस्तान केवळ प्रादेशिकच नव्हे, तर जागतिक सुरक्षाही कशाप्रकारे धक्यात आणत आहे, हे जगाला पाहायचे आहे. पाकिस्तानकडील अण्वस्त्रांबाबत चिंता करण्याचे कारण लोकांकडे आहे, असे मंत्रालयाने सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

### अण्वस्त्रे चुकीच्या हाती पडण्याचा धोका

पाकिस्तानी लष्कराला अमेरिकेचा पाठिंबा मिळतो, त्यावेळी पाकिस्तानी लष्कर नेहमी त्यांचे खरे रंग दाखवते आणि हीच त्यांची नेहमीची पद्धत आहे. पाकिस्तानात लोकशाही अस्तित्वात नसल्याचा हा सर्वांत मोठा संकेत आहे. त्याऐवजी या देशावर लष्कराचे नियंत्रण आहे. त्यामुळे पाकिस्तानी अण्वस्त्रे चुकीच्या हाती पडण्याचा खरा धोका असल्याचे मंत्रालयाने सांगितले. ■

# झेलेन्स्कींनी केली मोदींसोबत चर्चा

## लवकरच भारत दौऱ्यावर येण्याची शक्यता

◆ **नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**



युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत दूरध्वनीवर चर्चा केली. याबाबतची माहिती त्यांनी 'एक्स'वर पोस्ट करीत दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत दीर्घ आणि महत्त्वपूर्ण चर्चा झाली. यात द्विपक्षीय सहकार्य, भूराजकीय परिस्थितीवर तपशीलवार चर्चा केली, असे झेलेन्स्की यांनी एक्सवर म्हटले आहे.

युक्रेनच्या नागरिकांना दिलेल्या पाठिंब्याबाबत झेलेन्स्की यांनी मोदींचे आभार व्यक्त केले. रशियाने अलीकडे केलेल्या हल्ल्यांबाबतची माहिती मोदींना दिली. विशेषतः जापोरिझिया येथील बस स्थानकावर झालेल्या हल्ल्याची माहिती देण्यात आली. यात कित्येक लोक जखमी झाले होते. युद्ध संपुष्टात येण्याची शक्यता दिसत असताना रशियाला आक्रमकपणा तसेच हत्यासत्र कायम ठेवण्याची इच्छा असल्याचा आरोप झेलेन्स्की यांनी केला.

**नरेंद्र मोदी यांना युक्रेनला येण्याचे निमंत्रण**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सप्टेंबरमध्ये होणाऱ्या आमसभेला हजर राहण्याची तयारी दोन्ही देशांच्या नेत्यांना दर्शवली आहे. युक्रेनला येण्याबाबत नरेंद्र मोदी यांनी निमंत्रण दिले. त्यांनीही भारत भेटीचे निमंत्रण दिले. दोन्ही नेत्यांनी यावर सहमती दर्शवली. ◀(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### वरूणराजाच्या कृपादृष्टीने सोलापूरकर सुखावले...

**सोलापूर** : यंदाच्या वर्षी वरूणराजाने सोलापूर शहर आणि जिल्ह्यावर खूप मेहरबानी केली असून मे महिन्यापासून सोलापूरला चांगला पाऊस पडत आहे. सोलापूरचे वरदायिनी उजनी धरण यंदा वेळपूर्वीच भरलेले आहे. तर यंदा वेळेवर पडलेल्या पावसामुळे खरिपाच्या पिकाचा बहर आहे. उजनी धरणासह जिल्ह्यातील अनेक प्रकल्पांमध्ये समाधानकारक पाणीसाठा असल्याने बळीराजासह सोलापूरकरांची चिंता मिटल्याने समाधान व्यक्त होत आहे.

### जुनी पेन्शन पुनरुज्जीवित करण्याचा प्रस्ताव नाही

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय पेन्शन प्रणाली अंतर्गत (एनपीएस) येणाऱ्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेनेशन योजना (ओपीएस) पुनरुज्जीवित करण्याचा कोणताही प्रस्ताव भारत सरकारच्या विचाराधीन नाही, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सोमवारी संसदेत दिली. सरकारी तिजोरीवरील भार आणि अस्थिर आर्थिक दायित्वामुळे सरकार जुन्या पेन्शन योजनेपासून दूर गेले आहे, असे निर्मला सीतारामन् यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. एनपीएस ही एक परिभाषित योगदानआधारित योजना आहे, जी १ जानेवारी २००४ रोजी किंवा त्यानंतर सेवेत रुजू होणाऱ्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी (सशस्त्र दल वगळता) सुरू करण्यात आली होती. गळता) सुरू करण्यात आली होती. अशा कर्मचाऱ्यांना पेन्शनरी फायदे सुधारण्याच्या उद्देशाने, एनपीएसमध्ये बदल करण्यासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी अर्थ सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती.

### मेधा पाटकर प्रकरणात हायकोर्टाचा निर्णय कायम

**नवी दिल्ली** : दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी दाखल केलेल्या २५ वर्षांपूर्वीच्या मानहानीच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी मेधा पाटकर यांच्याबाबत उच्च न्यायालयाने दिलेला आदेश कायम ठेवला. दिल्ली उच्च न्यायालयाने मेधा पाटकर यांना चांगल्या वर्तणुकीच्या हमीवर सोडण्याचा आदेश दिला होता. मात्र, दर तीन वर्षांनी एक वेळा सत्र न्यायालयासमोर हजर राहण्यास सांगितले होते. न्या. एम. एम. सुंदरेश आणि न्या. एन. कोटिश्वरसिंह यांच्या न्यायासनाने या निर्णयात हस्तक्षेप करणार नसल्याचे स्पष्ट केले. मात्र, याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सादर केलेले म्हणणे विचारात घेऊन लावलेला दंड रद्द करण्यात आला आहे आणि आम्ही यापुढे स्पष्ट करतो की, देखरेखीचा आदेश लागू होणार नाही, असेही आदेशात म्हटले आहे.

### भटक्या कुत्र्यांना निवाऱ्यात ठेवा : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली** : दिल्ली, राष्ट्रीय राजधानी परिसर अर्थात् एनसीआरमधील भटके कुत्रे रस्त्यांवरून हटवून त्यांना आश्रयगृहांमध्ये ठेवा, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली-एनसीआर प्रशासनाला दिला आहे. हे कुत्रे पुन्हा रस्त्यांवर येता कामा नये, असा इशाराही न्यायालयाने दिला आहे. भटक्या कुत्र्यांचे चावे अत्यंत भयंकर असल्याचे स्पष्ट करीत न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. आर. महादेवन यांनी काही कठोर निर्देश दिले. या काम ात कोणतीही व्यक्ती किंवा संघटनेने अडथळा निर्माण केल्यास न्यायालयीन अवमाननेचे प्रकरण सुरू केले जाऊ शकते, असे स्पष्ट केले.

# निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर विरोधकांचा मोर्चाचा प्रयत्न

## राहुल गांधी, प्रियांका वढेरांसह विरोधी खासदारांना अटक

◆ **नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**



मतदार यादीतील कथित घोटाळ्याच्या मुद्यावरुन विरोधी पक्षांनी आज संसद भवनातून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्यांचा हा प्रयत्न हाणून पाडला. मोर्चा काढणाऱ्या विरोधी पक्षांच्या खासदारांना पोलिसांनी नंतर अटक केली.

काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचे सदस्य आज नवीन संसदभवनातील मकरद्वारासमोर एकत्र आले, आणि तेथून घोषणा देत ते मोर्चाने निवडणूक आयोगाच्या कार्यालयाकडे निघाले. मोर्चाचे नेतृत्व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार आणि समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव आणि अन्य नेते करत होते. या मोर्चात विरोधी पक्षांचे संसदेच्या दोन्ही सभागृहातील खासदार सहभागी झाले होते.

विरोधी पक्षांच्या सदस्यांच्या हातात विशेष मतदार यादी पुनरीक्षणाच्या (सर) विरोधात घोषणांचे पोस्टर्स होते.या मोर्चासाठी पोलिसांची परवानगी न घेतल्यामुळे संसदभवन मार्गावर पोलिसांनी मोर्चा अडवला, त्यामुळे मोर्चेकऱ्यांनी तेथेच धरणे आंदोलन सुरू केले.

### अखिलेश यादव चढले कठड्यावर

मोर्चा अडवचल्यानंतर पोलिस आणि मोर्चेकऱ्यांमध्ये बाचाबाचीही झाली. समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव यांनी पोलिसांच्या कठड्यावरुन उडी मारुन पुढे जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी विरोधी पक्षांच्या सर्व खासदारांना आणि नेत्यांना ताब्यात घेतले आणि बसमध्ये भरुन संसदमार्ग पोलिस ठाण्यात नेले. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या नेत्यांमध्ये राहुल गांधी, प्रियांका वढेरा, पी. चिदंबरम, रेणुका चौधरी, समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे आणि शिवसेना उबाठाचे संजय राऊत यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांचा समावेश होता. ■

**मिताली बाग यांना आली चक्कर तर महुआ मोईत्रा बेहोश**

खासदारांची निदर्शने सुरु असतांना तृणमूल काँग्रेसच्या मिताली बाग यांना चक्कर आली. पोलिस अटक करत असतांना तृणमूल काँग्रेसच्या महुआ मोईत्रा या बेहोष झाल्या, तोंडावर पाणी मारल्यानंतर त्या शुध्दीवर आल्या.

आमची लढाई राजकीय नाही तर संविधान बचावची आहे, असे राहुल गांधी म्हणाले. आम्ही एक व्यक्ती एक मत ची लढाई लढत आहे, आम्हाला परिपूर्ण मतदार यादी हवी आहे, असे ते म्हणाले. तर सरकार विरोधी पक्षांच्या या मोर्चाला घाबरल्याचा आरोप काँग्रेसच्या प्रियांका वढेरा यांनी केला. ◀(तभा वृत्तसेवा)

# उशिरा रिटर्न भरल्यानंतरही कराचा परतावा

## सुधारित आयकर विधेयक २०२५ लोकसभेत पारित ● करदात्यांना मोठे फायदे मिळणार

◆ **नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

सुधारित आयकर विधेयक २०२५ आज लोकसभेत सादर करण्यात आले आणि लगेच ते आवाजी मतदानाने पारितही झाले. या विधेयकात करदात्यांच्या फायद्याच्या दृष्टीने अनेक सुधारणा सूचवण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे आयकराच्या काही नियमातही सुधारणा करण्यात आल्या आहेत.

दुपारी २ वाजता लोकसभेचे कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधकांच्या गदारोळात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सुधारित आयकर विधेयक सादर केले आणि ते चर्चेशिवाय पारितही करण्यात आले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात १३ फेब्रुवारी २०२५ ला निर्मला सीतारामन यांनी नवीन आयकर विधेयक संसदेत सादर केले होते. मात्र या विधेयकातील काही तरतुदींवर विरोधकांनी आक्षेप घेतल्यामुळे ते भाजपाचे बैजयंत पांडा यांच्या अध्यक्षतेखालील सांसदीय स्थायी समितीकडे पाठवण्यात आले होते.

या समितीने सूचवलेल्या २८५ दुरुस्त्यांचा सुधारित आयकर विधेयकात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे मागील शुक्रवारी सरकारने आधी सादर केलेले नवीन आयकर विधेयक मागे घेत आज सुधारित आयकर विधेयक सादर केले.





### आयटीआरची अपरिहार्यता रद्द

नवीन विधेयकातून आयटीआरची अपरिहार्यता रद्द करण्यात आली आहे. आता टीडीएस परत घेण्यासाठी पूर्ण इन्कमटॅक्स रिटर्न दाखल करण्याची गरज नाही, तर एक साधा फॉर्म भरुनही हे काम करता येणार आहे. आतापर्यंत निर्धारित मुदतीनंतर रिटर्न दाखल केल्यानंतर रिफंड परत मिळत मिळत नव्हता, आता उशीरा रिटर्न भरल्यावरही रिफंड परत मिळू शकेल. ■

### शून्य टीडीएस सर्टिफिकेट मिळणार

आता कर कापला जाण्याच्या आधीच करदात्याला शून्य टीडीएस सर्टिफिकेट मिळू शकेल, त्यामुळे त्याच्या उत्पन्नातून कर कापला जाणार नाही. ■

आज पारित झालेले सुधारित विधेयक १९६१ च्या आयकर विधेयकाची जागा घेणार आहे. ◀(तभा वृत्तसेवा)



# पुण्यात भीषण अपघात; नऊ भाविक ठार

## ३५ जखमी ● कुंडेश्वरला दर्शनासाठी जाताना वाहन दरीत कोसळले

◆ **पुणे, ११ ऑगस्ट**

श्रावणी सोमवारनिमित्त श्री क्षेत्र कुंडेश्वर येथे दर्शनासाठी जात असलेल्या महिला भाविकांच्या पिकअप गाडीला भीषण अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन सुमारे २५ ते ३० फूट खोल दरीत कोसळले. या अपघातात नऊ महिलांचा मृत्यू झाला असून ३५ प्रवासी जखमी झाले आहेत.

पाईट येथील सुमारे २० ते २५ महिला भाविक श्रावणी सोमवारानिमित्त दर्शनासाठी पिकअप गाडीने श्री क्षेत्र कुंडेश्वरकडे निघाल्या होत्या. कुंडेश्वरकडे जात असताना घाटात चालकाचे वाहनावरील नियंत्रण अचानक सुटले आणि गाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या डोंगरावरून थेट दरीत कोसळली.



चालकाचे नियंत्रण सुटल्याने दरीत कोसळलेले वाहन

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेऊन मदतकार्याला सुरुवात केली. अपघातातील जखमी महिलांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सकाळी ११ च्या सुमारास महिलांनी खच्चून भरलेली पिकअप वाहन रस्त्यावर तब्बल पाच ते सहा वेळा उलटले. रस्त्यावर रहदारी असल्याने तातडीने स्थानिक लोकांनी खाजगी वाहनाने व १० पेक्षा अधिक रुग्णवाहिकांमधून अपघातग्रस्त महिलांना रुग्णालयात दाखल केले. उपचारापूर्वीच नऊ महिलांचा मृत्यू झाला व ३५ पेक्षा जास्त गंभीर जखमी आहेत. अपघाताची तीव्रता पाहता मृतांची संख्या वाढू शकते, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

# रघुजी भोसल्यांची फिरंग तलवार राज्य सरकारच्या ताब्यात

## १८ ऑगस्टला तलवार मुंबईत होणार दाखल ● महाराष्ट्रासाठी गौरवाचा क्षण



राज्य सरकारच्या ताब्यात आलेली भोसला तलवार दाखविताना ॲड. आशिष शेलार आणि लंडन येथील भारती दूतावासाचे अधिकारी

### तलवार वाजतगाजत येणार पु. ल. देशपांडे अकादमीत

सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून ही तलवार सोमवार १८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय मुंबई विमानतळावर दाखल होणार आहे. स्वतः सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलारांच्या उपस्थितीत बाईक रॅली काढून वाजतगाजत ही तलवार दादरच्या पु. ल. देशपांडे कला अकदमीमध्ये आणण्यात येणार आहे. हा महाराष्ट्रासाठी अतिशय आनंदाचा क्षण आहे. तलवारीचा लिलाव जिंकण्यापासून ती ताब्यात घेण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रियेमध्ये महत्त्वाचे मार्गदर्शन आणि भूमिका असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी, लंडन येथील भारतीय दूतावासाचे अधिकारी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सांस्कृतिक कार्य विभागाचा मी आभारी आहे.

**ॲड. आशिष शेलार,** सांस्कृतिक कार्य मंत्री, महाराष्ट्र

◆ **मुंबई/नागपूर, ११ ऑगस्ट**

नागपूरकर भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्त्वाचे सरदार रघुजी भोसले यांची सोन्याने मढवलेली फिरंग तलवार सोथेबीज या ब्रिटिश कंपनीने लिलावात काढली होती. ती महाराष्ट्र सरकारने सर्वाधिक बोली लावून मिळविली होती. सोमवारी(११ ऑगस्ट) लंडन येथे जाऊन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी ती ताब्यात घेतली. सोमवारी १८ ऑगस्टला ही तलवार मुंबईत दाखल होणार आहे.

महाराष्ट्रासह देशाचे ऐतिहासिक दस्तऐवज असलेली ही तलवार लिलावात निघाल्याचे वृत्त २८ एप्रिल २०२५ रोजी अचानक धडकले होते. ॲड शेलारांना हे वृत्त कळताच तातडीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून सदर तलवार शासनाला मिळावी या दृष्टीने नियोजन केले. सोमवारी लंडन येथे प्रत्यक्ष भेटून कायदेशीर बाबी पूर्ण करुन ॲड. शेलार यांनी ही तलवार ताब्यात घेतली. ◀(तभा वृत्तसेवा)

रघुजी राजे भोसले यांनी वापरलेली व इतिहास घडविणारी तलवार मिळविल्याबद्दल राज्यशासनाचे मनापासून आभार. हा अतिश आनंदाचा क्षण आहे. ही ऐतिहासिक तलवार नागपुरात यावी आणि नागपूरच्या मध्यवर्ती संग्रहालयात ठेवण्यात यावी किंवा भोसले घराण्याच्या स्वाधीन करावी. तलवार राज्यात येणार याचा जल्लोष सरकार तर करेलच पण भोसले राज घरण्याकडून सुद्धा मोठा जल्लोष आम्ही करणार आहोत.

**राजे मुधोजी भोसले,** नागपूर

### फिरंग तलवारीचे ऐतिहासिक महत्त्व

रघुजी भोसले प्रथम (१६९५ ते १४ फेुवारी १७५५) हे नागपूरकर भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्वाचे सरदार होते. रघुजी भोसले यांचे शौर्य आणि युद्धनीती यांवर प्रसन्न होवून छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना 'सेनासाहिबसुभा' ही पदवी दिली होती. रघुजी भोसले ंची ही तलवार मराठा शैलीच्या 'फिरंग' पद्धतीच्या तलवारीचा उत्कृष्ट नमुना आहे. युरोपीय बनावटीची पाती ही मध्ययुगीन भारतातल्या उच्च वर्गांमध्ये प्रसिद्ध होती. पात्याच्या पाठीवर तळाशी 'श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा फिरंग' हा देवनागरी लेख सोन्याच्या पाण्याने लिहिलेला आहे. पात्यावरील लेख ही तलवार रघुजी भोसले यांच्यासाठी बनवली गेली होती किंवा त्यांच्या वापरातील होती याकडे निर्देश करतो. नागपूरकर भोसल्यांची १८१७ मध्ये सीताबर्डी येथे ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध लढाई झाली. या लढाईमध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा विजय झाल्यावर कंपनीने नागपूरकर भोसल्यांच्या खजिन्याची लूट केली. ही तलवार युद्धानंतरच्या लुटीमध्ये अथवा ब्रिटिशांना दिलेल्या भेटींमध्ये देशाबाहेर गेली असण्याची शक्यता जाणकार व्यक्त करतात. ■



# थकित कर्जापोटी नागूरच्या युवा शेतकऱ्याची आत्महत्या

## बँकेचा तगादा अन् ऊसबील न मिळाल्याने उचलले टोकाचे पाऊल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ११ ऑगस्ट-**

नागूर (ता. अक्कलकोट) येथील युवा शेतकरी सुनील चौडप्पा कुंभार (वय- २८) या युवा शेतकऱ्याने बँकचे थकीत कर्ज भरावयाच्या चिंतेतून विष प्राशन करून आत्महत्या केली. २ ऑगस्ट रोजी त्याने विष प्राशन केले होते. सोलापुरच्या नवनीत हॉस्पीटलमध्ये त्याच्यावर उपचार चालु होते.



अखेर सोमवार दि. ११ ऑगस्ट रोजी त्याची प्राणज्योत मावळली. सुनिल याचा मृतदेह नातेवाईक व ग्रामस्थांनी सोमवारी रात्रीपर्यत ताब्यात घेण्यास नकार दिला होता. बॅंक अधिकाऱ्यांच्या तगाद्यामुळेच आत्महत्या केल्याचा नातेवाईकांचा व नागुर ग्रामस्थांचा आरोप आहे. सुनिल चौडप्पा कुंभार हा एकुलता एक मुलगा दोन बहिणींचे लग्न झाले आहे. वडिल वृद्ध आहेत. आई घरकाम करते. सुनिल हा घरातील प्रमुख होता. कुटुंबाचा एकमेव आधार होता. बॅंकेचे कर्ज फेडण्याबाबत त्याच्यामागे बँकेचा तगादा होता असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

> नागुर येथील शेतकऱ्याने विष प्राशन केले. त्याचा उपचारादरम्यान मृत्यु झाला. नातेवाईकांनी सोमवारी मृतदेह ताब्यात घेतला नाही. त्यांच्या काय मागण्या आहेत याबाबत मंगळवारी नातेवाईकांशी चर्चा करणार आहे.
>
> **- विनायक मगर,** तहसीलदार

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...




### जिजामाता प्रशालेत रक्षाबंधन सोहळा

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

जिजामाता प्रशाला कोंडी येथे काल रक्षाबंधन सोहळा संपन्न झाला या कार्यक्रमासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक उदय जाधव व प्राथमिक प्रशालेचे मुख्याध्यापक कुंटेलू उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारंग पाटील व आभार प्रदर्शन लांडगे विजयकुमार यांनी मानले. संस्थेच्या मार्गदर्शिका माजी आमदार निर्मला ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पा ठोकळ यांच्या मार्गदर्शनाने हा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला. कार्यक्रमासाठी श्रीमती वनगे, कैलास देशमुख व संतोष कासे यांनी परिश्रम घेतले.



### हजरत शेख नुरुद्दीन बाबा यांच्या मजारला अभिषेक करून ऊर्स उत्सवास प्रारंभ

**अक्कलकोट दि ११ ऑगस्ट-**

अक्कलकोट येथील सुफी संत, सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असणारे हजरत शेख नुरुद्दीन बाबा यांच्या मजारला (समाधी) अभिषेक करून ऊर्स उत्सवास प्रारंभ करण्यात आला. यावेळी दिनांक १० ऑगस्ट रोजी रात्री दहा वाजता हजरत शेख नुरुद्दीन बाबा यांच्या मजारला शेकडो भाविकांच्या उपस्थितीमध्ये अभिषेक करण्यात आले. यावेळी हजरत शेख नुरुद्दीन बाबा यांच्या मजारला मोरपिसाऱ्याने स्वच्छता करण्यात आली. यानंतर गुलाब पाण्याने मजार धुण्यात आले. नवीन कापडाने स्वच्छता करून मजारवर अत्तर लावण्यात आले. हजरत शेख नुरूद्दीन बाबा चिस्ती दर्गाहचे सज्जादानशीन सय्यदशाह नसिनपाशा पिरजादे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मजारला पांढरी गलफ व नंतर रंगीत गलफ चढविण्यात आली. या विधीनंतर भाविक भक्तांना दर्गाहमध्ये प्रवेश देण्यात आला. हजरत शेख नुरूद्दीन बाबा यांच्या मजारला भक्तांच्या उपस्थितीमध्ये चादर चढविण्यात आले. यावेळी सज्जादानशीन व उपस्थितांनी कलाम सलाम केले. तसेच यावेळी सज्जादानशीन धर्मगुरू यांची प्रार्थना (फातेहाखानी) झाली. यावेळी शेकडो भाविकांनी दर्शन घेतले. उपस्थित असलेल्या सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी हजरत शेख नुरूद्दीन बाबा दर्गाहाचे सज्जादानशीन, पुण्याचे स्वामी भक्त नरेश अहिरे, दर्गाहचे सचिव जैनुद्दीन अश्रफी, नागणहळी आश्रम शाळेचे सचिव जावेद पटेल, राजशेखर कापसे, पंचायत समितीचे अधिकारी मठ, जोशी, ॲड. ए.के. पिरजादे, अहमदपाशा पिरजादे, ॲड. अजीमपाशा पिरजादे, ॲड. फहिमपाशा पिरजादे, पिरपाशा पिरजादे, नदीमपाशा पिरजादे, वशिम पाशा पिरजादे, आसिफपाशा पिरजादे, नईमपाशा पिरजादे, जासिमपाशा पिरजादे, कुमारी अवजा पिरजादे, पत्रकार नंदकुमार जगदाळे, दाता बळोरगी, सैपन शेख, कवी होटकर उपस्थित होते.

### एमबीबीएसच्या विद्यार्थ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

**गोंदिया, ११ ऑगस्ट**

शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्याने गळफास घेत आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा प्रकार १० ऑगस्ट रोजी रात्री उघडकीस आला. सुसाईड नोट मित्रांना पाठविल्याने मित्रांनी विनाविलंब त्याच्या खोलीवर जात त्याला फासावर लटकलेल्या स्थितीतून काढून रुग्णालयात दाखल केल्याने त्याचे प्राण वाचल्याचे सांगितले जाते. अवेश कुमार रा. राजस्थान असे विद्यार्थ्याचे नाव आहे. या घटनेने वैद्यकीय महाविद्यालयाच्या वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. अवेशच्या सुसाईड नोटनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रशांत बागडे यांनी अवेशच्या आईबद्दल अपशब्द बोलून विद्यार्थ्याचा मानसिक छळ केल्याचे नमूद आहे. आईबद्दल अपशब्द बोलल्यामुळे आवेश काही दिवसांपासून तणावात होता. यातच त्याने रविवारी रात्री टोकाचे पाऊल उचलत गळफास घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. तत्पूर्वी त्याने सुसाईड नोट सामाईक केल्याने त्याच्या वर्गमित्रांनी त्याच्या खोलीकडे धाव घेतली. तो गळफास घेतलेल्या स्थितीत होता. त्यांनी त्याला वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. त्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे बोलले जाते.

### शिवचरित्रकार मुसा खान यांचे निधन

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**



सेवानिवृत्त पोलीस उप अधिक्षक आणि शिवचरित्रकार मुसा खान (वय ८२) यांचं सोमवारी वृध्दापकाळात निधन झाले. मंगळवारी १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मोदी पोलीस चौकीजवळील घरापासून अंत्ययात्रा निघून मोदी स्मशानभूमीत दफन होईल. शिवछत्रपतींचा इतिहास संशोधन करून त्यांनी उर्दू, हिंदी आणि मराठीत लेखन केले. ते उर्दू, हिंदी, इंग्रजीबरोबर फारसी भाषेचे अभ्यासक होते. विपूल संदर्भ पुस्तकांच संच बाळगून होते. त्यांच्या शिवछत्रपतींची धर्मनिरपेक्षता या शिवचरित्राचे उर्दू आणि मराठीत तीन आवृत्ती प्रकाशित झाल्या आहेत. शिवचरित्रासोबत फुले शाहू आंबेडकर या महापुरुषांवर देखील विपूल लेखन केले आहेत.

### पत्रकार अश्विनी तडवळकर यांना पितृशोक

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**



एमआयडीसी कुमार स्वामीनगर येथील विश्वनाथ एकनाथ आगाशे (वय ७७) यांचे सोम वारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते पत्रकार अश्विनी तडवळकर यांचे वडील होत. रात्री पुणे नाका स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक पारित

## क्रीडा क्षेत्राचा चेहरामोहरा बदलणार, पारदर्शिता येणार




**महत्त्वाच्या तरतुदी**

- नॅशनल स्पोर्टस बोर्ड (एनएसबी) तसेच नॅशनल स्पोर्टस ट्रिब्युनल(एनएसटी) स्थापन करण्याची तरतूद
- देशातील सर्व क्रीडा महासंघांना नॅशनल स्पोर्टस बोर्डकडे नोंदणी करावी लागेल. -एनएसबीकडे नोंदणी झाल्याशिवाय देशातील कोणत्याही क्रीडा महासंघाला सरकारकडून अनुदान मिळणार नाही.
- विशेष म्हणजे भारतीय क्रिकेट नियामक मंडळालाही (बीसीसीआय) एनएसबीकडे नोंदणी करावी लागेल.
- २०२८ मध्ये लॉसएंजल्स येथे होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत टी २० च्या स्वरुपात क्रिकेटचा प्रथमच समावेश होणार आहे.
- नॅशनल स्पोर्टस ट्रिब्युनल म्हणजे राष्ट्रीय क्रीडा लवादाची स्थापनाही या विधेयकाद्वारे करावी लागणार आहे.

**गुणवत्तेच्या आधारावरच खेळाडूंची निवड**

खेळाडू यांच्या वादावर तोडगा काढण्याचा अधिकार या लवादाला राहणार आहे. विशेष म्हणजे या लवादाच्या निर्णयाला फक्त सर्वोच्च न्यायालयातच आव्हान देता येणार आहे. क्रीडा क्षेत्रात पारदर्शिता आणण्याची तसेच खेळाडूंच्या निवडीत होणारा भाईभतिजावाद दूर करण्याची तरतुद या विधेयकात आहे. या विधेयकामुळे गुणवत्तेच्या आधारावर खेळाडूंची निवड करण्याचा मार्ग प्रशस्त होणार आहे.

**◆ नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक (नॅशनल स्पोर्टस गव्हर्नस बिल) आणि नॅशनल ॲण्टी डोपिंग सुधारणा विधेयक आज लोकसभेत पारित करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर क्रीडा क्षेत्रातील सर्वात मोठ्या सुधारणांचा मार्ग या दोन विधेयकांमुळे प्रशस्त होणार आहे.क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री मनसुख मांडविया यांनी आज ही दोन्ही विधेयके लोकसभेत मांडली.

बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्यावरुन विरोधी पक्षाच्या सदस्यांचा सभागृहात गोंधळ सुरु असतांना आवाजी मतदानाने ही दोन्ही विधेयके पारित करण्यात आली. राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक आणण्याचा प्रयत्न सर्वप्रथम १९७५ मध्ये करण्यात आला होता, मात्र त्यावेळी तो यशस्वी होऊ शकला नाही, त्यानंतर अनेक वेळा असा प्रयत्न झाला. या विधेयकामुळे क्रीडा क्षेत्रातील सुधारणांचा मार्ग प्रशस्त होणार आहे, क्रीडा क्षेत्रात उत्तरदायित्व, न्याय आणि चांगल्या प्रशासनाची सुरुवात होणार आहे, असे स्पष्ट करत मांडविया म्हणाले की, भारताच्या क्रीडा क्षेत्रासाठी हे विधेयक अतिशय महत्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारे ठरणार आहे. मात्र दुर्देवाची बाब म्हणजे विधेयक पारित होत असतांना विरोधक सभागृहात नाही. २३ जुलैला मांडविया यांनी हे विधेयक लोकसभेत सादर केले होते.

या विधेयकाने क्रीडा महासंघात पदाधिकारी होण्यासाठी वयामर्यादा वाढवण्यात आली आहे. आतापर्यंत ७० वर्ष असलेली वयोमर्यादा ७५ ते ८० वर्षापर्यंत वाढवण्यात आली आहे. मात्र यासाठी आंतरराष्ट्रीय क्रीडा महासंघाची परवानगी घ्यावी लागणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) माहितीचा अधिकार कायदा लागू करण्याची चर्चा होती, पण आता मात्र तो लागू होणार नाही, तशी तरतूद या विधेयकात आहे. सरकारी मदत आणि अनुदान घेणाऱ्या क्रीडा संस्थानांना माहिती अधिकार कायदा लागू आहे. बीसीसीआय सरकारकडून कोणतीही आर्थिक मदत वा अनुदान घेत नाही.

◄(तभा वृत्तसेवा)

# २२ व्या राज्य बालनाट्य स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालया मार्फत आयोजित २२ व्या राज्य बालनाट्य स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, स्पर्धेसाठी ऑनलाईन प्रवेशिका सादर करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२५ निश्चित करण्यात आली आहे. स्पर्धेचा शुभारंभ ३ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार असून, प्राथमिक फेरी डिसेंबर महिन्यात राज्यातील १० केंद्रांवर पार पडणार आहे.

या स्पर्धेसाठी शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल, तसेच नामांकित शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. विद्यार्थ्यांनी ह्ीींिं://ारहरपरीींरीवहर.ले या संकेतस्थळावर प्रवेशिका ऑनलाईन पद्धतीने सादर कराव्यात, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी सागर नन्नवरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. स्पर्धेच्या विविध टप्प्यांमध्ये सहभागी विद्यार्थी आपल्या अभिनय, संवाद कौशल्य आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीचे दर्शन घडविणार आहेत. शासनाने निश्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर न केल्यास प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. तसेच शासन नियमांचे पालन बंधनकारक असून, उल्लंघन केल्यास संबंधित विद्यार्थ्याला अपात्र ठरविण्यात येईल, असे आदिवासी विकास आयुक्तालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य बालनाट्य स्पर्धेच्या माध्यमातून त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होत असून, सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील सर्व पात्र शाळांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# विविध संवर्गातील ५०० पदे सुधारीत आकृतिबंधात पुनर्जीवीत करावी

**महापालिका कामगार संघटना संघर्ष समितीचे आयुक्तांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

महापालिका आकृतीबंध २०२१ मध्ये व्यपगत झालेली झाडूवाले, बिगारी, सफाई कामगार, जमादार, आया आदी संवर्गातील ५०० पदे सुधारीत आकृतिबंधात करून पुर्नजीवीत करावीत या सहा विविध १० मागण्यांचे निवेदन सोलापूर महापालिका कामगार संघटना संघर्ष समितीच्या वतीने आयुक्तांना देण्यात आले.

मनपा कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्यात वाढ करावी. सेवानिवृत्त सेवकांना ७ वे वेतन आयोगाचाः १ वर्षाचा वेतन वाढीला फरक व अर्जीत रजेची रक्कम देण्यासाठी पेन्शन विभागास दरमहा ५० लाख रूपये द्यावेत. मनपामधील रोजंदारी कर्मचाऱ्यांना दि.६ मार्च २०२५ च्या शासन निर्णयाप्रमाणे किमान वेतन देण्यात यावे. घनकचरा व्यवस्थापन विभागातील झाडूवाले, बिगारी, सफाई कामगार सेवकांचे आय.सी.टी.. बेस्ड प्रणाली मार्फत कामाचे मुल्यमापन व क्यू. आर. कोड स्कॅन करणे पद्धत रद्द करावी. मनपामधील चतुर्थश्रेणीतील कर्मचाऱ्यांना गणवेश शिलाईत ७५० रूपये व धुलाई भत्यात २५० रुपये वाढ करावी. घनकचरा व्यवस्थापनाकडील अर्हताकारी सेवा करून सेवानिवृत्त झाडूवाले, बिगारी, सफाई कामगारांना पेन्शन व उपदान अदा करावे. मनपा मधील कर्मचाऱ्यांना कॅशलेस विमा लागू करावा यासह विविध मागण्यांचा समावेश आहे.

यावेळी समितीचे संस्थापक जनार्दन शिंदे, अध्यक्ष दिलावर मनियार, कार्याध्यक्ष बापुसाहेब सदाफुले, जनरल सेक्रेटरी चांगदेव सोनवणे आदी उपस्थित होते.

# शहर-जिल्हा पुरवठा विभागाला मिळणार महिनाखेर ४२ लिपीक कर्मचारी

**जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी ४२ उमेदवार (लिपीक परीक्षा) सोलापूर जिल्हा पुरवठा विभागाला मिळणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दैनिक तरुण भारतशी खास संवाद साधताना आज (दि. ११) दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून शहर आणि जिल्हा पुरवठा विभागाला कर्मचारी अपुरे असल्याने कामकाजही मंदगतीनेच चालू होते. रिक्त असलेल्या पदावरील कामाचा ताण इतर कर्मचाऱ्यांना येत होता. आता नुकतेच एमपीएससीत उत्तीर्ण झालेले ४२ उमेदवार सोलापूर शहर-जिल्हा पुरवठा विभागाला मिळणार आहेत. यामध्ये ३२ उमेदवार जिल्हा पुरवठा विभागाला आणि १० उमेदवार शहर पुरवठा विभागाला मिळणार आहेत. यामुळे पुरवठा विभागाच्या कामाला आता उर्जा येणार असल्याची माहितीही सरडे यांनी दिली. या उमेदवारांना लवकरच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे कर्तव्यावर रूजू होण्याचे आदेश देणार असून, यावेळी त्यांच्या सर्व कागदपत्रांची तपासणीही होणार आहे. यानंतर येत्या महिनाखेरपर्यंत हे कर्मचारी कर्तव्यावर रूजू होतील. हे कर्मचारी कामावर हजर झाल्यावर पुरवठा विभागातील कामकाजाला गती येणार असल्याचा आत्मविश्वास श्री. सरडे यांनी यावेळी व्यक्त केला.



# अमेरिकन साम्राज्यवादाचा निषेध करण्यासाठी उद्या देशव्यापी आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १ ऑगस्टपासून भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्क्यांपर्यंत अतिरिक्त कर लादण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे भारतीय उद्योग आणि शेती क्षेत्रावर गंभीर परिणाम होणार आहेत. व्यापार वाटाघाटी सुरू असतानाही अमेरिकेकडून सातत्याने धमक्या देण्यात येत आहेत.

अमेरिकेच्या धमक्यांना विरोध करण्यासाठी १३ ऑगस्ट २०२५ रोजी देशव्यापी निदर्शने व डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुतळ्याचे दहन करण्याचे आवाहन सर्व कामगार संघटना आणि संयुक्त किसान मोर्चा यांनी केले आहे.

रशियाकडून भारत तेल व शस्त्रास्त्रे विकत घेत असल्याने ती खरेदी थांबवण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. अन्यथा, २७ ऑगस्टपासून आणखी २५ टक्के अतिरिक्त कर लावण्याची घोषणा करण्यात आली आहे. या कृतीतून अमेरिकन साम्राज्यवादाचा कुरूप चेहरा उघड झाला असून, भारताच्या सार्वभौमत्वावर व स्वतंत्र व्यापार धोरणांवर सरळ आक्रमण केले जात आहे. नुकत्याच झालेल्या युरोपियन युनियन व युनायटेड किंगडम सोबतच्या 'सीईटीए'सारख्या करारांमध्ये झालेल्या तडजोडीमुळे शेती, दुग्ध व्यवसाय आणि औद्योगिक क्षेत्रावर संकट अधिक गडद झाले आहे. यामुळे ब्रिटन, युरोपियन युनियनसह साम्राज्यवादी देशांना फायदा होत असून, भारतीय शेतकरी व कामगार यांचे नुकसान होत आहे.

या आंदोलनात देशभक्त जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. डी. एल. कराड, प्रमुख समन्वयक- कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समिती महाराष्ट्र राज्य, राष्ट्रीय उपाध्यक्ष व राज्याध्यक्ष सीटू, तसेच एम. एच. शेख, राज्य सरचिटणीस सीटू यांनी केले आहे.

# कोरडवाहू शेतीत एकात्मिक शेती पद्धतीचा वापर करून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचवावे

**कुलगुरू डॉ. शरद गडाख**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ११ ऑगस्ट-**




कुलगुरू डॉ. शरद गडाख, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी विभागीय संशोधन केंद्र सोलापूर येथे नुकतीच सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी मुळेगाव प्रक्षेत्रावर चालणाऱ्या विविध प्रयोगांची पाहणी केली आणि शास्त्रज्ञ व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना या संशोधन केंद्राने कोरडवाहू भागातील शेतकऱ्यांच्या उन्नतेसाठी विविध प्रकारच्या २०० पेक्षा अधिक शिफारसी प्रसारित केलेल्या असून, ब्रिटिश काळात स्थापन झालेल्या संशोधन केंद्राचे नावलौकिकात भर घातली आहे असे प्रतिपादन केले.

या केंद्राने कोरडवाहू शेतीच्या उन्नतीसाठी मृद व जलसंधारण, शेततळे, पीक पद्धती, विविध वाण, कोरडवाहू फळझाडे लागवड तंत्रज्ञान, आंतरपीक पद्धती, कृषी यांत्रिकीकरण इ. तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या शेतावर पोहचवण्याचे भरीव काम केले आहे. विद्यापीठाने निर्माण केलेली जैविक खते, ट्रायकोडर्मा, फुले सूक्ष्म अन्नद्रव्य, फुले बायोमिक्स, तसेच खरीप व रब्बी हंगामासाठी विद्यापीठाने प्रसारित केलेले विविध वाण आणि विद्यापीठ तंत्रज्ञानाचा उपयोग करावा असे सुचविले आहे. कृषि संशोधन केंद्र हे शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या माध्यमातून, तसेच शिवार फेरी, प्रक्षेत्र भेट इ. आयोजनातून सुधारित तंत्रज्ञान प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करीत आहे. सदर भेटीदरम्यान कुलगुरू यांच्याहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच डॉ. नितीनकुमार रणशूर यांनी लिहीलेल्या ३ पुस्तकांचे यावेळी कुलगुरू आणि संशोधन संचालक यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विभागीय संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ व सहयोगी संशोधन संचालक डॉ. नितीनकुमार रणशूर आणि शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते. सदरील २ दिवसाच्या दौऱ्या दरम्यान कुलगुरू यांनी कृषी तंत्र विद्यालय सोलापूर, कृषी संशोधन केंद्र मोहोळ, पंढरपूर, जेऊर व कृषी विज्ञान केंद्र मोहोळ येथे भेट देऊन तेथील संशोधन कार्याचा आढावा घेतला.

# यशस्वी उद्योजक होण्यासाठी जोखीम घ्या

**गुरू प्रसाद बिस्वाल यांचा सल्ला : एमआयटी डब्ल्यूपीयूमध्ये राइड-२०२५चे उद्घाटन**

**७० पेक्षा अधिक स्टार्टअपः ५ हजारांहून अधिक विद्यार्थी उपस्थित**

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ११ ऑगस्ट-**




जीवनात यशस्वी उद्योजक होण्यासाठी विद्यार्थ्यांनी जोखीम घ्यायला शिकले पाहिजे. कोणताही कम्फर्ट झोन हा धोकादायक असल्याने त्यामध्ये राहू नये. सतत जोखीम घ्यायला शिकले पाहिजे. भविष्यकाळ हा उद्योजकासाठी पोषक आहे. त्यामुळे चांगले भविष्य घडेल याची वाट न बघता आयडिया घेऊन प्रयत्नातून भविष्य घडवा. असा सल्ला भारत फोर्जच्या एरोस्पेस बिझनेस व्हर्टिकलचे सीईओ गुरू प्रसाद बिस्वाल यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या रिसर्च, इनोव्हेशन, डिझाइन अँण्ड आंत्रप्रेन्यूअरशिप (राइड-२५) च्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. हा कार्यक्रम पाच दिवस चालणार आहे.

यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, सीएओ डॉ. प्रसाद खांडेकर, स्कूल ऑफ हेल्थ सायन्सेस अँड टेक्नॉलॉजीचे डीन प्रा.डॉ. नीरज महिंद्रू, हितेश जोशी, निनाद पाटील, डॉ. सिद्धार्थ चक्रबर्ती, डॉ.सुमन देवादुला व डॉ. उर्वशी मक्कर उपस्थित होते. तसेच ५ हजार पेक्षा अधिक विद्यार्थी उपस्थित होते. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या मार्गदर्शनात व कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या नेतृत्वात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरू प्रसाद बिस्वाल म्हणाले, जीवनात रिस्क न घेता कार्य करणे म्हणजे तुमच्या करिअर मधील सर्वात मोठा धोका आहे. अपयश हा एक प्रतिसाद असतो. त्यातून खूप काही शिकता येते. कोणत्याही करिअर मधील मूळ तत्व जाणून घेतले की उत्तरे आपोआप मिळतात. तंत्रज्ञानाच्या युगात एआय शी स्पर्धा करू शकत नाही. त्या सोबत सहयोग करूनच पुढे जावे लागेल. यशस्वी आंत्रप्रेन्यूअर बनायचे असेल तर प्रथम सातत्याने त्याचाच विचार करायला शिकणे गरजेचे आहे.

डॉ. प्रसाद खांडेकर म्हणाले, राइडची संकल्पनाच मुळात युवकांसाठी रिसर्च, इनोव्हेशन, डिझाइन आणि आंत्रप्रेन्युअरशीपचे टप्पे सक्षम करणे आहे. भारताच्या प्रगतीचा आलेख पाहता देशाची अर्थव्यवस्था लवकरच तीन ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहचण्याच्या मार्गावर आहे. यासाठी नवोपक्रमावर लक्ष केंद्रित करावे लागणार आहे. भारतातील सध्याची परिसंस्था शिक्षण व्यवस्थेच्या पातळीवर नवोपक्रमाला आधार देण्यासाठी पुरेशी परिपक्व आहे. डॉ. आर.एम. चिटणीस म्हणाले,शिक्षणाच्या माध्यमातून समाजावर सकारात्मक परिणाम करणार्या शाश्वत, समावेशक आणि प्रगतिशील परिवर्तनावर भर देऊन विद्यार्थ्यांच्या भविष्याला बळकटी देणे हा राइड चा मुख्य उद्देश आहे. शिक्षणानंतर नोकरी ऐवजी उद्योग व्यवसायांत विचारपूर्वक निर्णय घेऊन चांगले करिअर घडवण्यासाठी हे एक योग्य माध्यम आहे. प्रा.निरज महेन्द्रू यांनी स्वागत पर भाषण व राईड बद्दलची विस्तृत माहिती दिली. प्रा. डॉ. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सिद्धार्थ चक्रबर्ती यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### बोरी नदीतील पुराच्या पाण्यात वाहून गेलेला तरुण आद्यापही बेपत्ताच!

**अक्कलकोट दि. ११ ऑगस्ट-**

अक्कलकोट तालुक्यातील आंदेवाडी ज येथील बोरी नदीच्या पुलावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असताना पुलावरील वाहत्या



पाण्याच्या प्रवाहातून दुचाकीवरून जाताना तरुण दिनांक १० ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता वाहून गेला होता. दोन दिवस झाले तरी त्या तरुणाचा ठाव ठिकाणा लागला नसून पाण्याच्या प्रवाहातील तरुण अद्यापही बेपत्ताच आहे. बोरी नदी पात्रात पाण्याच्या प्रवाहात बबलाद येथील युवक रेवणसिद्ध श्रीमंत बिराजदार वय २७ हा मोटार सायकल सह वाहून गेला होता. रविवारी सकाळी १० वाजता रेवणसिद्ध हा बबलाद गावातून दुधनी कडे जात होता. बोरी नदीच्या पुलावरून दुचाकी वर जाताना रेवणसिद्ध बिराजदार हा आंदेवाडी ज येथून मोटारसायकल सह पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. या घटनेची खबर मिळताच अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर ,दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावर व महसूल , पोलीस प्रशासनातील कर्मचारी उपस्थित रहात तरुणाच्या शोधासाठी प्रयत्न केले. पाण्याच्या प्रवाहात वाहून गेलेल्या युवकाचा शोध घेण्यासाठी एनडीआरएफ च्या जवानांना पाचारण करून सोमवारी बोरी नदीपात्रात शोध घेण्यात आले. पाण्याच्या प्रवाहात वाहून गेलेल्या युवकाची मोटार सायकल सोमवारी मिळाली असून तो तरुण अद्यापही बेपत्ताच असल्याची माहिती तहसीलदार विनायक मगर यांनी दिली .दरम्यान आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी स्वतः एन डी आर एफ च्या जवानासोबत बोटीत बसून बोरी नदीपात्रात शोध मोहिमेत सहभाग घेतला .माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनीही सोमवारी आंदेवाडी ज येथे भेट देऊन प्रशासनाकडून शोध कार्याची माहिती घेतली. दोन दिवस झाले तरी अद्याप तरुणाचा ठावठिकाणा लागला नाही.

### आटपाडीत डाळिंबाला प्रतिकिलो ३११ रुपये विक्रमी दर

**सांगली दि. ११ ऑगस्ट -**

आटपाडी बाजार समितीच्या सौद्यामध्ये सोमवारी डाळिंबाला प्रतिकिलो ३११ रुपयांचा या हंगामातील विक्रमी दर मिळाला. आंब्याचा हंगाम संपल्यानंतर नव्याने बाजारात डाळिंबाची आवक होऊ लागली असून, डाळिंबाला चांगली मागणी आणि चढा दर मिळत असल्याने उत्पादक समाधानी आहेत. प्रतिकिलो ३११ रुपये दर मिळताच शेतकऱ्यांनी फटाके फोडून




आनंद साजरा केला. आटपाडी बाजार समितीतील मंगलमूर्ती फ्रूट सप्लायर्समध्ये डाळिंबाला विक्रमी दर मिळाला. आटपाडी बाजार समिती डाळिंब सौदे बाजारात आवक वाढली आहे. सध्या दररोज ४ ते ५ हजार क्रेटची आवक होत आहे. आटपाडीसह सांगोला, अकलूज, नातेपुते, माळशिरस, दौंड, इंदापूर, अहमदनगर, अक्कलकोट, तसेच कर्नाटकातील विजापूर व बेळगाव परिसरातून दर्जेदार डाळिंब येत आहे. आटपाडी बाजार समितीच्या आवारात सौदे बाजारात मागणी वाढल्यामुळे डाळिंबाचे भावही सातत्याने वाढत आहेत. श्रावण महिन्यातील उपवास सुरू आहेत. त्यामुळे दर्जेदार डाळिंबाला मागणी वाढली आहे. चांगला दर आणि मालाचा उठाव होत असल्याने बळीराजा सुखावला आहे.

# सत्तेशी समझोता करशील तर नेतृत्व नाही वाढणार

## देवेंद्र फडणवीस : गोपीनाथ मुंडेंनी मला मोठी शिकवण दिली, लातूर येथे गोपीनाथ मुंडे यांच्या पुतळ्याचे थाटात अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. ११ ऑगस्ट-**

गोपीनाथ मुंडेंनी सर्वात मोठी शिकवण काय तर ती शिकवण म्हणजे ते मला एक दिवस मला म्हणाले, देवेंद्र एक लक्षात ठेव सत्ता अशी असते की अनेक आमिषे आपल्या दाखवते, अनेकदा आपल्या वश करु पाहते. एक लक्षात ठेव सत्तेशी संघर्ष करायला शिक, ज्यादिवशी विरोधी पक्षात असताना सत्तेशी समझोता करशील त्यादिवशी संपत्ती वाढेल पण नेतृत्व वाढणार नाही. त्यामुळे सत्तेशी समझोता करु नकोस. मी जीवनभर ही गोष्ट पाळली. विरोधी पक्षनेता असताना मी ते पाळले. मधे अडीच वर्षे विरोधी पक्ष नेते पद माझ्याकडे होते त्यावेळी सत्ताधाऱ्यांना एकही दिवस झोपू दिले नाही कारण माझ्यासोबत गोपीनाथ मुंडेंची शिकवण होती.



गोपीनाथ मुंडे यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्याची संधी मला मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. विलासराव देशमुख आणि गोपीनाथ मुंडे यांची मैत्री संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे. दोन्ही मित्र स्मारकाच्या स्वरुपात आजूबाजूला आले हा विलक्षण योगायोग आहे. असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर या ठिकाणी गोपीनाथ मुंडे यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले त्या प्रसंगी भाषण केले. या भाषणात त्यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणी सांगितल्या.

ते म्हणाले, सत्तेशी संघर्ष करायचा समझोता नाही तो मी कधी केला नाही. मी अनेकवेळा पाहिलं होतं की गोपीनाथ मुंडे यांची एक खास स्टाईल होती. अनेकवेळा त्यांना अनेकदा कागद सापडत नसत. त्या कागदाची शोधाशोध करण्यात त्यांचा वेळ जायचा. अशा वेळी गोपीनाथ मुंडे कोरा कागद दाखवून सांगायचे हा माझ्याकडे पुरावा आहे. पण कुणाचीही हिंमत नव्हती की तो कागद दाखवा. कारण गोपीनाथ मुंडेंनी कागद दाखवला म्हणजे त्यांच्याकडे पुरावा असेल. त्यांचा कोरा कागदही सभागृहही पुरावा म्हणून स्वीकारायचं अशी आठवणही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितली.

गोपीनाथ मुंडे यांचं जीवन पाहिलं तर सातत्याने संघर्ष करणारे गोपीनाथ मुंडे आपल्याला पाहण्यास मिळतात. सामान्य कार्यकर्ता ते केंद्रीय मंत्री ही त्यांची वाटचाल त्यांच्या मेहनतीतून साकार झाली आहे. अवघ्या ३५ व्या ३७ व्या वर्षी भाजपाचे अध्यक्ष झाले. महाराष्ट्रात त्यावेळच्या भाजपा नेतृत्वाने हा निर्णय केला की तरुण रक्त हवे आहे. संघर्ष करणारी तरुणाई एकत्र केली पाहिजे त्यावेळी असे अनेक तरुण एकत्र केले. त्यांचे नेतृत्व गोपीनाथ मुंडे यांना दिली. पक्षाला माहीत होते की सामान्य माणसांपर्यंत पक्ष पोहचवायचा असेल तर संघर्ष करणारा तरुण आपल्याला नेता म्हणून दिला पाहिजे. गोपीनाथ मुंडे यांनी पक्षाची धुरा सांभाळली त्यानंतर पक्षाने कधी मागे वळून पाहिले नाही इतके मोठे संघटन त्यांनी उभारें. महाराष्ट्रातला सर्वात मोठा पक्ष भाजपा आहे, देशातला तर आहेच. पण महाराष्ट्रातला सर्वात मोठा पक्ष हे भाजपाला जे स्थान मिळाले त्याचा पाया रचणारे गोपीनाथ मुंडे आहेत. गोपीनाथ मुंडे यांनी विविध यात्रांच्या माध्यमातून संघर्ष उभा केला होता. गोपीनाथ मुंडे यांचं नेतृत्व असे होते की आपली सत्ता १५ वर्षे आपल्याकडे नव्हती, देशातही नव्हती आणि राज्यातही नव्हती. १९९९ ला आपलं सरकार आपले सरकार थोड्या मतांनी गेले. पण गोपीनाथ मुंडे यांनी संघर्ष सोडला नाही. अनेकदा पद गेले की लोक विचारत नाही. पण १५ वर्षे पदावर नसतानाही मुख्यमंत्र्यांपेक्षा जास्त रुबाब असलेला नेता कुणी असेल तर ते आमचे गोपीनाथ मुंडे होते. कुरघोडी कशी करायची हे सगळं मी त्यांच्याकडून शिकलो. गोपीनाथ मुंडे एकेका विषयावर सरकारची सालटी काढत असत. समोरच्यावर वज्राघात करताना सहनही होत नाही आणि सांगता येत नाही अशी अवस्था ते करायचे, असेही ते म्हणाले.

**लातूरच्या रेल्वे कोच निर्माण कारखान्यात रोजगार : फडणवीस**

लातूर येथील रेल्वे कोच निर्माण कारखान्यात आतापर्यंत एक हजार जणांना रोजगार दिला आहे. पुढील वर्षात १० हजार रोजगार देता येऊ शकेल. त्यासाठी शासकीय तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी महाविद्यालये आणि कौशल्यविकास क्षेत्रातील यंत्रणांना बसून रोजगारक्षम मनुष्यबळ विकास करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे स्थानिकांना नोकऱ्या मिळतील, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

## महापालिकेतील ४ कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

- अँपवरील नागरिकांच्या तक्रारींचा वेळेत निपटारा न केल्याप्रकरणी कारवाई
- दंडाची रक्कम मासिक वेतनातून एकरकमी वसूल करणार
- अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी काढले कारवाईचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

महापालिकेच्या माय सोलापूर अँप वरील नागरिकांच्या तक्रारींचा वेळेत निपटारा न केल्याप्रकरणी निष्काळजीपणाच्या गैरवर्तनासाठी महापालिकेतील चार कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी यासंदर्भात आदेश काढले आहेत.

माय सोलापूर अॅपवर नागरीकांनी नोंदविलेल्या प्राप्त तक्रारीचा निपटारा मुदतीत न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले आहेत. आपली तक्रार पोर्टल/माय सोलापूर अॅपवर नोंदविणेत आलेल्या तक्रारींचा आढावा घेतला असता, ४ कर्मचाऱ्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या विभागाशी निगडीत प्राप्त तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. ही बाब अत्यंत गंभीर व कार्यालयीन शिस्तीस बाधा पोहोचविणारी आहे. यासंदर्भात दोन तक्रारी आठ आणि दहा दिवस प्रलंबित ठेवल्याने प्रेम पवार (विभागीय कार्यालय क्रमांक पाच) यांना अनुक्रमे ८०० रुपये आणि १ हजार प्रमाणे एकूण १ हजार ८०० रुपये दंड केला आहे. एक तक्रार ८ दिवस प्रलंबित ठेवल्याने नगररचना विभागाकडील इम्रान बागवान यांना ८०० रुपये दंड तर एक तक्रार ५ दिवस प्रलंबित ठेवल्याने विभागीय कार्यालय क्रमांक सहाकडील अजिंक्य विपत यांना ५०० रुपये दंड केला आहे. भूमी व मालमत्ता कार्यालयाकडील रघुनाथ सुरवसे यांना एक तक्रार नऊ दिवस प्रलंबित ठेवल्याप्रकरणी ९०० रुपये दंड आकारला आहे. आपली तक्रार पोर्टल/माय सोलापूर अॅपवरील



नागरीकांच्या तक्रारीचे निराकरण मुदतीत न करणे, प्रलंबित ठेवणेच्या, केलेल्या कार्यवाहीची माहिती अद्ययावत न करणे या कामकाजातील निष्काळजीपणाच्या गैरवर्तनासाठी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदीनुसार आर्थिक दंड करण्यात येत आहे. यापुढे अॅपवरील तक्रार निवारणास विलंब झाल्यास प्रती दिवस १०० रुपये या प्रमाणे आर्थिक दंड आकारण्यात येत आहे. संबंधित कर्मचाऱ्यांना करण्यात आलेल्या दंडाची रक्कम त्यांच्या मासिक वेतनातून एकरकमी वसूल करण्यात येणार आहे, असे श्री. पवार यांनी आदेशात म्हंटले आहे.

## आता पोर्टलवर पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक

**सोलापूर दि. ११ ऑगस्ट-**

महापालिकेकडून शहराला होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक आता पोर्टलवर उपलब्ध करण्यात आले आहे. यामुळे नागरिकांना घरबसल्या पाणीपुरवठा संदर्भात माहिती जाणून घेता येणार आहे. आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार सोलापूर महापालिका प्रशासनाने विविध सोयी सुविधा ऑनलाईन केल्या आहेत. त्या अंतर्गतच महापालिकेने आता सोलापूर शहराला होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक ही पोर्टलवर उपलब्ध केले आहे. महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाकडून शहराचे दैनंदिन पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक हे सोलापूर महानगरपालिकेच्या पब्लिक पोर्टल https://watersupply.solapurcorporation.org वर उपलब्ध करण्यात आले आहे. तथापि वीज पुरवठा खंडीत झाल्यास अथवा तांत्रिक बिघाडामुळे वेळापत्रकात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तरी नागरीकांनी या ऑनलाईन सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य अभियंता सतीश एकबोटे यांनी केले आहे.

## हर घर तिरंगा अभियानात ६० हजार विद्यार्थ्यांचा सहभाग



## मनपा प्राथमिक शिक्षण मंडळातर्फे विविध उपक्रम

- तिरंगा प्रदर्शन, रांगोळी स्पर्धांद्वारे बंधुत्व अन् देश प्रेमाचा दिला संदेश

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय ध्वजाबद्दल आदरभाव निर्माण करण्यासाठी तसेच देशाभिमान जागृत करण्यासाठी हर घर तिरंगा अभियान अंतर्गत महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले. सुमारे २९५ शाळांमधील अंदाजे ६० हजार विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला.

तिरंगा प्रदर्शन, शाळा भिंती सजवणे व फलक सजवणे, रांगोळी स्पर्धा, तिरंगा राखी बनविणे आदी उपक्रमाद्वारे बंधुत्व अन् देश प्रेमाचा संदेश देण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार व उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा प्राथमिक शिक्षण विभागाच्या संयोजनातून हे उपक्रम राबविण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना, सर्जनशीलता आणि सामूहिक सहभागाची जाणीव दृढ झाली.

भारताच्या स्वातंत्र्याचा महोत्सव आणि राष्ट्रीय ध्वजाबद्दल आदरभाव निर्माण करण्यासाठी हर घर तिरंगा या मोहिमेच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या कार्यक्षेत्रातील तसेच खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदवला.या अभियानात एकूण २९५ शाळांचा सहभाग राहिला असून अंदाजे ५० ते ६० हजार विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले. विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी देशभक्तीचा संदेश जनमानसात पोहोचवला.

**विविध शाळांमध्ये हे उपक्रम राबविले**

शाळा भिंती सजवणे व फलक सजवणे - शाळांच्या भिंती आणि माहितीफलक तिरंग्याच्या रंगांनी आणि प्रेरणादायी घोषवाक्यांनी सजविण्यात आले. तिरंगा प्रदर्शन - विद्यार्थ्यांनी तिरंगा विषयक चित्रे, हस्तकला व पोस्टरच्या माध्यमातून भव्य प्रदर्शन भरवले. रांगोळी स्पर्धा - राष्ट्रीय एकतेचे प्रतीक असलेल्या तिरंग्याच्या रंगांत विविध रांगोळ्या साकारल्या गेल्या. तिरंगा राखी बनविणे - रक्षाबंधनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी तिरंगा रंगातील राख्या तयार करून बंधुत्व आणि देशप्रेमाचा संदेश दिला.

## अकलूज पोलिसांकडून तपासातील मिळालेल्या वस्तू व दागिने फिर्यादीस परत

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ११ ऑगस्ट-**

येथील पोलीसांनी त्यांच्याकडे दाखल असलेल्या व तपासात हस्तगत केलेल्या १३ गुन्ह्यातील १३ मूळ फिर्यादीना तब्बल १८ लाख ३० हजार ८०० रूपये किंमतीचे सोने, चांदीचे दागिन्यासह किमती मुद्देमाल मूळ परत केल्याने पोलिसांवरील विश्वास वाढण्यास मदत होणार आहे.

अकलूज पोलिस ठाणे आवारात शनीवारी झालेल्या या कार्यक्रमात सन २०१२ पासून ते २०२५ पर्यंतच्या चोरीच्या १३ गुन्ह्यातील वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक विश्लेषण, गोपनीय बातमीदार, तपास कौशल्य, सीसीटिव्ही वरून तपास करून हस्तगत केलेले चोरीस गेलेले १९७ ग्रॅम सोन्याचे अंगठी,बोरमाळ,मंगळसूत्र, गंठण, पाटल्या,बांगड्या,डोरले,कर्णफुले आदी दागिने,२४१ ग्रॅम चांदीचे पैजण, जोडवी व करंडा असे दागिने शिवाय रोख रक्कम १ लाख ९६ हजार ८०० मिळून तब्बल १८३०८०० रूपये किंमतीचा मुद्देमाल त्या त्या गुन्ह्यातील फिर्यादीस/मूळ मालकास परत केले.




पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर,अकलूज विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगांवकर यांचे मार्गदर्शनाखाली या सर्व गुन्ह्यातील फिर्यादी व मूळ मालक वांना बोलावून घेऊन त्यांना ते परत करण्यात आले. यावेळी अकलूज पोलीस निरीक्षक निरज उबाळे, सहा.पोलीस निरीक्षक योगेश लंगुटे, गणेश चौधरी, पोलीस उपनिरीक्षक सुधीर खारगे, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक जरे, पोलीस निरीक्षक विकास दिंडुरे, सहा.पोलीस निरीक्षक महारुद्र परजने, सहा.पोलीस निरीक्षक विजय गोसावी व पोलीस अंमलदार पोहेकों सुहास क्षीरसागर, पोहेकों विक्रम घाटगे, पोहेकों शिवकुमार मदभावी, पोकों सोमनाथ माने, पोकों मोहन मस्के हजर होते. यावेळी फिर्यादी यांच्याकडून पोलीस प्रशासनाचा सत्कार करण्यात आला.



## आपत्तीत आपदा मित्र-सखींची भूमिका महत्त्वाची

- शक्तीसागर ढोल यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

नैसर्गिक अथवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात अडकलेल्या व्यक्तींचे बचाव कार्य करताना प्रशिक्षित व्यक्तींची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. योग्य माहिती, योग्य व्यक्तीला, योग्य वेळी पोहोचवणे हेच आपत्ती व्यवस्थापनाचे मूलभूत सूत्र असल्याचे प्रतिपादन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी केले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग, सोलापूर यांच्यावतीने बारा दिवसीय 'आपदा मित्र-सखी' प्रशिक्षण आयोजित करण्यात आले असून, हे प्रशिक्षण आयटस स्पोर्ट्स सेफ्टी प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामार्फत महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, सोलापूर येथे सुरू आहे. या प्रशिक्षणात होडी चालक-मालक, सामाजिक संस्था प्रतिनिधी, आशा वर्कर्स, महाविद्यालयीन युवक-युवती अशा विविध स्तरातील स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला आहे. प्रशिक्षणामध्ये आपत्तीची ओळख, आपत्तीचे प्रकार, उझठ, जखमींना सुरक्षित ठिकाणी हलवणे, स्ट्रेचर तयार करणे, प्राथमिक उपचार, प्रशासनाशी संपर्क, गर्दी नियंत्रण, पुरात बचाव कार्य, बोट हाताळणी, डोंगराळ भागातील बचावासाठी दोरीचा वापर, गाठी बांधणी यासारख्या विषयांवर मार्गदर्शन व प्रात्यक्षिके दिली जात आहेत. प्रशिक्षणाचे समन्वयन इंडियन रेस्क्यू अॅकॅडमीचे फैय्याज मुलाणी, प्रशिक्षक प्रशांत शेंडे, प्रदीप ऐनापुरे आणि मोनिका शिंपी हे करत आहेत. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या आपदा मित्र-सखी यांना प्रमाणपत्र व सुरक्षा कीट देण्यात येणार आहे.

पंढरपूर येथील भिमा नदीत वाहून जाणाऱ्या व्यक्तींना वाचवण्यासाठी मी पूर्वी प्रयत्न केले होते. तेव्हा कोणतेही प्रशिक्षण नव्हते. आता शास्त्रीय पद्धती समजल्यामुळे स्वतःला सुरक्षित ठेवत इतरांचा जीव वाचवू शकतो, याचा आत्मविश्वास आला आहे.

**- गणेश कांबळे,**
**प्रशिक्षणार्थी आपदा मित्र-सखी**

## महापालिकेकडील काम पूर्णत्वाचा दाखल्यासाठी आता ऑनलाईन अर्जाची नवी सुविधा

- महापालिका आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

सोलापूर महापालिकेकडील नगर अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियंता व कार्यकारी अभियंता विद्युत यांचेकडील काम पूर्णत्वाचा दाखला आता ऑनलाईन अर्जाची नवी सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर महानगरपालिकेकडून अंतिम लेआऊटसाठी रस्ते कामाकरिता नगर अभियंता, ड्रेनेज व पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन करीता सार्वजनिक आरोग्य अभियंता तसेच दिवाबत्ती करीता कार्यकारी अभियंता विद्युत यांचेकडे कडील आवश्यक असणारा काम पूर्णत्वाचा दाखला (वर्क कम्प्लीट सर्टिफिकेट) आता पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने मिळवता येणार आहे. या सुविधेमुळे अर्जदारांना महापालिकेच्या कार्यालयात वारंवार ये-जा करण्याची गरज राहणार नाही तसेच संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि वेगवान होणार आहे.

यासाठी महापालिकेच्या https://allnoc.solapurcorporation.org या अधिकृत वेबसाईटवरून अर्ज करता येईल. अर्ज करताना अर्जदाराचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, प्राथमिक लेआऊट क्रमांक व दिनांक, जागेची माहिती तसेच लेआऊट ज्या झोनमध्ये सर्वाधिक भाग येतो तो झोन क्रमांक भरावा लागेल. या प्रक्रियेत ३ टक्के सुपरव्हिजन चार्जेस ऑनलाईन भरावे लागतील.

अर्जासोबत ही कागदपत्रे आवश्यक - टॅक्स नाहरकत प्रमाणपत्र, ७/१२ उतारा, मंजूर प्राथमिक लेआऊट नकाशाची प्रत सर्व कामांचे पूर्वगणनपत्रक (PDF व Excel स्वरूपात) सर्व कागदपत्रे अपलोड झाल्यानंतरच अर्ज स्वीकारला जाईल आणि त्याची पोहोच अर्जदार डाउनलोड करू शकतील. तसेच एसएमएसद्वारे माहितीही पाठविली जाईल. प्रत्येक अर्जदाराला वैयक्तिक Dashboard उपलब्ध करून देण्यात आले आहे, ज्यामध्ये त्यांनी केलेल्या अर्जांची सद्यस्थिती पाहता येईल. याशिवाय, अर्जदार आपल्या कामाची प्रगतीसुद्धा ऑनलाईन अपलोड करू शकतात. नगर अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियंता व कार्यकारी अभियंता विद्युत यांच्या कार्यालयातील संबंधित सक्षम अधिकाऱ्यांची मंजुरी मिळाल्यानंतर काम पूर्णत्वाचा दाखला ऑनलाईन डाउनलोड करता येईल. सेवा हमी अंतर्गत हा दाखला १५ दिवसांच्या सेवा हमी उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. हा दाखला मिळाल्यानंतर अर्जदार बीपीएमएस प्रणालीद्वारे अंतिम लेआऊटसाठी प्रस्ताव दाखल करू शकतील. महापालिकेच्या या नव्या डिजिटल उपक्रमामुळे वेळ, श्रम आणि कागदपत्रांच्या प्रक्रियेत मोठी बचत होईल, अशी अपेक्षा डॉ ओम्बासे यांनी व्यक्त केली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# पवारांचे पोकळ 'पंच'तंत्र!

लाल मातीतल्या किंवा आखाड्यातल्या कुस्तीचा जमाना आता राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर मागे पडत चालला असल्याने या कुस्तीच्या खेळाचे सारेच नियम नव्या मॅटवरच्या कुस्ती स्पर्धेत चालत नाहीत. आखाड्यातल्या कुस्तीत, धोबीपछाडसारखे डावपेच खेळून प्रतिस्पर्ध्याची पाठ जमिनीला लावणारा पैलवान विजयी ठरत असला, तरी मॅटवरच्या, नव्या जमान्यातल्या कुस्तीत एवढा एकच नियम विजयासाठी पुरेसा नसतो. या दोन्ही प्रकारच्या कुस्तीचे नियम वेगळे असतात, खेळायची पद्धतही वेगळी असते, विजयाचे निकष वेगळे असतात आणि मैदानही वेगळे असते. मॅटवरची कुस्ती किंवा फ्रीस्टाईल कुस्ती बंदिस्त मैदानात मॅटवरच खेळली जाते आणि त्याची आंतरराष्ट्रीय मानके ठरलेली असतात, ती गुणांच्या आधारावर खेळली जाते. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनीही लाल मातीतील कुस्तीगीरांच्या संघटनेचे नेतृत्व केले होते. बहुधा त्यामुळेच धोबीपछाड हा त्यांचा आवडता डाव असल्याची चर्चा राजकारणाच्या आखाड्यातही होत असते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना, दूरदर्शन या सरकारी चित्रवाणीवरील एका मुलाखतीत स्वत: पवार यांनीही त्याची तशी कबुली दिली होती आणि लोकांच्या अशा समजुतीची आपण मजा अनुभवत असतो, असेही तेव्हा त्यांनी अभिमानाने सांगितले होते. त्या मुलाखतीनंतर शरद पवार यांचे राजकारण अनाकलनीय आहे असा समज दृढ होऊ लागला. त्यांच्या राजकारणाचा हा प्रवास, आजही, त्यांच्या वयाच्या या टप्प्यावरही तशीच मजा अनुभवत सुरू असल्याने, अशी गंमत करणे हा आपल्या राजकारणाचाच एक भाग आहे, असाही त्यांचा समज असावा. राजकारणाच्या उमेदीच्या काळात याच राजकारणाचा वापर करून त्यांनी राजकारणाचा आखाडा गाजविला आणि त्यांच्या अनाकलनीय राजकारणाचा फटका बसलेल्या अनेकांना, जमिनीला पाठ लागेपर्यंत पराभव झाल्याचे लक्षातही आले नाही. धोबीपछाड देऊन प्रतिस्पर्ध्यास आखाड्याबाहेर घालविण्याचे त्यांचे कौशल्य तेव्हा अनेकांनी मान्य केल्याने, आजही तीच स्थिती असावी असा काहींचा समज असला, तरी आता कुस्तीचे नियमच बदलले आहेत. लाल मातीच्या आखाड्यातल्या कुस्तीचे नियम आता मॅटवरच्या कुस्तीत चालत नाहीत आणि आखाड्यातील कुस्तीच्या नियमांतील लवचीकपणादेखील या प्रकारात खपवून घेतला जात नाही. पवार यांनी दीर्घकाळ राजकारणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातील अनेक खेळांच्या संघटनांचेही नेतृत्व केल्याने, त्यांच्या राजकारणात प्रतिस्पर्ध्यास खेळविण्यावरही बराचसा भर असे. मात्र, गेल्या सुमारे दशकभरापासून पवारांच्या आवडत्या कुस्ती प्रकाराचे डावपेच कालबाह्य झाले असून राजकारणाच्या आखाड्यातील कुस्तीतही त्यांच्यासमोर शड्डू ठोकून उभे राहण्याची उमेद असलेले नवे कसलेले मल्ल आता प्रतिस्पर्धी गटांतही तयार झाल्याने पवारांची सद्दी संपत चालली आहे. कुस्तीच्या खेळात प्रतिस्पर्ध्यावरील पकड मजबूत असावी लागते, हे पवारांना पूर्वी चांगले ठावूक होते. आता मात्र त्यांचीच पकड सैल होत चालल्याने, कुस्तीच्या आखाड्यात उतरल्यानंतरही धरसोडीचाच प्रकार अधिक होत असून यातही त्यांना बरेचदा माघारच घ्यावी लागल्याने, तडजोडीची कुस्ती किंवा लुटुपुटूची कुस्ती खेळून मैदानात टिकून राहण्यासाठी त्यांची सुरू असलेली धडपड आता स्पष्ट दिसू लागली आहे. नव्या नेतृत्वाला संधी देऊन पक्षावरील ताबा सोडून केवळ सल्लागाराची भूमिका बजावण्याचा अजित पवार यांनी त्यांना दिलेला सल्ला धुडकावूनही त्यांनी पक्षावर ताबा टिकविण्यासाठी घेतलेल्या भूमिकेचे तेव्हा काहीसे कौतुक झालेदेखील असेल, पण त्यापायीच पक्ष फुटला आणि तडजोडीच्या राजकारणासाठी धरसोडीचे अनेक डाव खेळूनही यशस्वी ठरले नाहीत हेदेखील स्पष्ट झाले. सत्ता हे कोणाच्याही राजकीय कारकीर्दीचे अंतिम उद्दिष्टच असते. दीर्घकाळ राजकारणात राहून वेगवेगळी सत्तापदे उपभोगलेले शरद पवार हे त्यास अपवाद असतील असेही नाही. कदाचित त्यामुळेच सत्तेच्या सान्निध्यात राहण्यासाठी त्यांना कराव्या लागणाऱ्या तडजोडींपायी जुन्या कुस्तीचे लवचीक नियम अधिक लवचीक करण्याची वेळही त्यांच्यावर अनेकदा आली. भाजपासोबत सत्ता स्थापन करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे पितळ खुद्द अजित पवारांनीच अनेकदा उघडे पाडल्याने, पवारांच्या जुन्या, अनाकलनीय राजकारणातील त्यांनाच वाटणारी गंमतही आता सपक झाली आहे आणि त्यांच्या राजकारणाचा बराचसा भाग विनोदी वाटू लागला आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणुकीत मत चोरी झाल्याचा आरोप करत निवडणूक आयोगाच्या नावाने बोटे मोडण्यास सुरुवात केल्यावर, राजकारणातील सर्वांत मोठा ॲटम बॉम्ब फुटल्याच्या अपेक्षेने पुढच्या घडामोडींकडे पाहणाऱ्यांचा बराचसा हिरमोड झाल्याचे लक्षात येताच शरद पवार पुढे सरसावले. एखादी नवी, बिनबुडाची लोणकढी पुढे आणली तर सध्याच्या संशय निर्माण करण्याच्या वातावरणात आपलेही घोडे पुढे दामटणे शक्य होईल, असा प्रयत्न शिवसेनेच्या उबाठा गटाचे खासदार संजय राऊत नेहमीच करत असतात. त्याकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नसले किंवा त्यांच्या त्या प्रयत्नांतून साध्या लवंगी फटाक्याचाही आवाज निघत नसला, तरी बातम्यांचा रतीब टाकण्यासाठी भुकेल्या वाहिन्यांची भूक भागविणारा चटकदार मसाला मिळत असल्याने वाहिन्यांवर मात्र अशा प्रयत्नांना सर्वांत मोठ्या बातमीची जागा मिळते हे स्पष्ट झाले आहे. राहुल गांधी यांना त्या कथित ॲटम बॉम्बची कल्पनादेखील संजय राऊत यांच्या तंत्रावरूनच सुचली असावी, असे एक सूचक विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्यावर पवार यांनाही त्याचे अनुकरण करण्याची अनावर इच्छा झाली असावी. अन्यथा, शेंडाबुडखा नसलेली एक लोणकढी बातमी सोडून त्यांनी राहुल गांधींच्या फुसक्या ॲटम बॉम्बच्या चर्चेची हवा काढून घेण्याचा प्रयत्न केलाच नसता. पवार यांच्या अनाकलनीय राजकारणाची पूर्वीची सद्दी केव्हाच संपल्याने, ते स्वतः अजूनही त्याची कितीही गंमत अनुभवत असले, तरी त्याचेदेखील गांभीर्य आता राहिलेले नाही. मुंबईतील तेराव्या बॉम्बस्फोटाची अफवा पसरवून आपल्याच अनाकलनीय राजकारणाची गंमत अनुभवण्याचा त्यांचा प्रयत्न तेव्हा त्यांच्या जसा अंगाशी आला होता, तसाच भीमा कोरेगाव प्रकरणात नाहक काही जणांभोवती संशय पेरून गंमत अनुभवण्याचा प्रकार त्यांना फारसा पेलता आला नव्हता. हिंदू दहशतवादाचा भ्रम जनतेमध्ये पसरविण्याचा काँग्रेसच्या कटात सहभागी होण्याचा त्यांचा प्रयत्नही फारसा यशस्वी ठरला नव्हता. निवडणुकीच्या काळात दोघे जण आपल्याला भेटले व १६० जागांवर विजय मिळवून देण्याची हमी त्यांनी दिली, हा पवारांचा नवा 'पंच'देखील फुसका ठरला आहे. कुस्तीच्या खेळात पंच मारणे हा फाऊल समजला जातो. पवार यांनी ज्या कुस्तीच्या खेळाचे नेतृत्व केले, त्या खेळात तर लवचीक नियम असूनही पंच मारण्यास परवानगीच नाही. त्यामुळे आखाड्यातील कुस्तीत हा वेगळाच पंच मारण्याचा प्रयत्न म्हणजे फाऊल ठरला आहेच; पण त्यांच्या कालपरवापर्यंत अनाकलनीय वाटणाऱ्या राजकारणाचा फोलपणाही उघडा पडला आहे. जेव्हा प्रतिस्पर्धीच नसतो, तेव्हा एखादा मल्ल आपल्याच मस्तीत शड्डू ठोकत आखाड्यात उतरतो, पण तेव्हाच्या राजकीय आखाड्यातील तशी परिस्थिती आता राहिलेली नाही. आता कुस्तीचे आव्हान स्वीकारणारेच नव्हे, तर आव्हान देणारे कसलेले आणि नव्या दमाचे मल्ल राजकारणात उतरलेले आहेत आणि जुना धोबीपछाडचा डाव कुचकामी ठरतो, हे त्यांनी सिद्धही केले आहे. निवडणुकीत विजय मिळवून देण्यासाठी दोघांनी आपली भेट घेतली, त्यांची आपण राहुल गांधींशी गाठ घालून दिली आणि अखेर दोघांनीही हा देकार नाकारला, हा त्यांचा बिनबुडाचा दावा बातम्यांसाठी भुकेल्या वाहिन्यांनी गांभीर्याने लोकांसमोर ठेवला, अपेक्षेप्रमाणे त्यांचा तो फटाकाही राहुल गांधी यांच्या फुसक्या बॉम्बसारखाच फुसका ठरला; तरीही पवारांपाठोपाठ जाग आलेल्या संजय राऊत यांनीही तसाच दावा केला आहे. म्हणजे, आता राऊत यांच्या रांगेत खुद्द राहुल गांधी आणि शरद पवारदेखील दाखल झाले आहेत, एवढेच!

## आंतरराष्ट्रीय

# बांगलादेश, म्यानमारमधील संकट वाढणार?

प्रा. जयसिंग यादव



२०२१ मध्ये झालेल्या उठावानंतर म्यानमार गृहयुद्धात बुडाला आहे. लष्करी जुंटा गटाला सत्तेवरून हटवण्यासाठी अनेक सशस्त्र गट लढत आहेत. गेल्या दोन वर्षांमध्ये जुंटाने देशाच्या जवळजवळ अर्ध्या भागावरील नियंत्रण गमावले आहे. तिथे जातीय बंडखोर सैन्य आणि प्रतिकार गट देशाचा एकामागून एक भाग ताब्यात घेत आहेत. दुसरीकडे, ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशमधील शेख हसीनांचे सरकार अराजकांनी उलथवून टाकल्यानंतर बांगलादेशमध्ये अराजकता पसरली. मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकार आतापर्यंत सत्तेत आहे. त्याने अवामी लीग आणि त्यांच्या सहयोगी पक्षांविरुद्ध सूड उगवण्याच्या कारवाया सुरू केल्या आहेत. कट्टरपंथी इस्लामिक शक्ती तिथे अधिक मजबूत झाल्या आहेत. युनूस सरकारने हसीना यांच्या काळात तुरुंगात असलेल्या दहशतवादी संघटनेच्या अन्सारुल्ला बांगला टीमचे प्रमुख जसीमुद्दीन रहमानीसारख्या कैद्यांना सोडले. लष्कराच्या दबावाला न जुमानता युनूस यांनी निवडणूक रोडमॅप जाहीर केलेला नाही. ५ ऑगस्ट रोजी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात त्यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये होणाऱ्या निवडणुकांवर भाष्य केले; परंतु जर 'सर्व काही व्यवस्थित झाले' तर अशी 'जर, तर'ची भाषा त्यांनी वापरली. मुख्य निवडणूक आयुक्त एएमएम नसिरुद्दीन यांनी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या संसदीय निवडणुकांची पुष्टी केली; परंतु अनेक अडचणी पुढे केल्या. युनूस हे या मार्गातील सर्वांत मोठे अडथळे मानले जातात.

दोन महिन्यांपूर्वी लंडनमध्ये बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी)चे कार्यकारी अध्यक्ष तारिक रहमान यांच्याशी झालेल्या बैठकीत युनूस यांनी फेब्रुवारीच्या सुरुवातीला निवडणुका होण्याची शक्यता व्यक्त केली होती; परंतु तोपर्यंत काही आवश्यक सुधारणा पूर्ण कराव्यात अशी अट घातली होती. यापूर्वी त्यांनी जून २०२६ मध्ये निवडणुका घेऊ असे भाष्य केले होते. अंतरिम सरकारचे प्रमुख म्हणून त्यांनी सत्ता घेताच तीन महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे जाहीर केले होते; परंतु हंगामी सरकारचे प्रमुख म्हणून कारभार हाती घेऊन एक वर्षाहून अधिक काळ झाला असला, तरी त्यांना आता खुर्चीचा मोह सुटत नाही, हे दिसते. युनूस जागावाटपावर 'बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी' (बीएनपी)शी जोरदार सौदेबाजी करत आहेत. शेख हसीना यांचे सरकार असताना 'बीएनपी' पक्षाच्या अनेक नेत्यांना न्यायालयाने देशद्रोही कारवायांबद्दल दोषी ठरवून शिक्षा दिली होती. अंतरिम सरकारच्या काळात या सर्वांची सुटका करण्यात आली. त्यात युनूस यांचा मोठा वाटा होता. त्यांना आता त्याची परतफेड हवी आहे. ३०० जागांच्या संसदेतील किमान ५० जागा 'जमात-ए-इस्लामी'साठी आणि तितक्याच जागा 'नॅशनल सिटिझन्स पार्टी' (एनसीपी) आणि इतर लहान इस्लामिक पक्षांसाठी सोडाव्यात अशी त्यांची इच्छा आहे. 'बीएनपी'ने पूर्वी 'जमात-ए-इस्लामी'शी युती केली होती; पण आता अनेक नेते स्वतंत्रपणे निवडणूक लढवू इच्छितात.

'जमात-ए-इस्लामी'चा इतिहास वादग्रस्त आहे. कारण त्यांनी १९७१ च्या मुक्ती युद्धात पाकिस्तानी सैन्याला पाठिंबा दिला होता. त्यामुळे, अनेक 'बीएनपी' नेते त्यांच्यापासून दूर राहून आपली राष्ट्रवादी प्रतिमा मजबूत करू इच्छितात; परंतु 'जमात-ए-इस्लामी' आणि राष्ट्रवादी हे युनूसचे मोठे समर्थक आहेत. राष्ट्रवादीची स्थापना हसीना यांना सत्तेवरून काढून टाकणाऱ्या विद्यार्थी-युवा ब्रिगेडने केली होती. युनूस यांची महत्त्वाकांक्षा वाढली असून, त्यांना अध्यक्ष व्हायचे आहे. राष्ट्रपती बनण्यासाठी ते एक मजबूत युती तयार करू इच्छितात. अध्यक्षपदामुळे त्यांना दैनंदिन कारभाराच्या ताणाशिवाय धोरणांवर प्रभाव पाडण्याची संधी मिळेल. हसीना यांच्या कार्यकाळात त्यांच्याविरुद्ध खटले दाखल झाले होते. हे त्यांना भविष्यातील कायदेशीर कारवाईपासूनही मुक्त करेल; पण 'अवामी लीग'वर निवडणूक लढवण्यास बंदी घातली गेल्यास युनूस निष्पक्ष निवडणुका घेऊ शकतील का, हा प्रश्नच आहे. हसीना यांच्या कथित हुकूमशाही राजवटीच्या नावाखाली अवामी लीगला निवडणूक लढवण्यास बंदी घालणे म्हणजे १९८० च्या दशकात आणिबाणीमुळे काँग्रेसला निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यासारखेच असेल.

दुसरीकडे, म्यानमारची लष्करी सत्ता सांभाळणारे जुंटा घाईत आहेत. जुंटा प्रमुख वरिष्ठ जनरल मिन आंग ह्याईंग यांनी जुलैच्या अखेरीस आणिबाणी उठवली आणि डिसेंबर-जानेवारीमध्ये टप्प्याटप्प्याने राष्ट्रीय निवडणुका घेण्यास परवानगी दिली. २००८ च्या संविधानानुसार, आणिबाणी उठवल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडणुका घेणे आवश्यक आहे. जुलैमध्ये राष्ट्रीय संरक्षण आणि सुरक्षा परिषदेने राज्य प्रशासन परिषद विसर्जित केली. त्या जागी राज्य सुरक्षा आणि शांतता आयोगाची स्थापना करण्यात आली. त्याचे नेतृत्व ह्याईंग यांनी केले. ते कार्यवाहक अध्यक्षदेखील आहेत. 'द ग्लोबल न्यू लाईट ऑफ म्यानमार'मध्ये प्रकाशित झालेल्या वृत्तानुसार, हा आयोग संरक्षण, सुरक्षा आणि शांततेसाठी काम करेल आणि बहुपक्षीय लोकशाही निवडणुका सुनिश्चित करेल. या आयोगाकडे कार्यकारी, कायदेविषयक आणि न्यायिक अधिकार असतील. ह्याईंग यांच्याकडे लष्करप्रमुख आणि कार्यवाहक अध्यक्षपद असल्याने हे बदल आंतरराष्ट्रीय समुदायाला आकर्षित करण्यासाठी केवळ एक देखावा आहे हे स्पष्ट आहे. जुंटा निष्पक्ष निवडणुका घेऊ शकेल का, याबाबत अनेकांना शंका आहे. कारण आंग सान सू की यांच्या 'नॅशनल लीग फॉर डेमोक्रसी' आणि वांशिक बंडखोर गटांसारखे लोकशाही पक्ष निवडणुकांवर बहिष्कार टाकू शकतात. ह्याईंग यांनी अलिकडेच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला. ट्रम्प प्रशासनाने बर्मी लष्करी सहयोगींच्या काही कंपन्यांवरील निर्बंध उठवले. त्यामुळे ह्याईंग यांना प्रोत्साहन मिळाले.

बांगलादेश आणि म्यानमारमधील निवडणुका राजकीय स्थैर्य आणतील आणि भारताला नवीन राज्यकर्त्यांशी मजबूत संबंध निर्माण करण्यास मदत करतील, असा आशावाद अनेक जण बाळगून आहेत. भारतीय राज्यकर्त्यांनाही त्याचीच प्रतीक्षा आहे. आज भारताचा प्रत्येक शेजारी अंतर्गत समस्यांमुळे अस्वस्थ असून इतर देशांशीही सतत संघर्ष अनुभवत आहे. याचा परिणाम भारतावरही होत आहे. कारण पैसा, रोजगार, शांतता, स्थैर्य यापैकी कोणत्या तरी कारणासाठी अनेक प्रांतांमध्ये बंडखोर, अतिरेकी किंवा नक्षलवादी सीमावर्ती भागात हिंसाचार घडवत उपद्रवमूल्य वाढवतात. प्रसंगी भारतातही शिरतात. त्यांच्यापासून आपल्या देशाला धोका आहेच. मात्र अशा प्रकारे निर्माण होत असलेली अस्वस्थता या शेजारी देशांमध्ये लोकशाही नांदल्यास कमी होऊ शकते. त्यामुळे भारताची डोकेदुखी कमी होईल; पण असे होण्याची शक्यता कमी आहे. बांगलादेशमध्ये 'बीएनपी', 'जमात-ए-इस्लामी', 'राष्ट्रवादी आणि इतर इस्लामिक पक्षांचे युनियन बनवून युनूस राष्ट्रपती झाले, तरी त्याचा परिणाम त्या देशात अराजकता येण्यात होणार आहे. 'अवामी लीग'ला निवडणुकीतून बाहेर ठेवले गेले, तर ही निवडणूक निष्पक्ष मानली जाणार नाही. 'अवामी लीग'ने देशात अर्ध्याहून अधिक काळ राज्य केले आहे आणि त्यांची मोठी मतपेढी आहे. निवडणुका निष्पक्ष असतील आणि 'अवामी लीग'ला निर्भयपणे सहभागी होण्याची संधी मिळाली तर शेख हसीनासह त्यांचे बहुतेक नेते बांगलादेशमध्ये परतले असते; परंतु त्यांच्या मनात भीती आहे की बांगलादेशमध्ये परतल्यानंतर त्यांच्या जीविताला धोका होण्याची शक्यता आहे.

या पृष्ठभूमीवर सुरक्षिततेची खात्री होत नाही. तोपर्यंत 'अवामी लीग'चे नेते तेथे परतणार नाहीत. परिणामी, बांगलादेशमध्ये कट्टरतावाद्यांची सत्ता येण्याची दाट शक्यता आहे. कट्टरतावाद्यांच्या हाती सत्ता जाण्याने भारताची डोकेदुखी वाढणार आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# आदर्श गावांतील अभिनव ठराव

महाराष्ट्रातील अनेक ग्रामपंचायतींनी घेतलेले अनोखे ठराव केवळ कागदापुरते मर्यादित न राहता गावाच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे ठरले आहेत. अशा ठरावांमुळे गावकऱ्यांच्या जीवनमानात, लोकशाही प्रक्रिया, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, आर्थिक विकास स्वनिर्मित उद्योग शेतीपूरक व्यवसाय अशा अनेक बाबतीत प्रत्यक्ष फायदे झाले आहेत. मूल्याधिष्ठित गाव म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्याच्या साताऱ्याची ओळख आहे. यंदाच्या महाराष्ट्र दिनी या गावच्या ग्रामसभेत शिवीमुक्त गाव करण्याच्या प्रस्तावाला एकमताने मान्यता दिली. कोणीही महिलांचा अपमान करणारी भाषा वापरल्यास, शिवी दिल्यास त्याच्याकडून ५०० रुपये दंड आकारला जाईल. दंड न भरल्यास संबंधित व्यक्तीला ग्रामपंचायतीकडून कोणतेही सरकारी दाखले दिले जाणार नाहीत, असा निर्णय घेण्यात आला. गावातील वादावादीत आई-बहिणींवरून अपमानास्पद शिव्यांचा वापर वाढत असल्याने दीड हजार लोकसंख्या असलेल्या साताराच्या ग्रामपंचायतीने महिलांच्या सन्मानासाठी अभिनव आणि ठोस पाऊल उचलले. ग्रामपंचायतीचे सरपंच गजानन गुळधे यांनी यासाठी पुढाकार घेतला. भांडणे होत असतील, तर ती समजुतीने मिटवावी, पण स्त्रियांबाबत अपमानास्पद शब्दप्रयोग यापुढे खपवून घेतला जाणार नाही, असा संदेश त्यांनी ग्रामसभेत दिला. सुरुवातीला काहींनी या निर्णयाला विरोध दर्शविला, मात्र गावातील शिक्षक, आरोग्य सेविका व ज्येष्ठ नागरिकांनी योग्य समज दिल्याने सगळ्यांनी त्यास पाठिंबा दिला. या सकारात्मक निर्णयामुळे गावात नव्या पिढीवर चांगले संस्कार होतील या प्रस्तावाला शिवीमुक्त गाव, दारूबंदी व स्वच्छता मोहीम, तंटामुक्त गाव यासारख्या इतर सामाजिक उपक्रमांची जोडही देण्यात आली.

आदर्श ग्रामपंचायत म्हणून राज्यभरात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाटोदा ग्रामपंचायतीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. देशपातळीवर पर्यावरण जलसंवर्धन ग्रामपंचायत श्रेणीत पाटोदा ग्रामपंचायतीने दुसरा क्रमांक पटकावला आहे. माजी सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्या काळात पाटोदा गावाची राज्यभर चर्चा सुरू होती. त्या काळात ग्रामविकासाचा पाटोदा पॅटर्न विविध ग्रामपंचायतींसाठी आदर्श ठरला होता. त्यांच्या सहकाऱ्यांनी पाटोदा गावाच्या आदर्शपणाचा इतिहास कायम ठेवला आहे. राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांसाठी २०२३ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाटोदा ग्रामपंचायतीने देशपातळीवर झेंडा रोवला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आदर्श ग्रामपंचायत पाटोदा-गंगापूर नेहरीला देशातून दुसऱ्या क्रमांकाचा नुकताच नॅशनल पंचायत अवॉर्ड कार्बन न्युट्रल ग्रामपंचायत पुरस्कार जाहीर झाला. नवी दिल्ली येथे हा पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार येथे पाण्याचे योग्य नियोजन, जलसंधारण आणि पर्जन्यजल व्यवस्थापनासाठी हे गाव प्रसिद्ध आहे. शेतकऱ्यांनी सामूहिकरीत्या जलसंधारणाचे काम केले. गावात ओढे, तलाव आणि बंधारे बांधून पाण्याची उपलब्धता वाढवण्यात आली. पिण्याच्या पाण्याची सोय, सिंचनाची सोय आणि जमिनीची सुपीकता वाढली आहे. धुळे जिल्ह्यातील रोहिणी ग्रामपंचायत ग्रामीण ई-शासनाचा आदर्श रोहिणी गावात डिजिटल सेवा अगदी गावात पोहोचवणाऱ्या सर्व योजनांची ई-सेवा प्रणाली लागू करण्यात आली जिथून ग्रामपंचायतचे सर्व व्यवहार आजकाल इलेट्रॉनिक पद्धतीने होतात. या उपक्रमामुळे गावातील लोकांना विविध सेवांमध्ये प्रवेश सोपा झाला जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, तक्रारी, सूचना, अवघ्या ग्रामीण सेवांमध्ये सातत्य मिळाले. याच ग्रामपंचायतीने २०२५ मध्ये पुरस्कार जिंकले. गावात ९५० पेक्षा जास्त ऑनलाईन डिजिटल सेवा समावेश आहे. सोलापूर जिल्ह्यातील नराले गावाने ठराव घेऊन विधवांना रोजगारासाठी शेतीकामात संधी देण्यासोबतच जास्त योजनेत विधवांना काम मिळाल्याने महिला आत्मनिर्भर झाल्या. त्यांचा आत्मसन्मान वाढला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्होकल ते लोकल हा नारा दिल्यानंतर देशभरात याबद्दल चर्चा झाली परंतु प्रत्यक्षात किती जण हे तत्त्व मनापासून आचरणात आणतात? आपल्यापैकी अनेकांना बाहेरचं भारी वाटतं. गावातील उद्योग व्यवसायातून तयार झालेल्या वस्तूंऐवजी ऑनलाईन मागवणे, मुंबई-पुण्याच्या टॅग असलेल्या सेवांवर भरवसा ठेवणे ही आपल्या रोजच्या वस्त ूखरेदीतील सवय झाली आहे. परंतु हे करत असताना आपण आपल्याच शेजारी, गावकरी, स्थानिक व्यावसायिक आणि उद्योजकांना दुर्लक्षित करत आहोत, याची जाणीव फार थोड्यांना असते. प्रत्यक्षात आपण हा मंत्र किती प्रमाणात आचरणात आणतो, याचा विचार करण्याची गरज आहे. ही केवळ सरकारची जबाबदारी नसून सर्वांची आहे. स्थानिकांसाठी आवाज उठवणे, त्यांच्या कामावर विश्वास ठेवणे ही एक संस्कृती बनायला हवी.

९८८१७१७८२८


## दखल

# डॉ. रंगनाथन् आणि आजचे माहिती युग

प्रा. डॉ. मोहन रतकंठीवार

आजच्या माहितीच्या युगात ज्ञानाचे महत्त्व जसे वाढले आहे तसेच ज्ञानाच्या व्यवस्थापनाचे महत्त्वही अफाट वाढले आहे. या संदर्भात भारताने एक महान व्यक्तिमत्त्व दिले, डॉ. शियाली रामामृत रंगनाथन् ज्यांनी ग्रंथालयशास्त्राला एक वैज्ञानिक आणि तात्त्विक अधिष्ठान दिले. त्यांचे विचार, कार्य आणि त्यांनी घडवलेला ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम हा आजच्या डिजिटल युगातही तितकाच महत्त्वाचा व प्रभावी आहे.

डॉ. एस. आर. रंगनाथन् यांचा जन्म १२ ऑगस्ट १८९२ रोजी तामिळनाडू राज्यातील शियाली येथे झाला. गणित या विषयात पदवी घेतल्यानंतर त्यांनी ग्रंथालयशास्त्राचा अभ्यास लंडन येथे केला. ते भारतातील पहिले व्यावसायिक ग्रंथपाल ठरले. त्यांनी ग्रंथालयशास्त्राला एका शास्त्रीय पद्धतीने विकसित केले आणि ग्रंथालय प्रणालीमध्ये अनेक क्रांतिकारी बदल घडवून आणले. डॉ. एस. आर. रंगनाथन् यांनी मांडलेले ग्रंथालयशास्त्राचे पाच मूलभूत नियम आजही संपूर्ण जगभर मान्यताप्राप्त आहेत. ग्रंथ उपयोगासाठी आहेत, प्रत्येक वाचकाला त्यांचा ग्रंथ मिळाला पाहिजे, प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळाला पाहिजे, वाचकाचा वेळ वाचावा आणि ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे. हे पाच नियम केवळ ग्रंथालय व्यवस्थापनापुरते मर्यादित नसून, आधुनिक माहिती व्यवस्थापन आणि डिजिटल डेटाबेसच्या संदर्भातही लागू होतात. यामुळेच ते आजही टाईमलेस ठरतात. डॉ. रंगनाथन् यांनी विकसित केलेली कोलन वर्गीकरण पद्धती ही विशिष्ट वैज्ञानिक दृष्टिकोनातून तयार केलेली प्रणाली होती. 'पीएमईएसटी' (पर्सनालिटी, मॅटर, एनर्जी, स्पेस, टाईम) या पाच परिमाणांवर आधारित ही पद्धत आजही संशोधनग्रंथ, प्रबंध आणि तांत्रिक माहितीचे व्यवस्थापन करण्यात उपयुक्त आहे. या वर्गीकरण प्रणालीमुळे जटिल माहितीचेही सुगम आणि सुसूत्र व्यवस्थापन शक्य झाले, ज्याचा उपयोग आजच्या डिजिटल ग्रंथालय, डेटाबेस व्यवस्थापन पद्धतीमध्ये केला जातो.



डॉ. रंगनाथन् यांच्या काळात ग्रंथालयशास्त्र हे केवळ पुस्तकांचे व्यवस्थापन, वर्गीकरण आणि वाचनालय चालवणे यापुरते मर्यादित होते. परंतु आजचे ग्रंथालयशास्त्र 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र' या रूपात अधिक व्यापक आणि बहुआयामी झालेला आहे. आजच्या अभ्यासक्रमात सूचना आणि माहिती विज्ञान, डिजिटल लायब्ररी व ई-स्रोत, डेटा बेस व्यवस्थापन प्रणाली, वृत्तपत्र, संकेतस्थळे आणि सोशल मीडिया माहिती विश्लेषण, ग्रंथालय ऑटोमेशन व व्यवस्थापन प्रणाली, माहितीचा कायदेशीर, नैतिक व बौद्धिक अधिकार इ. घटकांचा समावेश झालेला आहे.

आज जगभरातील माहितीची वाढ, डिजिटल माध्यमातील प्रचंड वाढती माहिती आणि उपयोगकर्त्यांची वेगाने बदलणारी गरज यामुळे माहिती व्यावसायिकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची झालेली आहे. ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रमातून घडवले जाणारे व्यावसायिक, केवळ पारंपरिक ग्रंथपाल न राहता ते आता माहिती व्यवस्थापक, डिजिटल लायब्ररी संचालक, सामाजिक मीडिया विश्लेषक, डेटा सायंटिस्ट/कंटेंट क्यूरेटर, शैक्षणिक आणि संशोधन माहिती अधिकारी यांसारख्या भूमिका निभावत आहेत.

डॉ. एस. आर. रंगनाथन् यांची विचारसरणी आणि तत्त्वे आजच्या डिजिटल युगातही सुसंगत आहेत. त्यांनी वापरकर्तांकेंद्रित दृष्टिकोन मांडलेला होता, जो आजच्या 'यूजर एक्सपीरियन्स' संकल्पनेशी अत्यंत सुसंगत आहे. त्यांनी ग्रंथालयाला 'सजीव संस्था' म्हटले आणि आज तीच संकल्पना डिजिटल लायब्ररी, क्लाऊड बेस्ट लायब्ररी, मोबाईल लायब्ररी ॲप्समधून जिवंत झालेली आहे.

आज ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवीधरांसाठी नवी क्षितिजे खुली झालेली आहेत. जसे युनेस्को, जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये माहिती अधिकारी, शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि माहिती तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये डेटाबेस मॅनेजमेंट तज्ज्ञ, सांस्कृतिक वारसा डिजिटायझेशन प्रकल्पांमध्ये महत्त्वाची भूमिका उत्कृष्टपणे निभावीत आहेत.

डॉ. शियाली रामामृत रंगनाथन् यांचा वारसा हा केवळ भारतासाठी नव्हे, तर संपूर्ण जगासाठी एक मौल्यवान ठेव आहे. त्यांनी दिलेले तत्त्वज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी स्पर्श आजच्या डिजिटल युगातही मार्गदर्शक ठरत आहेत. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम हा केवळ अभ्यासक्रम नाही, तर एक उत्तम समाजनिर्माणासाठी आवश्यक असलेला शाश्वत आधार आहे.

डॉ. रंगनाथन् यांच्या विचारांनी प्रेरणा घेऊन आजचा विद्यार्थी माहितीच्या महासागरात शिस्तबद्ध आणि नैतिक मार्गाने चालू शकतो. त्यामुळेच आजच्या युवकांनी या अभ्यासक्रमाकडे केवळ नोकरीच्या संधीसाठी नव्हे, तर ज्ञानसेवा आणि सामाजिक बांधिलकी या दृष्टीनेही पाहावे. कारण 'माहिती हेच आजचे सामर्थ्य आहे आणि माहिती व्यवस्थापक हेच नव्या युगाचे नायक आहेत.'

९३७१४६१२६७

### सिटी बसच्या गतीसाठी नेटाने प्रयत्न होणे गरजेचे



म.न.पालिकेची परिवहन उपक्रम सिटी बस सेवा कोविड काळापासून ठप्प झालेली आहे. सदरहू बस-सेवा सुरळीत सुरु करण्यासाठी अनेक वेळा, अनेकांनी प्रयत्न केले आहेत. आश्वासनांची खैरातही झालेली आहे. येत्या दिवाळीला ३० आणि त्यानंतर ७० बसेस मार्गस्थ होणार असल्याची आशादायक बातमी या पूर्वी वाचण्यात आली. शहरवासी दिवाळीची वाट पाहत आहेत.

२५ जुलै २५ च्या सोलापूर तरुण भारत मधील किरणजी बनसोडे यांचा लेख वाचून सोलापूर करांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. सध्या सोलापूरच्या चौदा लाख लोकसंख्येसाठी केवळ अठराच बसेस मार्गावर धावतात. त्याही रस्त्यात कुठे, कधी,कशा बंद पडतील, हे सांगता येत नाही. सिटी-बस च्या गतीसाठी आता पालक मंत्र्यांनीच स्टेरिंग हाती घेण्याची गरज, या लेखातून लेखकांनी सिटी बसची व्यथा व सोलापूरकरची कथा रेखाटली आहे. टेंडर काढण्यात येणार आहे.

चार्जिंग स्टेशनचे काम चालू आहे. सर्वेक्षण पूर्ण होत आले आहे. हे सोलापूरची जनता किती वेळा ऐकून घेणार आहे?सगळ्यांना हे माहीत झाले आहे. आता आमच्या पालक मंत्र्यांनीच ठोस प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यांना आमदार, खासदारांनी साथ द्यावी, असे आम्हांला मनापासून वाटते. म.न.पालिकेतला आवाज, किरणजी बनसोडे यांना,या लेखाबद्दल मनापासून धन्यवाद! हा आवाज शहर विकास मंचच्या माध्यमातून लवकरात लवकर, वरिष्ठांप्रत जावाआणि सिटी बस सेवा सुरु करावी ही कळकळीची विनंती.

**- अरुण बा.धुमाळ/सोलापूर.** ९०९०२९२३

## वाचक पत्रे

### इंग्लंडमध्ये इतिहासाची पुनरावृत्ती

एक प्रसिद्ध म्हण आहे - 'इतिहासाची पुनरावृत्ती होते' अर्थात याचा अर्थ असा नाही किंवा असे सूचित करत नाही की भविष्यात अशाच घटना किंवा नमुने पुन्हा घडतात. याचा अर्थ असा आहे की घटना किंवा घडामोडी अनेकदा अंदाजे परिणाम देतात, ज्यामुळे भूतकाळातील घटना वर्तमान समजून घेण्यासाठी प्रासंगिक होतात. ही म्हण ४ ऑगस्ट २०२५ रोजी इंग्लंड आणि भारत यांच्यातील क्रिकेट मालिकेच्या पाचव्या आणि शेवटच्या कसोटीच्या पाचव्या दिवशी ओव्हल लंडन येथे घडलेल्या घटनेला अगदी लागू पडते. याच दिवशी मोहम्मद सिराजने ॲटकिन्सनला दिलेल्या सुंदर यॉर्करसह पाचवी कसोटी भारताने जिंकली आणि भारत-इंग्लंड मालिका २-२ अशी बरोबरीत संपली. खरोखरच एक संघर्षपूर्ण आणि मनोरंजक कसोटी मलिका, कसोटी क्रिकेटला त्याच्या सर्वोत्तम पातळीवर पोहोचवले.

हा विजय माझ्यासारख्या क्रिकेटप्रेमींना आठवण देतो १९७१ मध्ये अजित वाडेकर यांच्या नेतृत्वाखाली भारताने तिसऱ्या कसोटीत मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाची आणि इंग्लंडमध्ये पहिल्यांदाच मालिका जिंकल्याची. या विजयात भारताला पहिल्या डावाच्या बळावर ७१ धावांची तूट होती, तर आताच्या पाचव्या कसोटीतही भारताला २३ धावांची तफावत होती आणि दुसऱ्या डावातही भागवत चंद्रशेखर यांच्या जादुई कामगिरीमुळे दिग्गज फिरकीपटूंपैकी एक असलेल्या त्रिकुटातील एकाने ३८ धावांत (१८.१-३- ३८-६) सहा बळी घेतले आणि भारताने तिसऱ्या कसोटीत विजय मिळवला. माझ्या बालपणीच्या आठवणींनुसार, २४ जुलै रोजी गणेश चतुर्थीच्या शुभ दिवशी इंग्लंडच्या भूमीवर भारताचा हा पहिलाच कसोटी विजय होता. हा सामना तीन सामन्यांच्या मालिकेचा भाग होता, जो भारताने १-० ने जिंकला. ४ ऑगस्ट २०२५ रोजी भारताने इंग्लंडला पराभूत केल्यानंतर ओव्हलवर इतिहासाची पुनरावृत्ती झाली.

**श्रीकांत वसंतराव हडप**/नागपूर

### अमेरिकेचा वर्चस्ववाद

अमेरिकेची भूमिका नेहमीच वर्चस्ववादाची राहिली आहे. एक तर तुम्ही आमच्याबरोबर आहात, नाहीतर आमचे शत्रू आहात, असा विचार ते करत आलेले आहेत. भारत रशियाकडून तेल विकत घेतो म्हणजे रशियाला युद्धासाठी अर्थसाहाय्य करतो असा जर अर्थ काढला जात असेल तर अमेरिका स्वत: काय करते आहे? पाकिस्तान दहशतवादी कारवाया करत असताना त्याला आयएमएफकडून कर्ज मिळवून देणे, त्याला शस्त्रे विकणे, पाकिस्तानच्या लष्करप्रमुखाला सन्मानाने व्हाईट हाऊसमधे जेवायला बोलावणे, ही सर्व भारताच्या शत्रूला उघडपणे उत्तेजन देणे नाही काय? त्यामुळे अमेरिकेची वर्चस्ववादी भूमिका मोडून काढायची गरज आहे.

**रवींद्र पंडित**/८४२४९८४३५०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## पायरीवरून पडल्याने दोन बालिका जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

राहत्या घराजवळ खेळताना पाय-यावरून पडल्याने दोन बालिका जखमी झाल्या आहेत. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुकयातील भंडारकवठे येथे सहा ऑगस्ट रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास घडला.

मानवी शिवानंद बिराजदार (वय ९) व तेजस्विनी शिवानंद बिराजदार (वय २, दोघी रा. भंडारकवठे ता द सोलापूर) अशी जखमी झालेल्या बालिकांची नावे आहेत. मानवी आणि तेजस्विनी या दोघी राहत्या घराच्या पाय-याजवळ खेळत होत्या. अचानक त्या पाय-यावरून पडल्याने दोघींच्या डोकयाला मार लागल्याने त्यांना त्रास होत असल्याने वडील शिवानंद यांनी सोमवारी दुपारी १.५० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## छातीत दुखून कुमठ्यातील व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

छातील दुखून बेशुध्द झालेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला आहे. सोमवारी मध्यरात्री १.३०च्या सुमारास त्रास होत असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल केले होते. बाबूराव रामचंद्र वाघमारे (वय ५४, रा. कुमठे गाव, ता द सोलापूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी मध्यरात्री १.३० च्या सुमारास बाबूराव यांना छातीत दुखून अंगाला घाम सुटून त्रास होऊ लागला. पहाटे ४.१५च्या सुमारास पत्नी मंदाकिनी यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. त्यावेळी त्यांची शुध्द हरपली होती. पहाटे पाचच्या सुमारास डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## ध्वज संहिता नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरीता प्लॅस्टिकच्या वापरास मान्यता नाही. त्यामुळे प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वज निर्मितीस व विक्रीस मान्यता नाही. तसेच राष्ट्रध्वज रस्त्यावर वा अन्य ठिकाणी फेकून देवू नयेत. राष्ट्रध्वज खराब झाल्याचे आढळल्यास ते ध्वजसंहितेतील तरतूदीनुसार नष्ट करणे आवश्यक असते. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे व त्याची विटंबना होणे हे बोधचिन्ह व नांवे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० व राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतूदीनुसार दंडनीय अपराध आहे. तरी सोलापूर जिल्हयातील सर्व जनतेने ध्वज संहितेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित भोसले यांनी केले आहे.

# तहसिल कार्यालय, बार्शी

**कुळ कायदा शाखा**

**दुरध्वनी क्र. (०२१८४) २२२२१३ Email : tahbarshi@gmail.com**

**क्र. कुळकायदा/१४/एसआर-०५/२५ दिनांक ०८/०८/२०२५**

**जाहीर समन्स / वृत्तपत्राद्वारे**

प्रति,
**श्री. राहूल नागनाथ टोंगे,** रा. उपळाई टोंगे, ता. बार्शी **- अर्जदार**
विरुध्द
**१. एकनाथ तुकाराम टोंगे,** रा. उपळाई टोंगे, ता. बार्शी **- सामनेवाले**

**मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये चौकशी**

दावा जमिनीचे वर्णन

| गावाचे नाव | गट नंबर | क्षेत्र हे. आर | पो.ख | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| उपळाई टोंगे | ५१६ | ०.५४ | ०.०० | ०.८७ |
| | ५२४ | ०.१४ | ०.०० | ०.३१ |
| | ५२७ | ०.३३ | ०.०० | ०.७६ |
| | ५३१ | ०.०८ | ०.०० | ०.१२ |

दावा जमीनीबाबत अर्जदार यांनी दावा मिळकतीच्या इतर हक्कातील एकनाथ तुकाराम टोंगे कुळ म्हणून असलेले नाव कमी करुन मिळणेबाबत या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

दावा जमिनीबाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये चौकशीची तारीख दि. ०७/०८/२०२५ रोजी ठेवण्यात आलेली होती. तथापि प्रतिवादी हे गैरहजर राहिलेले असून ग्राम महूसल अधिकारी उपळाई टोंगे यांनी प्रतिवादी हे गावात आढळून येत नसलेबाबत अहवाल सादर केलेला आहे. त्यामुळे जाहिर समन्सद्वारे कळविण्यात येते की, वरील नमूद प्रतिवादी हे जिथे कोठे असतील तेथून सदर केसच्या संदर्भाने तुम्ही जातीने अगर तुमच्या अधिकृत अधिकांमार्फत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदर जाहीर समन्स प्रसिद्धीपासून एक महिन्याच्या आत हजर रहावे. जर तुमचे म्हणणे प्राप्त झाले नाही तर आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी घेतली जाईल व उपलब्ध कागदपत्राच्या आधारे योग्य तो निर्णय देणेत येईल याची नोंद घ्यावी.

शिक्का

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

अुत्तम सेवा

मंगळवार
दि. १२ ऑगस्ट २०२५

# नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परिक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **१)** | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | | | |
| १ | नर्सिंग सुपरिटेंडेंट (२७२ पदे) | GNM / B.Sc. (नर्सिंग) उत्तीर्ण असावे | ४० पर्यंत | ०८/०९/२५ |
| २ | फार्मासिस्ट (१०५ पदे) | बारावी व डी.फार्मासी उत्तीर्ण असावे | ३५ पर्यंत | |
| ३ | हेल्थ इंस्पेक्टर (३३ पदे) | B.Sc. (केमिस्ट्री) व संबंधित कोर्स | ३३ पर्यंत | |
| ४ | लॅब असिस्टंट (१२ पदे) | बारावी व DMLT कोर्स उत्तीर्ण | ३३ पर्यंत | |
| **२)** | **स्टेट बँक ऑफ इंडिया, SBI** | | | |
| १ | लिपीक (५१८० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | २८ पर्यंत | २६/०८/२५ |
| **३)** | **न्यू इंडिया इन्श्युरन्स कं. लि., NIACL** | | | |
| १ | ॲडमिनिस्ट्रेटिव ऑफिसर (५५० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३० पर्यंत | ३०/०८/२५ |
| **४)** | **केंद्रीय गुप्तचर विभाग, IB** | | | |
| १ | सिक्युरिटी असिस्टंट (४९८७ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २७ पर्यंत | १७/०८/२५ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **५)** | **इंस्टीट्युट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन, IBPS** | | | |
| १ | लिपीक (१०,२७७ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार व संगणक ज्ञान असावे | २८ पर्यंत | २१/०८/२५ |
| **६)** | **ओरिएंटल इन्शुरन्स कं. लि., OICL** | | | |
| १ | असिस्टंट (५०० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार | ३० पर्यंत | १७/०८/२५ |
| **७)** | **केंद्रीय गुप्तचर विभाग, IB** | | | |
| १ | सिक्युरिटी असिस्टंट (४९८७ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २७ पर्यंत | १७/०८/२५ |
| **८)** | **बॉर्डर सिक्युरिटी फोर्स, BSF** | | | |
| १ | ट्रेड्समन (३५८८ पदे) | दहावी व ITI (इले/स्वीपर/वेटर/बार्बर/वॉशरमन/वॉटर कॅरिअर/पंप/पेंटर/प्लंबर/कार्पेंटर/टेलर/कॉब्लर/अपहोल्स्टर) उत्तीर्ण स्त्री/पुरुष असावे | २७ पर्यंत | २३/०८/२५ |

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः करमाळा तालुक्यातील जनतेला या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे करमाळा शहर हद्दीतील मेनरोड वरील घर व दुकान जागा सि. सर्वे नं. २९८१ क्षेत्र ३५.०० चौ.मी. **चतुःसिमा :- पुर्वेस -** न.प. रस्ता, **दक्षिणेस -** सि.स.नं. २९८२, **पश्चिमेस -** सि.सि.नं. २९७०, **उत्तरेस -** सि.स.नं. २९७९, २९८० वरील चतुःसिमेतील वर्णनाची मिळकत.

सदरची मिळकत ही चंद्रकला सतीश टांगडे यांच्या खरेदी मालकीची आहे. चंद्रकला सतीश टांगडे यांना त्यांच्या प्रपंचिक, आर्थिक, कायदेशीर, अडचणी सोडविण्यासाठी पैशाची गरज असल्याने सदरची मिळकत जाहीरपणे विक्रीस काढलेली होती. सदरची मिळकत आमचे अशिल बळीराम सखाराम वाघमारे यांनी चंद्रकला सतीश टांगडे यांच्याशी बैठक घेऊन सदर जमीनीची किंमत ठरवून सदरची मिळकत चढ्या बाजारभावाने खरेदी घेण्याचे ठरवून इसारा दाखल रक्कम देऊन इसार पावती लिहून घेतलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी चंद्रकला सतीश टांगडे यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचा हक्क, अधिकार, बोजा, गहाण, दान, चोळी बांगडी, पोटगी इसार, साठेखत, खरेदीखत, कोर्ट केसेस, बँकेच्या केसेस, इ. कोणत्याही स्वरूपाचा हक्क संबंध असल्यास त्यांनी आमचे अशिल यांना समक्ष भेटून नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसाचे आतमध्ये कळवून, तशी त्यांची खात्री करून द्यावी. तसे मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास सदर मिळकतीत कोणाचाही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत. सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी समजून खरेदी करतील. मुदतीनंतर कोणाचाही कसलीही तक्रार अगर हरकत आल्यास ती आमचे अशिलावर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. मग त्यांच्या होणाऱ्या खर्चास व परिणामास आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली असे. ता. १२/०८/२०२५

**अशिलातर्फे ॲड.**
**सही/-**
**ॲड. अलीम हामजेखान पठाण**
**बी.ए. (ऑनर्स) एल.एल.बी.**
**ऑफिस : सिव्हील कोर्टासमोर गाळा नं. १६,**
**विद्यानगर, करमाळा ता. करमाळा, जि. सोलापूर**
**मो. ९४२३७९११८६ / ७७९६०७०७८६**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. ९४/२०२५
पुढील ने.ता. २३/०९/२०२५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डि. सो. यांचे कोर्टात**
**(मे. एच.यु.यु. पाटील कोर्ट)**

१) **श्रीमती मिनल संजयकुमार दोशी,**
वय ४८ वर्ष, धंदा - घरकाम,
रा. सावळे सभागृहासमोर, तेलगिरणी चौक,
बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
२) **रुचिता संजयकुमार दोशी,**
वय - २४ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
३) **सिध्दांत संजयकुमार दोशी,**
वय - २० वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
४) **श्रीमती शिलप्रभा जयप्रकाश दोशी,**
वय - ७४ वर्षे, धंदा - घरकाम, रा. सदर
— **अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही - सा.वाला**

ज्याअर्थी, यातील यातील अर्जदार नं १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल तसेच अर्जदार नं. ४ यांचा मुलगा संजयकुमार जयप्रकाश दोशी हे दि. १६/०७/२०२४ रोजी हिरेमठ हॉस्पीटल, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे आजारपणामुळे मयत झालेले आहेत. यातील अर्जदार नं १ ते ४ हेच मयत संजयकुमार जयप्रकाश दोशी यांचे कायदेशीर एकमेव व जवळचे वारस आहेत, म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दी करणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचेही आक्षेप असल्यास संबंधीतांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमलेल्या ता. २३/०९/२०२५ रोजी पर्यंत मे. कार्टात स्वतः अगर आपल्या विधीज्ञामार्फत हजर होवून आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील, हे जाहीर प्रसिध्दीकरण केले असे ता. ११/०८/२०२५

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**मे. सि.ज.ज्यु.डि. सो, बार्शी**

# पाहिजेत

महूद परिसर शिक्षण प्रसारक मंडळ, महूद संचलित **मॉडर्न गर्ल हायस्कूल महूद (बु.)**, ता. सांगोला, जि. सोलापूर या १००% अनुदानित प्रशालेत खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | पदसंख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपिक सेवक | इ. १२वी MSCIT/CCC/ मराठी, इंग्रजी टायपिंग | एक | खुल्या प्रवर्गासाठी राखीव |
| २ | प्रयोगशाळा सहाय्यक सेवक | बी.एससी. | एक | OBC |

तरी पात्र उमेदवारांनी सोमवार, दि. २५/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. मॉडर्न गर्ल हायस्कूल महूद (बू.) ता. सांगोला, जि. सोलापूर येथे मुलाखतीस मूळ कागदपत्रांसह स्वखर्चाने उपस्थित रहावे हि विनंती.

**अध्यक्ष सचिव**
महूद परिसर शिक्षण प्रसारक मंडळ
महूद (बु.) ता. सांगोला, जि. सोलापूर

**मुख्याध्यापक / सचिव**
मॉडर्न गर्ल हायस्कूल
महूद (बु.) ता. सांगोला, जि. सोलापूर

## दगड लागून अडीच वर्षाचा बालक जखमी

**सोलापूर :** घराच्या परिसरात आईबरोबर थांबलेला अडीच वर्षाचा बालक दगड लागून जखमी झाला. हा प्रकार सोमवारी दुपारी बाराच्या सुमारास कुमठा नाका परिसरातील महाराणा प्रताप झोपडपट्टी येथे घडला. वेदांत अक्षय पंतुवाले असे त्याचे नाव आहे. वेदांत हा खेळत होता. त्यावेळी त्या परिसरात सात ते आठ मुले खेळत होती. त्यातील कोणीतरी दगड फेकलेला दगड वेदांतच्या कपाळाला लागला. यामुळे कपाळाला जखमी झाली आई प्रियंका यांनी त्यास दुपारी १२.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस विशेषतः मौजे उपळाई ठोगे, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील जनतेस याद्वारे कळविणेत येते की,

मौजे उपळाई ठोगे, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील जमीनीचे वर्णन व तपशिल खालीलप्रमाणे.

| क्र. | शेतकऱ्याचे नाव | गट नंबर | क्षेत्र हे.आर | पो.ख. |
|---|---|---|---|---|
| १) | उमेश तानजी घाडगे | १३४५ | ४,१०,०० | ०.४५,०० |
| २) | गणेश तानजी घाडगे | | | |
| ३) | मेघा तानजी घाडगे | | | |
| ४) | सिंधुताई तानजी घाडगे | | | |
| ५) | संदीप संजय घाडगे | १३४४० | १०.८८.०० | ०.०००० |

वरील २. गटातील क्षेत्र हे. १४.९८.४५ आर असे.

वरीलप्रमाणे मिळकतीचे धारक यांनी त्यांचे नावे असलेले स्वतंत्र व समाईक मालकीची मिळकत आमचे अशिल हरे कृष्णा मेटॅलिक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी करीता सोलर प्लान्ट व्यवसायाकरीता भाडेतत्वावर मिळकत देण्याचे ठरविलेले आहे.

यदाकदाचित सदर मिळकतीवर इतर कोणाचाही, कसल्याही प्रकारे हरकत असल्यास अथवा विक्री, खरेदीखत असाईनमेंट, अदलाबदल दस्त, चार्ज, बक्षीस, गहाण, करार, ट्रस्ट, परवाना असे कोणत्याही मार्गाने असलेले हक्क अधिकार, देखभाल हक्क, कुळ, भाडेकरू हक्क, पोटभाडेकरू, वारसाहक्क, भाडेपट्टा, सब-लीज, वारसाहक्क, धारणाधिकार, देखभाल, मृत्यूपत्र, ताबा हक्क. भोगवटा, विकसनाचे हक्क, एकत्रित विकसनाचे हक्क, सह विकसनाचे हक्क, प्रकल्प व्यवस्थापन हक्क, संयुक्तिक हक्क, सहयोग, कुटूंबिक व्यवस्थापन / करारनामा, इच्छापत्र, प्रशासनाचे पत्र, प्रोबेट, लीस पेंडन्स, डिक्री, न्यायालयाचा कोणताही आदेश, इतर कोणत्याही मार्गाने कोणत्याही व्यक्तीला भागीदार फर्म, एलएलपी, हिंदु अविभक्त कुटूंबाचे हक्क, कंपनी, कार्पोरेट संस्था, बँक, वित्तीय संस्था, नॉन बँकींग वित्तीय संस्था, कंपनी, आते व्यक्ती मंडळी, सावकार, कर्जदार व इतर व्यक्तीचे कोणतेही हक्क / टायटल / दावा / इस्टेट / हिस्सा / नफा / मागणी / व्याज असलेली व्यक्ती असल्यास संबंधीत व्यक्तींनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत रजिस्टर पोस्टाने खाली नमुद केलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी खात्री पटवून द्यावी, तसे न केल्यास कोणत्याही प्रकारे तथाकथित हक्क, हक्का टायटल / दावा / इस्टेट / हिस्सा / नफा / मागणी / इ. असल्यास संबंधीत व्यक्तींनी ती कायमस्वरूपी सोडून दिला असे समजण्यात येईल व सदर जमीन मालकांची मिळकत ही निर्वेध आणि निजोखमी मानली जाईल आणि सदर मिळकत बोजारहित असे समजून आमचे अशिल वरील जमीन मालकांसोबत भाडेकराराचा व्यवहार पूर्ण करतील ह्याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ११/०८/२०२५

**अशिलातर्फे**
**सही/-**
**ॲड. पूर्णानंद अ. जाधव**
**दहिवडी, ता. माण, जि. सातारा**
**मो. ९९७५१०१०९९**

**अशिल**
**हरे कृष्णा मेटॅलिक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी तर्फे**
**श्री. अनिल प्रभाकर बुधावले**
**मु.पो. दिघंची, ता. आटपाडी जि. सांगली**

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस विशेषतः मौजे धर्मपुरी, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथील जनतेस याद्वारे कळविणेत येते की, मौजे धर्मपुरी, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथील जमीनीचे वर्णन व तपशिल खालीलप्रमाणे.

| क्र. | शेतकऱ्याचे नाव | गट नंबर | क्षेत्र हे. आर | पो.ख. |
|---|---|---|---|---|
| १) | जयदिप राजाराम निगडे | ७४९ | ०.७१.०० | ०.००.०० |
| २) | नितीन नामदेव निगडे | ७४९ | ०.७०.०० | ०.००.०० |
| ३) | ओंकार नितीन निगडे | ७४९ | १.४१.०० | ०.००.०० |
| ४) | शुभांगी नितीन निगडे | ७४७/१ | १.५०,०० | ०.००.०० |
| ६) | नितीन नामदेव निगडे | ७४७/१ | ०.१८.५० | ०.००.०० |
| ७) | शिवकुमार पोपट काटकर | ७४७/१ | २.०२.५० | ०.००.०० |

वरील २ गटातील क्षेत्र हे. ६.५३.०० आर असे.

वरीलप्रमाणे मिळकतीचे धारक यांनी त्यांचे नावे असलेले स्वतंत्र व समाईक मालकीची मिळकत आमचे अशिल हरे कृष्णा मेटॅलिक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी करीता सोलर प्लान्ट व्यवसायाकरीता भाडेतत्त्वावर मिळकत देण्याचे ठरविलेले आहे.

यदाकदाचित सदर मिळकतीवर इतर कोणाचाही, कसल्याही प्रकारे हरकत असल्यास अथवा विक्री, खरेदीखत, असाईनमेंट, अदलाबदल दस्त, चार्ज, बक्षीस, गहाण, करार, ट्रस्ट, परवाना असे कोणत्याही मागनि असलेले हक्क अधिकार, देखभाल हक्क, कुळ, भाडेकरू हक्क, पोटभाडेकरू, वारसाहक्क, भाडेपट्टा, सब-लीज, वारसाहक्क, धारणाधिकार, देखभाल, मृत्यूपत्र, ताबा हक्क, भोगवटा, विकसनाचे हक्क, एकत्रित विकसनाचे हक्क, सह विकसनाचे हक्क, प्रकल्प व्यवस्थापन हक्क, संयुक्तिक हक्क, सहयोग, कुटूंबिक व्यवस्थापन करारनामा, इच्छापत्र, प्रशासनाचे पत्र, प्रोबेट, लीस पेंडन्स, डिक्री, न्यायालयाचा कोणताही आदेश, इतर कोणत्याही मार्गाने कोणत्याही व्यक्तीला भागीदार फर्म, एलएलपी, हिंदु अविभक्त कुटूंबाचे हक्क, कंपनी, कार्पोरेट संस्था, बँक, वित्तीय संस्था, नॉन बँकींग वित्तीय संस्था, कंपनी, आते व्यक्ती मंडळी सावकार, कर्जवार व इतर व्यक्तीचे कोणतेही हक्क/टायटल/दावा/इस्टेट/हिस्सा/नफा/मागणी/व्याज असलेली व्यक्ती असल्यास संबंधीत व्यक्तींनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत रजिस्टर पोस्टाने खाली नमुद केलेल्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी खात्री पटवून द्यावी, तसे न केल्यास कोणत्याही प्रकारे तथाकथित हक्क, हक्कासह टायटल / दावा / इस्टेट / हिस्सा / नफा / मागणी / इ. असल्यास संबंधीत व्यक्तींनी ती कायमस्वरूपी सोडून दिला असे समजण्यात येईल व सदर जमीन मालकांची मिळकत ही निर्वेध आणि निजोखमी मानली जाईल आणि सदर मिळकत बोजारहित असे समजून आमचे अशिल वरील जमीन मालकांसोबत भाडेकराराचा व्यवहार पूर्ण करतील ह्याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली असे. दि. ११/०८/२०२५

**अशिलातर्फे**
**सही/-**
**ॲड. पूर्णानंद अ. जाधव**
**दहिवडी, ता. माण, जि. सातारा**
**मो. ९९७५१०१०९९**

**अशिल**
**हरे कृष्णा मेटॅलिक प्रायव्हेट लिमिटेड कंपनी तर्फे**
**श्री. अनिल प्रभाकर बुधावले**
**मु.पो. दिघंची, ता. आटपाडी जि. सांगली**

MAHARASHTRA TOURISM

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित. मफतलाल हाऊस, पहिला मजला, एच.टी. पारेख मार्ग, १६९, बॅकबे रिक्लमेशन, चर्चगेट, मुंबई-४०००२० दुरध्वनीः (९१२२) ४१५८०९९२/४१५८०९९४/९५/९७**

## निविदा सुचना/मपविम/बांधकाम/२०२५-२६/३६-६४ (ऑनलाईन)

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचेकडुन खालील कामांसाठी (अधिकृत डिजीटल स्वाक्षरी प्रमाणधारक) विस्तृत निविदा सुचनेत नमुद केलेल्या पुर्व अर्हता पात्र संस्थांकडून ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (लक्ष) |
|---|---|---|
| १ | एलोरा, जि.छत्रपती संभाजीनगर येथे म.प.वि. महामंडळाच्या राष्ट्रकूट रिसॉर्टसाठी विद्युत कामे करणे. | ३१.९६ |
| २ | माथेरान, जि. रायगड येथील म.प.वि. महामंडळाच्या निरीक्षण बंगल्यासाठी विद्युत कामे करणे. | ३३.८५ |
| ३ | नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा येथील म.प.वि. महामंडळाच्या हॉलिडे रिसॉर्ट आणि स्टडी सेंटरचे विद्युत काम करणे. | ३८.९८ |
| ४ | कळंब, जि. यवतमाळ येथील म.प.वि. महामंडळाच्या भक्त निवाससाठी विद्युत कामे उपलब्ध करणे. | ४०.४० |
| ५ | ताडोबा, जि. चंद्रपूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टचे अतिरिक्त सुविधेसाठी विद्युत कामे करणे. | ६५.५८ |
| ६ | म.प.वि. महामंडळाच्या संकटमोचन, जि. यवतमाळ येथील पर्यटन सुविधेसाठी विद्युत कामे करणे. | ७३.२० |
| ७ | अक्कलकोट जि. सोलापूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्ट आणि कम्युनिटी हॉलसाठी विद्युत कामे करणे. | ७४.९६ |
| ८ | नलेश्वर, जि. चंद्रपूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्ट व विविध पर्यटन विकास कामांसाठी विद्युत कामे करणे. | ७७.०५ |
| ९ | पर्यटक निवास नागपूर, जि. नागपूर येथे अतिरिक्त पर्यटन सुविधा प्रदान करणे. | ७७.८८ |
| १० | कोयनानगर, जि. सातारा येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टची विद्युत कामे करणे. | ७९.३६ |
| ११ | म.प.वि. महामंडळाचे रिसॉर्ट शिखर शिंगणापूर, जि. सातारा येथे अतिरिक्त पर्यटन सुविधा उभारणे. | १०३.९३ |
| १२ | म.प.वि. महामंडळाचे रिसॉर्ट माहूर, जिल्हा नांदेड येथे अतिरिक्त पर्यटक सुविधांसाठी विद्युत कामे करणे | ११३.१५ |
| १३ | अकलूज, जि. सोलापूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टमधील विद्यमान सुविधांसाठी विद्युत कामे करणे. | ११९.२८ |
| १४ | ज्योतिबा, जि. कोल्हापूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टमधील विद्यमान सुविधांमध्ये विद्युत कामे करणे. | १२३.९१ |
| १५ | कुणकेश्वर, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथील म.प.वि. महामंडळाच्या स्कूबा डायव्हिंग सेंटर आणि संग्रहालयाच्या विकासासाठी विद्युत कामे करणे. | १२४.९८ |
| १६ | शिर्डी, जि. अहिल्यानगर येथील म.प.वि. महामंडळाच्या पर्यटक निवासात अतिरिक्त सुविधा पुरविणे. | १२९.७३ |
| १७ | पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टची विद्युत कामे करणे. | १३४.५१ |
| १८ | नवेगाव खैरी, जि. नागपूर येथे म.प.वि. महामंडळाच्या नवीन उपहारगृहाचे बांधकाम करणे. | १४७.७६ |
| १९ | ताडोबा, जि. चंद्रपूर येथील म.प.वि. महामंडळाच्या पर्यटक निवासात विविध पर्यटन विकास कामे करणे. | १५९.४४ |
| २० | सती अनुसया माता संस्थान, ता. काटोल जि. नागपूर येथे विविध पर्यटन विकास कामे करणे. | १६५.३५ |
| २१ | महाराष्ट्राच्या पश्चिम भागात UNWTO मान्यताप्राप्त पर्यटन माहिती प्रणाली प्रदान करणे. | १८२.१२ |
| २२ | सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध समुद्रकिनाऱ्यांवर विकसित केलेल्या पर्यटन सुविधांचे (लाकडी संरचना) बळकटीकरण आणि वार्षिक देखभाल करणे. | १९२.५८ |
| २३ | नवेगावबांध, जि. गोंदिया येथील म.प.वि. महामंडळाचे रिसॉर्टचे अतिरिक्त सुविधेसाठी विद्युत कामे करणे. | १९५.१० |
| २४ | खारेपाटण, जि. सिंधुदुर्ग येथील पर्यटक सुविधांचे श्रेणीवाढ करणे. | २०२.९७ |
| २५ | दुर्गा टेकडी, लोणार, जि. बुलढाणा येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टसाठी विद्युत कामे करणे. (दुसरी बोली) | २२२.५६ |
| २६ | नलेश्वर, जि.चंद्रपूर येथील म.प.वि. महामंडळाच्या पर्यटक निवासामध्ये विविध पर्यटन विकास कामे करणे. | २९५.५८ |
| २७ | गणपतीपुळे, जि.रत्नागिरी येथील म.प.वि. महामंडळाच्या रिसॉर्टसाठी विद्युत कामे करणे. | २९९.०१ |
| २८ | नायगाव, ता. खंडाळा, जि. सातारा येथील हॉलिडे रिसॉर्ट आणि स्टडी सेंटरची श्रेणीवाढ करणे. | ३६१.८७ |
| २९ | नाशिक येथील कन्व्हेन्शन सेंटरमध्ये अतिरिक्त सुविधा आणि परिसर विकास काम करणे. | ३९४.५२ |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा ऑनलाईन डाउनलोड करण्याचा व सादर करावयाचा कालावधी | दि. १२/०८/२०२५ दु. १३.०० वा. पासुन दि. २०/०८/२०२५ दु.१३.०० पर्यंत |
| २ | निविदा हार्ड कॉपी स्वरूपात सादर करावयाचा कालावधी | दि. २०/०८/२०२५ दु.१३.०० वा. आणि दि. २२/०८/२०२५ दु. १३.०० पर्यंत |
| ३ | निविदा उघडण्याचे दिनांक व वेळ | दि. २२/०८/२०२५ दु.१५.०० hrs. (शक्य झाल्यास) |
| ४ | शुद्धीपत्रक | उपरोक्त ई-निविदा संबंधिचे सुचना व शुद्धीपत्रक फक्त ऑनलाईन पद्धतीनेच दर्शविल्या जातील. |

खालील संकेतस्थळावरून विस्तृत निविदा सुचना ई-निविदेची माहिती उपलब्ध आहे. http://mahatenders.gov.in

**सही/-**
**व्यवस्थापकीय संचालक,**
**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.**

## महत्त्वाचे

### सचिनची फ्रान्सच्या ग्रामीण भागाला भेट



**नवी दिल्ली** : भारतरत्न क्रिकेट दिग्गज सचिन तेंडुलकरने अलीकडेच फ्रान्सच्या निसर्गरम्य ग्रामीण भागाला भेट दिली. विशेष म्हणजे सचिनने आपल्या सायकलवर फ्रान्सच्या ग्रामीण भागाचे सौंदर्य न्याहाळले आणि तेथील मनमोहक सौंदर्यस्थळांचा आनंद लुटला. समाजमाध्यमावर सचिनने काही छायाचित्रेही पोस्ट केलीत व त्याखाली लिहिले की, प्रत्येक स्थळ मला दृश्याच्या जवळ घेऊन गेली. सचिन विशेषतः फ्रान्सचे बंदर शहर असलेल्या बोर्डोमधील सूर्यप्रकाशात खूप रमला. नैऋत्य फ्रान्समध्ये स्थित बोर्डो हे युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ म्हणून ओळखले जाते. जे त्याच्या ऐतिहासिक स्मारकांसाठी आणि १८ व्या शतकातील आश्चर्यकारक वास्तुकलेसाठी प्रसिद्ध आहे. त्याने यापूर्वी सेंट-एमिलियनला भेट दिली होती. हे स्थळ जगप्रसिद्ध वाइनरीजसाठी देखील प्रसिद्ध आहे. हा प्रदेश मद्यप्रेमींसाठी देखील एक लोकप्रिय ठिकाण आहे. ■

### जस्टिन रोजने जिंकली सेंट ज्यूड गोल्फ स्पर्धा

**मेम्फिस** : इंग्लंडचा गोल्फपटू जस्टिन रोजने कमनशिबी टॉमी फ्लीटवुडविरुद्ध शेवटच्या पाच होलमध्ये तीन फटक्यांची कमतरता भरून काढली आणि नंतर यूएस ओपन विजेत्या जे.जे. स्पॉनविरुद्ध प्लेऑफमध्ये दोन बर्डी मारून फेडएक्स सेंट ज्यूड अजिंक्यपद गोल्फ स्पर्धा जिंकली. रोजने आणखी एक उत्कृष्ट कामगिरी करत ३-अंडर ६७ सह आपला २४ वा विजय मिळवला. या विजयाबरोबरच वयाच्या ४५ व्या वर्षी तो जगातील अव्वल १० मध्ये परतला आणि दुसऱ्या रायडर चषकामध्ये आपले स्थान निश्चित केले. त्याने सलग चार होल बर्डी केले आणि टीपीसी साउथविंड येथे १८ व्या होलवर १३ फूट बर्डी पुट थोडक्यात हुकला आणि नियमनातील विजय मिळवला. रोजने खेळलेल्या शेवटच्या आठ होलमध्ये सहा बर्डी केल्या, शेवटचा तिसऱ्या प्लेऑफ होलवर १८ व्या होलवर १० फूट पुट होता. शेवटचे ९० मिनिटे अद्भूत होते. मी संपूर्ण खेळात अविश्वसनीय गोल्फ खेळलो. आता जगातील सर्वोत्तम खेळाडूंविरुद्ध जिंकण्यासाठी पुरेसा चांगला झालो आहे. माझ्यासाठी हा खूप आनंददायी दिवस आहे, असे जस्टिन रोज म्हणाला.

### रोहितने २०२७ वन-डे विश्वचषकात खेळावे : लाड

**नवी दिल्ली** : रोहित शर्माने २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकात खेळावे, अशी इच्छा त्याचे बालपणीचे प्रशिक्षक दिनेश लाड यांनी व्यक्त केली. वन-डे विश्वचषक ऑक्टोबर व नोव्हेंबर २०२७ मध्ये दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे खेळला जाणार आहे. उजव्या हाताच्या फलंदाजाकडे अजूनही देशासाठी योगदान देण्याची 'भूक आणि दृढनिश्चय' आहे, सेही लाड म्हणाले. या वर्षाच्या सुरुवातीला भारताला चॅम्पियन्स चषकाचे वैभव मिळवून देणाऱ्या रोहितने इंग्लंड दौऱ्यापूर्वी मे महिन्यात कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. गेल्या वर्षी बार्बाडोसमध्ये झालेल्या टी-२० विश्वचषक विजयानंतर ३८ वर्षीय रोहितने यापूर्वी टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. दोन वर्षांहून अधिक काळ चालणाऱ्या या चौथ्या एकदिवसीय सामन्यांमुळे आणि येत्या काही महिन्यांत भारतासाठी मर्यादित ५० षटकांच्या सामन्यांमुळे, रोहितच्या एकदिवसीय स्वरूपात भविष्याबद्दल अफवा पसरल्या आहेत. रोहितने २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकात नक्कीच खेळले पाहिजे. ट्रॉफी जिंकणे हे त्याचे नेहमीच स्वप्न राहिले आहे आणि २०११ च्या विजयी संघाचा भाग होण्यापासून तो वंचित राहिला, असे लाड यांनी सांगितले. तथापि, लाड रोहितच्या नेतृत्वाच्या भविष्याबद्दल साशंक होते परंतु पुढील एकदिवसीय विश्वचषकासाठी त्याच्या समावेशाचे समर्थन केले.

# अश्विनला हवी सीएसकेकडून स्पष्टता



**चेन्नई, ११ ऑगस्ट**

चेन्नई सुपर किंग्जचा (सीएसके) अष्टपैलू आर. अश्विनने आपल्या संघाला आयपीएल २०२६ मध्ये आपली भूमिका काय असेल, याबद्दल स्पष्टता मागितली आहे, असे ईएसपीएनक्रिकइन्फोच्या वृत्तात म्हटले आहे.

जर मी आपल्या योजनांमध्ये बसत नसेल तर तुमच्यापासून वेगळे होण्यास मला हरकत नाही असे अश्विनने फ्रॅन्चायझीला सांगितले आहे अशी माहिती सूत्रांनी दिली.

गत वर्षी झालेल्या मेगा लिलावात सीएसकेने ९.७५ कोटी रुपयांना खरेदी केलेल्या अश्विनने १४ पैकी ९ सामने खेळले. त्याला घरवापसी म्हणून पाहिले जात होते. आठ हंगाम इतरत्र खेळल्यानंतर तो आपल्या शहराचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघासोबत होता. २००९ नंतर पहिल्यांदाच, अश्विनचा पहिला हंगाम, त्याने एका हंगामात १२ पेक्षा कमी सामने खेळले. हे त्याचे सर्वात महागडे वर्ष होते, कारण त्याने प्रति षटक ९.१२ धावा केल्या, पहिल्यांदाच त्याची इकॉनॉमी ८.४९ पेक्षा जास्त झाली.

खेळाडूंना सोडण्याची अंतिम मुदत सहसा लिलाव कधी होतो यावर अवलंबून असते व ही आयपीएल २०२६ साठी अद्याप निश्चित झालेली नाही. मेगा लिलाव दर तीन वर्षांनी होतो, परंतु दरवर्षी एक मिनी लिलाव असतो. तो सहसा नोव्हेंबर ते फेब्रुवारी दरम्यान कधीही आयोजित केला जातो.

अश्विन आयपीएलमध्ये सर्वाधिक बळी टिपणारा पाचवा गोलंदाज आहे. त्याने सीएसकेपासून सुरुवात केली आणि २०२५ मध्ये सीएसकेमध्ये परतण्यापूर्वी आता बंद पडलेल्या रायझिंग पुणे सुपरजायण्ट, किंग्ज इलेव्हन पंजाब (आता पंजाब किंग्ज), दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॉयल्सचे प्रतिनिधित्व केले.

सीएसकेकडे इतरही काही मागण्या आहेत, ज्यामध्ये कर्णधारपदाचा समावेश आहे. ऋतुराज गायकवाड जखमी झाल्यानंतर हंगामाच्या मध्यात महेंद्र सिंह धोनीने कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारली.

वर्षाच्या अखेरीस सराव सुरू करताना धोनी आपल्या उपलब्धतेबद्दल स्पष्टता देईल याची प्रतीक्षा आहे. फ्रॅन्चायझी नेहमीच वाट पाहत राहिली आहे. गत वर्षी सीएसकेने धोनीच्या उपस्थितीत ऋतुराज गायकवाडची कर्णधार म्हणून निवड केली होती, जरी धोनी खेळत राहिला तरी पुढच्या वर्षीही असेच व्हायला हवे. (वृत्तसंस्था)



न्यू ऑर्लीन्स येथे झालेल्या यूएस जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत वरिष्ठ महिलांच्या अंतिम फेरीत बॅलन्स बीमवर कौशल्य दाखवताना सॅन माटेओ जिम्नॅस्टिक्सची ॲली डेमेलियो

# राष्ट्रीय कनिष्ठ पुरुष हॉकीच्या विजेतेपदासाठी ३० संघ सहभागी होणार

**जालंधर, ११ ऑगस्ट**

येथे मंगळवारपासून १५ व्या हॉकी इंडिया कनिष्ठ गट पुरुष राष्ट्रीय हॉकी अजिंक्यपद स्पर्धेला प्रारंभ होणार असून या स्पर्धेच्या विजेतेपदासाठी ३० संघ झुंजणार आहे. ही स्पर्धा नवीन विभाग-आधारित स्वरूपात होणार आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला वरिष्ठ व सब-ज्युनियर पुरुष व महिला तसेच कनिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत नवीन स्वरूप आधीच सादर व अंमलात आणण्यात आले आहे. सहभागी ३० संघांना विभाग अ, विभाग ब आणि विभाग क मध्ये विभागण्यात आले आहे. पदोन्नतीमुळे स्पर्धेत अतिरिक्त धार निर्माण झाली आहे. विभाग अ मधील संघ विजेतेपदासाठी लढतील, तर विभाग ब आणि क मधील अव्वल दोन संघ पुढील स्तरावर पदोन्नती मिळवतील. अ आणि ब या विभागातील तळाच्या दोन संघांना २०२६ साठी पुढील विभागात स्थलांतरित करावे लागेल. विभाग अ मध्ये देशातील १२ सर्वोत्तम कनिष्ठ पुरुष संघांचा समावेश आहे, यात गतविजेता पंजाब, उपविजेता उत्तर प्रदेश आणि तिसऱ्या क्रमांकावर असलेला हरयाणा यांचा समावेश आहे.



सामने १२ ते १६ ऑगस्ट दरम्यान चालतील, त्यातून २० ते २३ ऑगस्ट दरम्यान उपांत्यपूर्व फेरी, उपांत्य फेरी आणि अंतिम फेरी होईल. तिन्ही विभागांमध्ये संघांना विजयासाठी ३ गुण आणि ड्रॉसाठी १ गुण मिळेल.

भारतीय हॉकीच्या भविष्यासाठी कनिष्ठ स्पर्धा अत्यंत महत्त्वाच्या आहेत, असे हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की म्हणाले. या फॉर्मॅटमध्ये खेळताना तरुण खेळाडू खूप काही शिकतील. सर्व विभागांमधील संघांमध्ये पदोन्नती व विजेतेपदासाठी लढताना स्पर्धात्मकतेची एक वेगळी पातळी आपल्याला दिसेल, असे ते पुढे म्हणाले. (वृत्तसंस्था)

# भारत २०३६ च्या ऑलिम्पिक बोलीवर आयओसीशी सतत संपर्कात : मांडवीय

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

भारत २०३७ च्या ऑलिम्पिक आयोजनासाठी उत्सुक आहे. त्याकरित भारताने बोली लावली असून त्याकरिता आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या सदस्यांसोबत सतत संवाद साधत आहे. संपूर्ण बोली प्रक्रिया भारतीय ऑलिम्पिक संघटना (आयओए) हाताळत आहे, असे क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी सोमवारी लोकसभेत सांगितले.

आम आदमी पक्षाचे संगरूर येथील खासदार गुरमीत सिंग मीत हेयर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मांडवीय म्हणाले.

आयओएने आयओसीला एक पत्र सादर केले आहे. बोली आता आयओसीच्या भविष्यातील यजमान आयोगासोबत सतत संवाद टप्प्यात आहे, असे मांडवीय यांनी कनिष्ठ सभागृहात सांगितले.



भारत अनेक ठिकाणी ऑलिम्पिक आयोजित करण्यासाठी बोली लावत आहे का, या हेयर यांच्या विशिष्ट प्रश्नाला, मात्र मंत्र्यांनी उत्तर दिले नाही. प्रस्तावित योजनेत भुवनेश्वरमध्ये हॉकी, भोपाळमध्ये रोइंग, पुण्यात कॅनोइंग/कायाकिंग आणि मुंबईत क्रिकेटचा समावेश आहे का, असा प्रश्न हायर यांनी विचारला.

'भारतात ऑलिम्पिक खेळांचे आयोजन करण्यासाठी बोली लावणे ही भारतीय आलिम्पिक संघटनेची जबाबदारी आहे व ऑलिम्पिक साठी यजमानपदाचे हक्क आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (आयओसी) द्वारे सविस्तर यजमान निवड प्रक्रियेद्वारे दिले जातात, असे मांडविया यांनी सांगितले.

भारताने अधिकृतपणे यजमान शहराचा प्रस्ताव दिलेला नसला तरी, गुजरात सरकार यामध्ये आघाडीवर आहे आणि त्यांचे क्रीडा मंत्री हर्ष संघवी गेल्या महिन्यात बोलीवर चर्चा करण्यासाठी लॉसने येथील आयओसी मुख्यालयाला भेट देणाऱ्या भारतीय शिष्टमंडळाचा भाग होते. (वृत्तसंस्था)

# भारताचे लक्ष्य वन-डे विश्वचषक : हरमनप्रीत कौर

**नवी दिल्ली, ११ ऑगस्ट**

भारताच्या कर्णधार हरमनप्रीत कौरने सोमवारी सांगितले की तिचा संघ देशाच्या आयसीसी महिला विजेतेपदाच्या प्रदीर्घ प्रतीक्षेचा अंत करण्यासाठी दृढ आहे, आगामी एकदिवसीय महिला विश्वचषक घरच्या मैदानावर परिपूर्ण संधी सादर करत आहे.

भारताचा माजी अष्टपैलू युवराज सिंग आणि तिच्या सहकाऱ्यांच्या उपस्थितीत ट्रॉफी अनावरण समारंभात बोलताना हरमनप्रीतने कबूल केले की दुष्काळ खेळाडूंवर भार टाकतो परंतु त्यांच्या प्रेरणाला देखील चालना देतो.

आम्हाला तो अडथळा तोडायचा आहे, ज्याची सर्व भारतीय वाट पाहत आहेत. विश्वचषक नेहमीच खास असतात, माझ्या देशासाठी नेहमीच खास करायचे असते. जेव्हा जेव्हा मी युवराज सिंगकडे बघते, तेव्हा मला खूप प्रेरणा मिळते, असे कर्णधार हरमनप्रीत कौर म्हणाली.

भारत आगामी विश्वचषकात आपले पहिले आयसीसी महिला विजेतेपद जिंकेल, यावर माझा पूर्ण विश्वास आहे. स्पर्धेत आम्ही कुठलीही कसर सोडणार नाही. भारताने अनेक वेळा अंतिम फेरी गाठली आहे. सर्वात संस्मरणीय म्हणजे २०१७ साली इंग्लंडमध्ये भारताने अंतिम फेरी गाठली, परंतु भारताला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते, परंतु अद्याप भारताला विश्वकिताब जिंकता आलेला नाही, असे ती म्हणाली.

विश्वचषक स्पर्धा ३० सप्टेंबरपासून सुरू होत आहे, त्याआधी १४ सप्टेंबरपासून गतविजेत्या व स्पर्धेतील आवडत्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध घरच्या मैदानावर एकदिवसीय मालिका होणार आहे.

ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणे नेहमीच आव्हानात्मक असते व आम्हाला आमची स्थिती काय आहे हे कळते. ही मालिका आम्हाला खूप आत्मविश्वास देईल, असेही ती म्हणाली. (वृत्तसंस्था)

### आयसीसी महिला वन-डे विश्वचषकाचे अनावरण




सोमवारी मुंबईत आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषकाच्या अनावरण समारंभात क्रिकेटपटू हरमनप्रीत कौर व स्मृती मंधाना

# वेस्ट इंडीज संघाचा पाकिस्तानवर मोठा विजय

## वनडे मालिकेत १-१ ने बरोबरी अंतिम लढत आज रंगणार

**तारुबा, ११ ऑगस्ट**

पावसामुळे षटकांची मर्यादा कमी झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात रोस्टन चेस व जस्टिन ग्रीव्हजच्या नेतृत्वाखाली वेस्ट इंडीजने १० चेंडू शिल्लक ठेवत पाकिस्तानवर ५ गड्यांनी विजय मिळवला आणि तीन सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत मिळविली. आता मंगळवारी होणारा उभय संघादरम्यानचा सामना मालिकाविजयासाठी निर्णायक ठरणार आहे.

त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या तारोबा येथील ब्रायन लारा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या वन-डे सामन्यात पावसाच्या व्यत्ययामुळे षटकांची मर्यादा कमी करण्यात आली. यात प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने ३७ षटकांत ७ बाद १७१ धावा काढल्या. वेस्ट इंडीजला विजयासाठी सुधारित धावांचेच लक्ष्य देण्यात आले, त्यांना ३५ षटकांत १८१ धावा काढायच्या होत्या व त्यांनी ३३.२ षटकांतच ५ बाद १८४ धावांपर्यंत मजल मारली. ४७ चेंडूंत नाबाद ४९ धावांची विजयी खेळी व २६ धावांच्या मोबदल्यात एक बळी टिपणारा रोस्टन चेस सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

पाकिस्तानला १७१ धावांवर रोखताना वेस्ट इंडीजच्या उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज जेडेन सील्सने सात षटकांत २३ धावा देऊन ३ बळी टिपले. पाकिस्तानकडून हसन नवाझ (३६) व हसन तलतने (३१) सर्वाधिक धावा काढल्या.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना शेर्फन रदरफोर्डने ३३ चेंडूंत ४५ धावांचे, तर कर्णधार शाय होपने ३५ चेंडूंत २ चौकार व एका षट्कारसह ३२ धावांची भर घाली. रोस्टन चेस व जस्टीन ग्रिव्हजने नाबाद खेळी करत वेस्ट इंडीजचा विजय साकार केला. रोस्टने ४१ चेंडूंत ४ चौकारव २ षट्कारसह नाबाद ४९ धावांची, तर ग्रिव्हजने ३१ चेंडूंत एका षट्कारसह नाबाद २६ धावांची खेळी केली.

एकदिवसीय मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना मंगळवारी त्याच स्टेडियमवर होणार आहे. फ्लोरिडामध्ये खेळलेली मागील टी-२० मालिका पाकिस्तानने २-१ ने जिंकली. (वृत्तसंस्था)

# कोकोची झिन्यूवर मात; अल्काराझ, झ्वेरेव्हची आगेकूच

### सिनसिनाटी ओपन टेनिस

**सिनसिनाटी, ११ ऑगस्ट**

येथे सुरु असलेल्या सिनसिनाटी ओपन टेनिस स्पर्धेत विम्बल्डन विजेती पोलंडच्या इगा स्वियातेकला तिसऱ्या फेरीतील प्रतिस्पर्धी युक्रेनची मार्टा कोस्ट्युक हिच्याकडून पुढे चाल मिळाली. मार्टाने उजव्या मनगटाला दुखापत झाल्यामुळे स्पर्धेतून माघार घेतली, त्यामुळे सहा वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेती स्वियातेकला पुढील फेरीत सहज प्रवेश मिळाला. पोटाच्या दुखापतीमुळे कॅमिला ओसोरियोने माघार घेतल्यामुळे २०१७ ची रोलॅण्ड गॅरोस विजेती जेलेना ओस्टापेन्को हिलाही पुढे चालम मिळाली. दरम्यान, फ्रेंच ओपन विजेती कोको गॉफने दुसऱ्या फेरीत चीनच्या वांग झिन्यूचा ७१ मिनिटांत ६-३, ६-२ असा पराभव केला. गत वर्षी आर्यना सबालेन्काची उपविजेती राहिलेली तिसरी मानांकित जेसिका पेगुलाने किम्बर्ली बिरेलचा ६-४, ६-३ असा पराभव केला. सातवी मानांकित जास्मिन पाओलिनीनेही ग्रीसच्या मारिया सक्कारीचा ७-६ (७/२), ७-६ (७/५) असा पराभव केला.पुरुषांच्या विभागात कार्लोस अल्काराझने दुसऱ्या सेटच्या घसरगुंडीतून झुंज देत दामिर झुमहूरवर ६-१, २-६, ६-३ असा विजय मिळवला. तिसऱ्या मानांकित अॅलेक्झांडर इवेरेव्हने अमेरिकेच्या वाईल्ड कार्डधारी निशेष बसवरेड्डीविरुद्ध ६-३, ६-३ असा विजय मिळवला. जगात १०९ व्या क्रमांकावर असलेल्या २० वर्षीय बसवरेड्डीवर मात करण्यासाठी इवेरेव्हला केवळ ६६ मिनिटे लागली. टोरंटोमध्ये आपले पहिले मास्टर्स १००० जेतेपद जिंकणारा अमेरिकन बेन शेल्टनने कॅमिलो युगो कार्बेल या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध ६-३, ३-१ असा सहज विजय मिळवला. (वृत्तसंस्था)

# बुद्धिबळ स्पर्धेने सोलापूर विद्यापीठ महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेस सुरुवात

- मंगळवेढेच्या दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालयाकडे स्पर्धेचे यजमानपद

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. ९ ऑगस्ट-**

पंढरपूर येथील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनियरींग येथे १८ ते २० ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या बुद्धिबळ स्पर्धेने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेस सुरवात होईल.




या स्पर्धेचे यजमानपदाचा मान दलितमित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा या महाविद्यालयास मिळाला आहे. २०२५ हे शिक्षण प्रसारक मंगळवेढा या संस्थेचे अमृत महोत्सवी वर्ष असून याच वर्षी यजमान पदाचा मान मिळाल्यामुळे संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. महाविद्यालयात क्रीडा परिषदेच्या बैठकीत यंदाच्या वर्षातील ३२ खेळांच्या स्पर्धेचे स्थळ व कालावधी निश्चित करण्यात आला अससल्याचे महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक तथा स्पर्धा सचिव विशाल होनमाने यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ.अतुल लकडे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र गायकवाड, माऊली कॉलेजचे प्राचार्य डॉ.शिरीष भोसले, गणपतराव देशमुख विज्ञान महाविद्यालय सांगोलाचे प्राचार्य डॉ.मुलाणी, सांगोला महाविद्यालयाचे डॉ. सुरेश भोसले, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सचिन गायकवाड आदी उपस्थित होते. या बैठकीस संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम व संचालिका प्रा.तेजस्विनी कदम, उपाध्यक्ष डॉ.सुभाष कदम यांचे मार्गदर्शन लाभले.

**स्पर्धेचे वेळापत्रक (खेळ प्रकार, स्पर्धा कालावधी व आयोजक महाविद्यालय)**

बुद्धिबळ ( १८ ते १० ऑगस्ट, स्वेरी अभियांत्रिकी पंढरपूर), लॉन टेनिस (२३ ऑगस्ट, दयानंद वेलणकर वाणिज्य), बॅडमिंटन (२५, २६ ऑगस्ट, शिवाजी बार्शी), धनुर्विद्या (३० ऑगस्ट, सुवर्णलता गांधी वैराग), बास्केटबॉल (३ व ४ सप्टेंबर, सांगोला महाविद्यालय), कबड्डी ( ९ ते ११ सप्टेंबर, दलितमित्र कदम गुरुजी मंगळवेढा), ज्युदो (१२, १३ सप्टेंबर, शिवाजी रात्र महविद्यालय), व्हॉलिबॉल (१६ ते १८ सप्टेंबर, माढा महाविद्यालय), क्रॉसकंट्री (२० सप्टेंबर, दीपक आबा साळुंखे पाटील महाविद्यालय कोळे), खो-खो (२३ ते २५ सप्टेंबर, दलित मित्र कदम गुरुजी मंगळवेढा), टेबल टेनिस (२९, ३० सप्टेंबर, शिक्षणशास्त्र बार्शी), क्रिकेट (१ आक्टोंबरपासून, केबीपी पंढरपूर), बॉक्सिंग (३, ४ आक्टोंबर, बाबुराव पाटील अनगर), जलतरण (७, ८ ऑक्टोंबर), कुस्ती (१०, ११ ऑक्टोंबर, दोन्ही दलित मित्र कदम गुरूजी मंगळवेढा), ॲथलेटिक्स (१३ ते १५ ऑक्टोंबर, डीबीएफ दयानद कला व शास्त्र), फुटबॉल (११ ते १३ नोव्हेंबर, हिराचंद नेमचंद वाणिज्य), मल्लखांब (१५ नोव्हेंबर, के. एन. भिसे कुर्डुवाडी), तलवारबाजी (१७ नोव्हेंबर, संगमेश्वर रात्र), शरीरसौष्ठव व वेटलिप्टींग (१९, २० नोव्हेंबर, शंकरराव मोहिते अकलूज), हॉकी (२४, २५ नोव्हेंबर, सोशल), तायक्वोंदो (२८, २९ नोव्हेंबर, उमा पंढरपूर), पॉवरलिप्टींग (२ डिसेंबर, शिवाजी रात्र), रायफल व पिस्तूल शूटींग (४ डिसेंबर, व्ही. जी. शिवदारे), गतका (८ डिसेंबर, महाडीक मोडनिंब), हँडबॉल (१०, ११ डिसेंबर), कराटे (१६ डिसेंबर), योगा (१९ डिसेंबर), बेसबॉल ( २३, २४ डिसेंबर), सॉफ्टबॉल (९, १० जानेवारी), टेनिस व्हॉलिबॉल (१६जानेवारी), शुटींग व्हॉलिबॉल (२१ जानेवारी), सर्व दलित मित्र कदम गुरुजी मंगळवेढा).

## महत्वाचे...



### रेणुका हब्बू यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

निवृत्त शिक्षिका रेणुका राजशेखर हब्बू यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला. करंजकर विद्यालयाच्या शिक्षिका रेणुका हब्बू ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाल्या. सोलापूर आकाशवाणीचे अभियंता नंदकुमार बेडगे यांनी रेणुका हब्बू यांचा सत्कार केला. यावेळी रेणुका हब्बू यांच्या शैक्षणिक कारकिर्दीची व सामाजिक क्षेत्रातील योगदानाची माहिती वर्षा हब्बू यांनी दिली. कार्यक्रमास विजया बेडगे, सोलापूर वार्ताचे संपादक बसवेश्वर बेडगे, सारिका बेडगे, ओम बेडगे, अनुराधा बेडगे, अंकिता बेडगे, ऋषिकेश बेडगे, एन डी पाटील, कल्पना पाटील, राजशेखर हब्बू, रोहित हब्बू, नागेश जोकार, धनश्री बेडगे, संगिता जोकार, सदाशिव बेडगे उपस्थित होते.



### चव्हाण 'प्रीमिया' या प्रीमियम स्पोर्टबाईक शोरूमचे उद्‌घाटन

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

दुचाकी उद्योगातील आघाडीची नाव असलेले चव्हाण उद्योग समूह आपल्या ३५ वर्षांच्या यशस्वी प्रवासानंतर सोलापूरमध्ये 'प्रीमिया' या नावाने प्रीमियम शोरूम सुरू केले आहे. हॉटगी रोडवरील हॉटेल जय पॅलेस समोर असलेले हे नवीन शोरूम, ग्राहकांना प्रगत, पॉवरफुल आणि स्टायलिश दुचाकींचा दर्जेदार अनुभव देणार आहे. या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस आयुक्त एम. राजकुमार, बँक ऑफ महाराष्ट्रचे झोनल मॅनेजर संजीव कुमार, हीरो मोटोकॉर्पचे झोनल मॅनेजर (वेस्ट) अरुण कुमार संगीत्राव, आणि तखऊ्वे झोनल मॅनेजर (वेस्ट) रोहित विश्वकर्मा उपस्थित होते. उद्योग समूहाचे पुरुषोत्तम चव्हाण यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रस्ताविक शिवप्रकाश चव्हाण यांनी केले. घनश्याम चव्हाण यांनी आभार मानले.

### जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या उपाध्यक्षपदी समाधान विधाते

**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**



येथील युवा उद्योजक सम ाधान श्रीरंग विधाते यांची भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे महाराष्ट्राचे प्रभारी बाळासाहेब इतापे यांनी विधाते यांना निवडीचे अधिकृत पत्र दिले. यावेळी सोलापूर जिल्हा समन्वयक मुंढे, जिल्हा अध्यक्ष विजय थोरात, तालुकाध्यक्ष संगीता पवार, माजी सरपंच दादा विधाते, बाप्पा विधाते आदी उपस्थित होते. विधाते यांनी आजपर्यंत समाजातील गैर प्रकाराविरोधात केलेल्या कार्याबद्दल त्यांची ही निवड करण्यात आली आहे. निवडीबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## निधन वृत्त...

### प्रमिला अरळी

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**



बाळे येथील प्रमिला सिद्राम अरळी (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी निधन झाले. सोमवारीच रुद्रभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, तीन विवाहित मुले, सून व नातवंडे असा परिवार आहे.

### बबन बेन्द्रे

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**



श्रीपूर (ता. माळशिरस) येथील व्यवसायिक बबन बेन्द्रे यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे

### नवनाथ गायकवाड

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**



श्रीपूर (ता. माळशिरस) येथील मिलिंद नगरमध्ये राहत असलेले नवनाथ शिवाजी गायकवाड (वय ८५) यांचे वार्धक्याने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले सुना नातवंडे असा परिवार आहे. बौध्द धर्म आचार्य राजकुमार गायकवाड तसेच पुणे येथील कामगार नेते विजय गायकवाड यांचे ते वडील होत.

### बसवराज बनसोडे

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**



येथील अंत्रोळीकर नगर सोसायटीचे मुख्य प्रवर्तक, माजी कृषी अधिकारी बसवराज उर्फ बी. टी. तिप्पण्णा बनसोडे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मंगळवेढा तालुक्यातील बोराळे या त्यांच्या मूळ गावी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून व नातवंडे असा परिवार आहे.

### मल्लप्पा सोड्डे

**अक्कलकोट, दि. ११ ऑगस्ट-**



उडगी येथील सेवानिवृत्त शिक्षक मल्लप्पा गुरप्पा सोड्डे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. मृत्यू समयी ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, चार मुली, सून नातवंडे असा परिवार आहे.

# भाड्याच्या जेसीबीने वाढदिवस करण्याची आमची संस्कृती नाही

## ● सभापती हरिष गायकवाड : आ.पाटील यांच्या झालेल्या वाढदिवसाबद्दल केले भाष्य



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ ऑगस्ट -**

भाड्याने जेसीबी लावून वाढदिवस साजरा करण्याची पांडुरंग परिवाराची संस्कृती नाही. या बरोबरच येणाऱ्या काळात कोणाला माणसे मिळणार नाहीत हे काळच ठरवेल अशी टीका येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड यांनी माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांचे नाव न घेता केली.

प्रतिवर्षीप्रमाणे स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांची पाचवी पुण्यतिथी तसेच पांडुरंग परिवाराचे नेते माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजोपयोगी कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी पांडुरंग परिवारातील सर्व प्रमुख पदाधिकारी तसेच युवक कार्यकर्त्यांची विचार विनिमय बैठक पंढरपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात नुकतीच पार पडली. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सभापती हरिष गायकवाड यांनी नाव न घेता माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांच्यावर टिका केली. दरम्यान नियोजन बैठकीसाठी युवक नेते प्रणव परिचारक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश गायकवाड, उपसभापती राजूबापू गावडे, पांडुरंग कारखान्याचे माजी चेअरमन दिनकर मोरे, पांडुरंग कारखान्याचे व्हाईस चेअरमन कैलास खुळे, लक्ष्मण धनवडे, भाजपा तालुकाध्यक्ष सुभाष मस्के, शहराध्यक्ष रोहित पानकर यांच्यासह पांडुरंग परिवारातील युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान बैठकी नंतर माध्यमांशी बोलताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश गायकवाड म्हणाले की स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांनी दिलेल्या शिकवणीनुसार पांडुरंग परिवार काम करीत आहे. स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन पंढरपूर आणि परिसरात करण्यात येणार आहे. यामध्ये महिलांची आरोग्य तपासणी, लहान मुलांची दंत तपासणी, सर्व रोग निदान शिबिर, रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी शिबिर यासह शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, मातोश्री वृद्धाश्रम येथे मिष्ठान्न भोजन यासह विविध समाज उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असल्याचे सांगितले.

या नियोजन बैठकीसाठी पंढरपूर तालुक्यातील पांडुरंग परिवारातील सर्व प्रमुख नेते मंडळी व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**▸ आचारसंहिता आणि संस्कृतीच्या बाहेर जात नाही**

दरम्यान बैठकी नंतर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड यांनी पत्रकारांना बैठकीतील निर्णया संदर्भात माहिती दिली. यावेळी पत्रकारांनी आमदार अभिजीत पाटील यांनी परिचारकांवर केलेल्या टिकेकडे सभापती हरिष गायकवाड यांचे लक्ष वेधले असता सभापती गायकवाड यांनी सांगितले की, पांडुरंग परिवाराला एक आचारसंहिता घालून दिलेली आहे. त्यामुळे पांडुरंग परिवारातील कार्यकार्ता आचारसंहिता आणि संस्कृतीच्या बाहेर कधीच जात नाही. तसेच कार्यक्रमांना माणसे कोठुन आणणार या आमदार पाटील यांनी व्यक्त केलेल्या चिंते बद्दल बोलताना गायकवाड म्हणाले, यावर पांडुरंग परिवाराकडे माणसे आहेत कि नाही त्याचे योग्य वेळी उत्तर दिले जाईल. भाड्याने जेसीबी लावून वाढदिवस साजरा करण्याची आमच्या पांडुरंग परिवाराची संस्कृती नाही. आमच्या पांडुरंग परिवाराचा प्रत्येक कार्यकर्ता मनापासून स्वखर्चानेच वाढदिवस साजरा करीत असतो असे देखील गायकवाड यांनी यावेळी बोलताना आवर्जुन सांगितले.

**▸ ब्रँण्ड कधी काँपी करीत नसतो : गायकवाड**

यावेळी गायकवाड म्हणाले, पांडुरंग परिवाराच्या नियोजन बैठकीचे निमंत्रण पांडुरंग परिवाराकडून ज्यावेळी सोशलमिडीयावर प्रसिध्द करण्यात आले. त्यावेळी काँपी करायची नाही अशी आमच्या पोस्टवर कमेंट करण्यात आली. मात्र आपल्या माध्यमातून अशा प्रकारच्या कमेंट करणाऱ्यांना आपण सांगु इच्छितो की,परिचारक आणि पांडुरंग परिवार हा एक ब्रॅण्ड आहे. त्यामुळे ब्रॅण्ड कधी दुसऱ्याची काँपी करीत नसतो. उलट दुसरे लोकंच ब्रॅण्डची काँपी करीत असतात ऐवढे त्यांनी लक्षात ठेवावे असे गायकवाड यांनी आवर्जुन सांगितले.

# पंढरपूर 'एसकेएन सिंहगड'च्या विद्यार्थ्यांची टीई कनेक्टिव्हिटीत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ ऑगस्ट -**

एसकेएन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कोर्टी पंढरपूर येथील अंतिम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी टीई कनेक्टिव्हिटी इंडिया प्रा. लि., शिरवळ या नामवंत बहुराष्ट्रीय कंपनीत भिंगेवाडी, ता. आटपाडी येथील जय पाटील, पापरी, ता.मोहोळ येथील प्रशांत घागरे, अकलुज येथील शिवम फुले, एखतपूर, ता.सांगोला येथील विक्रम कबाडे यांची कॅम्पस प्लेसमेंटद्वारे यशस्वी निवड झाली असल्याची माहिती मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. श्याम कुलकर्णी यांनी दिली.



जय पाटील | प्रशांत घागरे | शिवम फुले | विक्रम कबाडे

टीई कनेक्टिव्हिटी ही एक जागतिक दर्जाची आघाडीची कंपनी असून, ती सेन्सर्स, कनेक्टर्स व डेटा सोल्यूशन्सच्या निर्मितीत कार्यरत आहे. कंपनीचे उत्पादन ऑटोमोटिव्ह, एरोस्पेस, औद्योगिक यंत्रणा, डिफेन्स व अन्य अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वापरले जाते. शिरवळ (जि. सातारा) येथील युनिट हे उत्पादन प्रक्रियेतील एक महत्त्वाचे केंद्र असून, येथे आधुनिक यंत्रसामग्री व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरून विविध उत्पादने तयार केली जातात. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले, विद्यार्थ्यांची ही निवड म्हणजे त्यांच्या मेहनतीचा आणि महाविद्यालयाच्या गुणवत्ता-प्रधान शिक्षणपद्धतीचा उत्तम नमुना आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशी संधी मिळणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. यशाबद्दल प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी , ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ. समीर कटेकर, डॉ. चेतन पिसे, डॉ. भालचंद्र गोडबोले, डॉ. श्रीगणेश कदम, डॉ. संपत देशमुख, डॉ. अल्ताफ मुलाणी, डॉ. सुभाष पिंगळे, डॉ.अनिल निकम, डॉ. शिवशंकर कोंडूरु डॉ. बाळासाहेब गंधारे, डॉ. अतुल आराध्ये, डॉ. सोमनाथ कोळी, डॉ. यशवंत पवार, डॉ. दिपक गानमोटे, डॉ. सत्यवान जगदाळे, प्रा. अभिजित सवासे, प्रा. अतुल कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.

### दुचाकीच्या चाकात साडी अडकल्याने महिला जखमी

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

सोलापूर ते वाफळे गाव (ता. मोहोळ) जाताना दुचाकीच्या चाकात साडी अडकून पडून महिला जखमी झाली. हा अपघात रविवारी दुपारी ४.३० वाजता घडला. रेखा विजयकुमार भांगे (वय ४०, रा. वाफळे ता मोहोळ) असे महिलेचे नाव आहे. रविवार दहा ऑगस्ट रोजी दुपारी ४.३० वाजता रेखा या दुचाकीवर बसून वाफळे येथे जात होत्या.

वाफळे गावाजवळील माने वस्ती येथे मागच्या चाकात साडी अडकून त्या खाली पडल्या. यात त्यांच्या डाव्या पायाला जखम झाली तर हाता खरचटल्याने खासगी रुग्णालयात उपचार करून भाऊ सुनील घुले याने सोमवारी दुपारी ४.१० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# बार्शी सेवाकेंद्रात रक्षाबंधनाचा उत्सव; रक्तदानासाठी ५९ जणांची नोंदणी

**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या बार्शी सेवा केंद्रामध्ये रक्षाबंधन व शांती अनुभूती सत्र झाले.२४ ऑगस्ट रोजीच्या शिबिरात रक्तदानाचा संकल्प करणे हीच खरी ओवाळणी ठरेल, असे आवाहन केले. त्याला प्रतिसाद देत ५९ जणांनी नोंदणी केली. या कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक धानप्पा शेटे, सेवानिवृत्त उपप्राचार्य शशिकांत धोत्रे उपस्थित होते.



सोलापूर उपक्षेत्र संचालिका सोमप्रभादिदी, बार्शी सेवाकेंद्र संचालिका संगीतादिदी, परांडा उपसेवाकेंद्र संचालिका म हादेवीदिदी, वैराग उपसेवाकेंद्र संचालिका मीरादिदी, निशादिदी यांनी सर्वांना प्रेमपूर्वक राखी बांधली. त्यापूर्वी झालेल्या शांती अनुभूती सत्रात अनितादिदी करवा यांनी उपस्थितांना गाईडेड मेडिटेशनद्वारे आत्मिक शांतीचा गहन अनुभव दिला.

याप्रसंगी सोमप्रभादिदींनी शांती अनुभूती सत्र व दि. २४ ऑगस्ट रोजी आयोजित होणाऱ्या रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल संगीतादिदी, निशादिदी, अनितादिदी करवा व मोहन बुचडे यांचे मुक्तकंठाने कौतुक केले.

# एकता महिला मंचचे पोलीस ठाण्यात रक्षाबंधन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**




एकता महिला मंच बार्शी तालुका यांच्यावतीने आज बार्शी तालुका पोलीस स्टेशनला पोलीस बांधवांना राखी बांधण्याचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जनतेच्या रक्षणासाठी सदैव तत्पर असणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना रक्षाबंधनासाठी त्यांच्या घरी जाणे शक्य नसते. बहिणीची उणीव भासू नये या हेतूने एकता महिला मंचच्या माध्यमातून बार्शी तालुका पोलीस स्टेशनला राख्या बांधून भावा-बहिणींच्या नात्याची वीण घट करण्यात आली.

यावेळी उपविभागीय कार्यालय बार्शी, तालुका पोलीस स्टेशन येथे मंचच्या सदस्या पोलीस ठाण्यात जाऊन राखी बांधून रक्षाबंधन मोठया उत्सहात साजरा करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी अशोक सायकर, सहायक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, पोलीस हवालदार राजेंद्र मंगरुळे, अभिजीत गाटे, राहुल बोंदर, अमित घाडगे, आकाश कांबळे, सुरेश बिरकले, कावळे, खांडेकर, काळेल, आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते. तसेच एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर, नुरजहा शेख, इरशाद शेख, तेजश्री घेमाड, सीना भोसले, सीमा चव्हाण, जास्मिन शेख, गीताजली लंगोटे, भाग्यश्री पाटील, स्वाती चव्हाण, रेश्मा घेमाड, करिष्मा शेख, सविता गरड, सारिका ढावारे, स्वाती होनराव, तेजस्वी पाटील व अन्य सदस्या उपस्थित होत्या. सूत्रसंचालन व प्रास्ताविक भाग्यश्री पाटील यांनी केले.

> एकता महिला मंचच्या माध्यमातून महिला सदस्यांनी पोलीस बांधवांना राखी बांधून पोलिसांचा आनंद द्विगणित केला. तसेच सणासुदीच्या काळात देखील आम्हा पोलिसांना आमच्या घरी जाणे शक्य नसते. त्याची उणीव तुम्ही आज आम्हाला भासू दिली नाही त्याबद्दल तुमचं खरंच खूप कौतुक. असे नेहमीच सामाजिक कार्य आपल्या हातातून घडत राहो हे देखील माझ्याकडून सदिच्छा!
>
> **- अशोक सायकर, पोलीस उपविभागीय अधिकारी**

> एकता महिला मंचच्या माध्यमातून आज सदस्यांनी मला येऊन राखी बांधली. एकता महिला मंच यांचे कार्य कौतुकास्पद आहे आणि इथून होणाऱ्या पुढील कार्यासाठी मी शुभेच्छा देतो.
>
> **- एफ. आर. शेख, तहसीलदार**



## भाड्याने देणे आहे

जुनी पोलीस लाईन चाळ मुरारजी पेठ येथील '**मंगल कार्यालय**' भाड्याने देणे आहे. बंद लिफाफामध्ये भाडे नोंद करावी. दि. १४/०८/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुदत आहे.

दि. ११/०८/२०२५ — **सही/- सेक्रेटरी** | **सही/- चेअरमन**

**जुनी पोलीस लाईन भाडेकरु सहकारी गृहनिर्माण संस्था मार्यादित, सोलापूर**





## जाहीर सावधानतेची सूचना

जनजागृती प्रबोधन मंच संचलित, मूक-बधिर निवासी शाळा, टेंभुर्णी. मा. आयुक्त साहेब, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे यांच्या आदेशाने ही शाळा मौजे. टेंभुर्णी, ता. माढा. जि. सोलापूर या शाळेची सांगोला येथील विद्यार्थांची गैरसोय होऊ नये म्हणून स्थंलातरण आदेशातील सूचनेनुसार सांगोला येथिल त्याच इमारतीमध्ये मौजे तिप्पेहळ्ळी, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील श्री स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय संस्था संचलित, मूक-बधिर निवासी शाळा सांगोला. प्रबोधन नगर, मिरज रोड, पाण्याच्या टाकीजवळ, सांगोला, ता. सांगोला. जि. सोलापूर येथे सुरू करण्यात आलेली होती तशा स्वरूपाचा पत्र व्यावहार कार्यालयांकडे करण्यात आलेला आहे.

असे असताना ज्ञानेश्वर भानूदास बाबर. (सन १९९१ मध्ये जनजागृती प्रबोधन मंच संस्थेतून नाव कमी) स्वयंघोषीत अध्यक्ष, रामचंद्र बाबा केंगार (जनजागृती प्रबोधन मंच संस्थेत फक्त २०१७ ते २०१८ फक्त १ वर्षा करीता परिशिष्ठ अ वा नोंद) स्वयंघोषीत सचिव व वसंत बाबाबसाहेब पाटील (१५/०२/२०२५ रोजी पासून सेवासमाप्त) स्वयंघोषीत मूख्याध्यापक म्हणून मा. हायकोर्ट, मुंबई WRIT PETITION NO.13543 OF 2024 यांच्याद्वारे पारीत करण्यात आलेल्या टेटस्कोपचा चूकिचा अर्थ भासवून पंचायत समिती, सांगोला. समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर व प्रथमिक शिक्षण विभाग, सोलापूर यांच्याकडे खोटा व चूकीचा पत्र व्यावहार करत राजकीय दबाव आणत आहेत.

संबंधित व्यक्तींकडे कोणत्याही प्रकारचे आदेश नसताना सांगोला येथिल पालकांची दिशाभूल करून अध्यक्ष जनजागृती प्रबोधन मंच, टेंभुर्णी, ता. माढा. जि. सोलापूर यांनी अध्यक्ष श्री स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय संस्था, सांगोला यांना शाळेकरीता भाडे तत्वावरती दिलेल्या इमारतीमध्ये सदरील व्यक्तींनी जबरदस्तीने घुसखोरी करून कब्जा घेऊन श्री स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय संस्था संचलित, मूक-बधिर निवासी शाळा, सांगोला या शाळेतील विद्यार्थ्यांचे फोटो काढून आमची शाळा व आमची इमारत असल्याचे शासकीय कार्यालयांना चूकीचे भासवून त्यांची दिशाभूल करीत आहे व राजकीय दबाव आणून टेंभुर्णी येथे व्यवस्थित असलेली शाळा मौजे. सांगोला येथे सुरू आहे असे भासवत आहेत.

या प्रकरणी श्री स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक व बहुउद्देशीय संस्था, सांगोला या संस्थेचे अध्यक्ष यांनी मा. हायकोर्ट, मुंबई CIVIL WRIT PETITION Stamp NO. 25025 OF 2025 नूसार संबंधीत विरूद्ध याचिका दाखल केलेली आहे. तसेच जनजागृती प्रबोधन मंच या संस्थेचे अध्यक्ष यांनी ज्ञानेश्वर भानूदास बाबर व रामचंद्र बाबा केंगार यांचेवर सांगोला कोर्ट, सांगोला येथे याचिका क्र. Cri.M.A./680/2023 नूसार दाखल केलेली आहे. तसेच वसंत बाबासाहेब पाटील यांचे विरूद्ध सांगोला कोर्ट, सांगोला याठिकाणी याचिका दाखल केलेली आहे. तसचे संबंधीताविरूद्ध श्रीमती. शैलजा लालासाहेब पाटील यांनी सांगोला कोर्ट, सांगोला याठिकाणी दावा क. १६३/२०२५ नुसार मानहानीचा दावा सुरू आहे.

१. अनिल वसंत कांबळे. २. लक्ष्मण भिमराव खरात. ३. उमेश मारूती कोळेकर. ४. शशिकांत राजाराम गायकवाड. ५. दिपक भगवान गेजगे. हे जनजागृती प्रबोधन मंच संचलित, मूक बधिर निवासी शाळा, टेंभुर्णी. या शाळेचे कर्मचारी होते दिनांक २९/०७/२०२४ रोजी पासून शाळेच्या मूळ मौजे टेंभुर्णी याठिकाणी गैरहजर आहेत कारण त्यांना स्वतांचे जोड व्यवसाय संभाळत दुय्यम काम म्हणून नोकरी करावयाची असल्या कारणाने सांगोलाहून टेंभुर्णी याठिकाणी जाणे त्रासदायक वाटत असल्याकरणाने त्यांच्या स्वार्थापोटी वरील ३ स्वघोषीतांना शामील झालेले आहेत सदरील व्यक्तींची सेवा समाप्त झालेली असून देखील दूसऱ्यांच्या शाळेमध्ये बसून सेवेत असल्याचे चूकिचे दाखवत आहे. केवळ संस्थेची बदनामी करण्याच्या हेतूने स्वतःच्या स्वार्थासाठी राजकीय दबाव आणत सार्वांची दिशाभूल करीत आहेत यांच्याद्वारे पसरविल्या जाणाऱ्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवण्यात येऊ नये.

**सही/-**
**अध्यक्ष**
**जनजगृती प्रबोधन मंच, टेंभुर्णी**
**गट क्र ९४/१ जुना सोलापूर, पुणे हायवे, चव्हाणवाडी, टेंभुर्णी, ता. माढा, जि. सोलापूर**



# अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयातील धन्वंतरी औषधी वनस्पती उद्यानात विद्यार्थ्यांचे श्रमदान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.११ ऑगस्ट-**

अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयातील राष्ट्रीय आयुष अभियान धन्वंतरी औषधी वनस्पती उद्यानास विद्यार्थ्यांनी भेट देऊन श्रमदान केले. तसेच एक पेड मा के नाम ही संकल्पना राबविण्यात आली.



अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयातील धन्वंतरी औषधी वनस्पती उद्यानास मंगरुळे प्रशाला व खेडगी कॉलेजमधील एनसीसीच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी भेट देऊन श्रमदानातून स्वच्छता केले. आयुष वैद्यकीय अधिकारी डॉक्टर सतीश बिराजदार यांनी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना वनस्पती उद्यानातील विविध गुणकारी वृक्षांची माहिती दिली. ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथील आवारात जवळपास ५० विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये शतावरी, शमी, आपटा, आवळा, अर्जुन, विटा, सात प्रकारची तुळस, कवट, बांबू भद्राक्ष, रुद्राक्ष, गोकर्ण वेल, करवंद, गवती चहा, ऑल स्पायसी, तीन प्रकारचे लिंबू, लाजाळू, अन्नपूर्णेश्वरी आदींसह विविध वनस्पती वृक्षांचे लागवड करण्यात आल्याची माहिती आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीश बिराजदार यांनी दिली. वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर अशोक राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सदरच्या वनस्पती उद्यानाची निर्मिती करण्यात आली आहे. यावेळी मंगरूळे प्रशालाचे मुख्याध्यापक नंदाजी कदम, शिक्षक डफले, ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी याबाजी, शंकर कुंभार, श्रीमती वानखडे सिस्टर, खेडगी महाविद्यालयाचे एनसीसी अधिकारी कॅप्टन डॉक्टर बी.एन. कोणदे उपस्थित होते.

## महत्वाचे...



### श्री रेवणसिद्धेश्वर महाराज पालखी सोहळा मोठ्या भक्तीभवात संपन्न

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

श्रावण महिन्यामध्ये निघणाऱ्या जगद्गुरु श्री रेवणसिद्धेश्वर महाराजांची पालखी तिसऱ्या रविवारी मोठ्या भक्तीभावाने मार्गस्थ झाली. याप्रसंगी सुरेश पाटील यांच्या शुभहस्ते पालखीचे पूजन संपन्न झाले. त्यानंतर पारंपारिक वाद्या वाजवत मोठ्या भक्तीभावाने ही मिरवणूक जोडभावी पेठ चिद्रे वाडा येथून, कुंभारवेस, मंगळवार पेठ, मधला मारुती, आजोबा गणपती, विजापूर वेस, गुरु भेट, सात रस्ता मार्गे विजापूर रोड येथील रेवनसिद्धेश्वर मंदिरात जाते, त्यानंतर महाआरती होऊन महाप्रसादाचा वाटप होतो. याप्रसंगी रेवणसिद्धेश्वर समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष गंगाधर यादवाड, गिरमलप्पा हिंगमिरे, सिद्धेश्वर दुलंगे, अशोक चाकोते, राजशेखर दुलंगे, शिवानंद ख्याडे, ॲड मल्लिनाथ राचेट्टी, बसवराज हिंगमिरे, आशिष दुलंगे, मल्लिनाथ सोलापुरे, सागर अतनूरे, गुरुराज पडमगोंडा, सतीश परेल्ली, आंनद खटके, केतन वारद, शिवानंद सुलतानपूरे, भागेश ख्याडे, चिदानंद बगले, रोहित बिद्री, ऋषिकेश हिंगमिरे, बबलू परचंडे, शीतल निकम, बसवराज काटगावकर, अध्यक्ष श्रीशैल जकापुरे, सुरज कोरे, शरण बिराजदार, श्रीशैल अंकद, बसवराज आवटी, सुरेश धनश्री, मंथन चिडगुंपी, ऋतुराज वाघमोडे, संकेत अल्लोळी, शुभम वडतीले, अभिजित तांडूरे, ऋषभ चारी, मल्लिकार्जुन करजगी, वरद होमकर, योगीनाथ हुबळीमठ, शशांक दुलंगे, ओंकार हवले, प्रशांत राऊर आदी उपस्थित होते.

### सिद्धी झगडे यांनी जिंकला श्रावण क्वीन सेकंड रनर अपचा किताब

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

अत्यंत प्रतिष्ठित अशा श्रावण क्वीन स्पर्धेत चूरशीच्या लढतीत सिद्धी संतोष झगडे यांनी प्रचंड मेहनत घेऊन सेकंड रनर अपचे पारितोषिक मिळवले. त्यांना स्वर स्वामी कला साधनाचे संचालक गणेश हातगे, प्रियांका हातगे, सौरभ हातगे, राजेश हुनारी यांचे सहकार्य लाभले. श्रावण महिना म्हणजे व्रत, वैकल्य, उपवास सण वाराचा महिना. या महिन्यात महिलांचे मंगळा गौरीचे विशेष व्रत असते. मंगळागौर हे हिंदू धर्मातील एक व्रत आहे. ते श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी नवविवाहित महिलेने लग्नानंतर पहिली पाच वर्षे करावयाचे असते. यासाठी अशाच इतर नवविवाहितांनाही बोलावून सकाळी एकत्रित पूजा करतात व त्यानंतर रात्री जागरण करतात. यात विविध प्रकारचे खेळ खेळण्यात येतात. दादासाहेब फाळके पुरस्कारासह अनेक सन्मानाचे पुरस्कार विजेत्या सुवर्णलता प्रकाश वांगे यांनी शिवाजी मंदिर दादर मुंबई येथे या स्पर्धाचे आयोजन केले होते. यात मंगळागौरीत खेळल्या जाणाऱ्या खेळांचा समावेश होता. स्पर्धेचे परीक्षक म्हणून मिस इंडिया इंटरनेशनल विनर, मिस महाराष्ट्र कोमल रुपरेलिया, डान्स फॅशन आणि गरबा जुरी सिद्धेश जाधव यांनी काम पहिले. स्पर्धा प्रमुख म्हणून सुवर्णा भागवत यांनी तसेच वैशपायन गमरे, शेखर दाते, केदार वांगे, प्रशांत पवार यांनी व्यवस्थापनाचे काम पहिले. तन्वी बनसोडे यांच्या निवेदनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.




# सहा कोटी रूपयांचे एमडी ड्रग्ज प्रकरण; दोन आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट -**

मोहोळ येथील गाजलेल्या सहा कोटी रूपयांचा एमडी ड्रग्ज प्रकरणातील दोन आरोपींचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. कटारिया यांना फेटाळला.

किरणकुमार सुर्यकांत बिराजदार-पाटील (रा. बीदर, कर्नाटक) व आरोपी सनी अरूण पगारे (रा. नाशिक) अशी जामीन अर्ज फेटाळलेल्यांची नावे आहेत. याबाबत मोहोळ पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात सप्टेंबर २०२३ मध्ये किरणकुमार व सनी पगारे यांना करण्यात आली आहे. या दोन्ही आरोपींनी जिल्हा व सत्र न्यायाधीश कटारिया यांच्या न्यायालयात जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावर सरकार पक्षाने सक्त हरकत घेवून विरोध नोंदविला होता.

१७ ऑक्टोबर २०२३ रोजी मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी मोहोळ तालुक्यातील साई हॉटेल, देवडी पाटी येथे अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या दतात्रय घोडके व गणेश घोडके यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ६ कोटी २ लाख रुपये किंमतीचे ३ किलो १० ग्रॅम मॅफेड्रिन (एम डी) जप्त केले होते. याबाबत पोलीस उपनिरीक्षक आर एस कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोहोळ पोलिस ठाण्यात १८ ऑक्टोबर रोजी गुन्हा नोंदविण्यात आला. या गुन्ह्यात तपासामध्ये अजून अकरा आरोपी सामील आहेत असे निष्पन्न झाले व त्यांच्याकडून रूपये ९ कोटी २६ लाख ६० हजार रुपये इतक्या किंमतीचा अंमली पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला होता. त्यात सदर अर्जदार आरोपी हे अनुकमे सहा व अकरा आहेत. यामध्ये आरोपी किरण कडे चौकशी केली असता त्यांने एक मारूती ब्रिझा कार नं टी एस १५ इ पी ०१११ ही गाडी सदर अंमली पदार्थांच्या तस्करीसाठी व विक्री साठी वापरली तर आरोपी सनी हा अंमली पदार्थ विक्रीसाठी ते प्राप्त करण्याकरिता सोलापूर येथे आला होता अशी हकीकत आहे.

दोघांच्या जामीन अर्जावर जिल्हा सरकारी वकील प्रदिपसिंग राजपूत यांनी युक्तीवाद करताना आरोपींचा सकृत दर्शनी सहभाग असल्याचा भक्कम पुरावा सरकारपक्षाकडे असल्याचे सांगितले. आरोपीने कबुली जबाब देवून गुन्हाची कबुली दिली आहे. तसेच आरोपींने निवेदन देवून गुन्हातील मुददेमाल काढून दिला आहे. सदर आरोपी हे स-हाईत गुन्हेगार असुन सुमारे सहा कोटी रूपयांची ड्रग्जची (मॅफेड्रिन) (एम डी) विक्री करताना त्यांना पोलीसांनी रंगेहाथ पकडून तसा पंचनामा करून त्यावर न्यायाधीशांचे प्रमाणपत्र घेतले आहे. सदर आरोपी यांच्यावर विविध न्यायालयामध्ये दोन पेक्षा अधिक गुन्हे न्यायप्रविष्ठ असून सदर दोन्ही आरोपींचा गुन्हामध्ये व अंमली पदार्थ खरेदी व विक्री मध्ये सहभाग असून सदर आरोपी यांना जामीनावर सोडले असता ते बाहेर पळून जाण्याची व सदर अंमली पदार्थांची खरेदी-विक्री चालू करतील अशी शक्यता नाकारता येत नाही असा युक्तीवाद केला. सदर युक्तीवाद ग्राह्य धरुन जिल्हा व सत्र न्यायाधीश कटारिया यांनी सदर दोन्ही आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला.



### आयशर कंपनीचा वाळूने भरलेला ट्रक जप्त

- पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई
- ५ लाख १२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.११ ऑगस्ट -**

पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे आंबे या गावात पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनच्या पथकाने सोमवारी (दि.११) अवैधरित्या वाळू वाहतूक करणारा आयशर कंपनीचा ट्रक व त्यामध्ये दोन ब्रास वाळू एकूण किंमत ५ लाख १२ हजाराचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केलेला असून ट्रक चालक व मालक भैय्या उत्तम शिंदे (रा. आंबे गाव) याच्या विरुद्ध पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

या प्रकरणी यातील संशयित आरोपी भैय्या उत्तम शिंदे (रा.आंबे गाव) यास पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर,येथील उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर, पीएसआय भारत भोसले, पोलीस हेडकॉन्स्टेबल सुजित उबाळे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सुहास देशमुख,पोलीस हेड कॉन्स्टेबल मंगेश रोकडे यांच्या पथकाने केली.



सोलापूर : श्री चौडेश्वरी देवीची ज्योती उत्सव यात्रा साखरपेठेत आल्यावर नंगी फंडीला सोमवारी तोगटवीर समाजाचे कुलगुरू श्री श्री श्री दिव्य ज्ञानांत गिरी महाराज यांनी भेट दिली. यावेळी फंडीचे मानकरी श्रीनिवास गुर्रम, हिरालाल येरफुल, नारायण बत्तुल, श्रीनिवास पुजारी, दत्तात्रय बत्तुल.



सोलापूर : श्री सिद्धेश्वर मंदिरात श्रावणातील तिसऱ्या सोमवारी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी योग समाधीला फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. (छाया : केवल तिवारी)

### संभाजी आरमारच्या कार्यालयास पालकमंत्री गोरे यांची भेट

**सोलापूर दि. ११ ऑगस्ट-**

ग्रामविकासमंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोमवार दिनांक ११ ऑगस्ट रोजी संभाजी आरमारच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांच्या जयघोषात त्यांचे स्वागत करुन सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, हिंदू बहुभाषिक पुरोहित संघाचे अध्यक्ष पंडित वेणुगोपाल जिल्ला पंतलू, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी अक्षय अंजिखाने, संदीप जाधव, नागेश खरात, शिवाजी वाघमोडे, गजानन जमदाडे आदींसह संभाजी आरमारचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.



### अज्ञात कारणातून तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

जुना पुना येथील हांडे प्लॉट येथे सोमवारी सकाळी ८.३० च्या सुमारास तरुणाला अनोळखी सात ते आठ जणाच्या जमावाने मारहाण केली. वैभव सदाशिव कमले (वय २१, रा. हांडे प्लॉट, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. वैभव हा सोमवारी सकाळी ८.३० च्या सुमारास राहत्या घराजवळ थांबला होता. त्यावेळी तेथे आलेल्या आठ ते दहा जणांच्या अनोळखी जमावावाने फायबर बॅटने मारहाण केली. यात डोक्याला मार लागल्याने दुपारी १२.१० वाजता आनंद माने याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.




# आ. सुभाष देशमुख यांनी स्वत:पासून केली पर्यटन सप्ताह उपक्रमाची सुरुवात

- शहर जिल्ह्यातील तीर्थक्षेत्राचे सपत्नीक दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

सोशल फाउंडेशनतर्फे २७ सप्टेंबर जागतिक पर्यटन दिन ते २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती या कालावधीत सोलापूर पर्यटन सप्ताह २०२५ आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा शुभारंभ आमदार सुभाष देशमुख यांनी सपत्नीक सोलापूर शहर व जिल्ह्यातील प्रमुख धार्मिक तीर्थक्षेत्रांना भेट देऊन केला.

यावेळी आमदार देशमुख यांनी विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, सिद्धरामेश्वर व श्री मार्कंडेय मंदिराला भेट दिली. मल्लिकार्जुन महाराज व बाळे येथील खंडोबा मंदिर, रुपाभवानी मंदिर, वडवळचे नागनाथ मंदिर, नारायण चिंचोली मंदिर, मंगळवेढ्यातील रिद्धी-सिद्धी महागणपती व संत दामाजी पंत मंदिर, सरकोलीचे भैरवनाथ मंदिराचेही दर्शन घेतले. प्रत्येक ठिकाणी पर्यटन सप्ताहाबाबत माहिती देऊन भाविकांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. मंदिर समित्यांनी या कालावधीत विशेष कार्यक्रम व स्वागत सोहळे आयोजित करण्याची तयारी दर्शवली.



> धार्मिक पर्यटनामुळे सोलापूरच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळेल. पर्यटन सप्ताहाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी एकत्र काम करणे आवश्यक आहे. सोलापूर जिल्हा धार्मिक स्थळांनी या उपक्रमातून व्यापक प्रचार करण्याचा संकल्प केला आहे. धार्मिक श्रद्धा आणि पर्यटन विकास यांचा संगम साधण्याचा प्रयत्न यातून होणार आहे.
>
> **-सुभाष देशमुख, आमदार दक्षिण सोलापूर**







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.









## महत्वाचे...

### ट्रॅव्हल्समध्ये प्रवासी भरण्याच्या कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट -**

ट्रॅव्हल्समध्ये प्रवासी भरण्याच्या कारणावरून तरूणास लोखंडी सळईने मारहाण करून दात पाडणाऱ्यां चौघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत तुकाराम मारूती कांबळे (वय २१, रा. जय मल्हार चौक, बुधवार पेठ, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन सचिन शिवाजी गायकवाड (रा. न्यु बुधवार पेठ, सोलापूर) व इतर तीन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८ ऑगस्ट रोजी रात्री आठच्या सुमारास कारंबा नाक्याजवळील डी मार्टसमोर तुकाराम कांबळे हा ट्रॅव्हल्समध्ये प्रवासी भरत होता. त्यावेळी प्रवासी भरण्याच्या कारणावरून सचिन गायकवाड व त्याच्या तीन साथीदारांनी तुकाराम यास मारहाण करून लोखंडी सळईने डोकीत मारहाण केली. या मारहाणीत तुकाराम कांबळे याच्या तोंडातील एक दात तुटला. त्यामुळे याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक फौजदार ओव्हळ पुढील तपास करीत आहेत.

### शांती चौकातून ७० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट -**

शहरातील शांती चौक परिसरातून चोरट्याने ७० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत कालीदास रूतप्पा मन्नापूरे (वय ५२, रा. तुळजाभवानी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मन्नापूरे यांनी त्यांची एमएच १३ डीएक्स ९०५० क्रमांकाची दुचाकी ही ७ ऑगस्ट रोजी शांती चौकात हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार बाबर पुढील तपास करीत आहेत.

### उत्कर्ष नगरातून दुचाकी चोरी

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

शहरातील जुळे सोलापूरातील उत्कर्ष नगरातून चोरट्याने ९० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत स्वप्नील सुखदेव सन्नके (वय ३६, रा. उत्कर्ष नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वप्नील सन्नके यांनी त्यांची एमएच १३ ईएल १६६६ क्रमांकाची दुचाकी ही १० ऑगस्ट रोजी घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद विजापूर नाका पोलिसांकडे करण्यात आली आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत.



# घरकुल लाभार्थ्यांना मिळणार एक लाख रुपये

## पंडीत दीनदयाळ उपाध्याय अर्थसहाय योजनेतून मदत

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

केंद्र शासनाने गरीबांना घर मिळावे या उद्देशाने प्रधानमंत्री आवास योजना कार्यान्वित केली आहे. मात्र, अनेक लाभार्थ्यांकडे जागाच उपलब्ध नसल्याने अशा लाभार्थ्यांची अडचण झाली आहे. यावर एक लाख रुपयांचे अनुदान शासन देणार आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत घरकूल बांधकामासाठी भूमिहीन लाभार्थ्यांना जागा खरेदीसाठी एक लाख रुपयांचे अनुदान देण्यात येत आहे. त्यासाठी लाभार्थ्यांनी पंचायत समिती अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानंत त्या लाभार्थ्यांना जागेसाठी एक लाख रुपये मिळणार आहे.




जिल्ह्यातील एक लाखांपेक्षा अधिक जणांना प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकूल मंजूर झाले आहेत. मात्र, जागेअभावी हजारो लाभार्थ्यांचे घरकुलाचे बांधकाम बंद आहे. अशा लाभार्थ्यांना पंडित दीनदयाळ उपाध्याय अर्थसहाय्य योजनेतून एक लाखापर्यंत अनुदान मिळणार आहे. मात्र, घरकूल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांनी घरकुलांचा दुसरा हप्ता न घेतलेल्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे घरकूल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांनी घरकुलाचा दुसरा हप्ता घेऊ नये, असे आवाहन ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाकडून करण्यात आले. **जिल्ह्यातून फक्त सात अर्ज :** मात्र, बऱ्याच लाभार्थ्यांना या योजनेची माहिती नसल्याने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाकडे फक्त सात अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यातील सहा लाभार्थ्यांना जागा घेण्यासाठी अनुदान देण्यात आले आहे. त्यामुळे घरकूल मंजूर झालेल्या भूमिहिन लाभार्थ्यांनी पंचायत समितीकडे तत्काळ अर्ज करण्याची गरज आहे.

### हजारो बेघरांना मिळणार घर

प्रधानमंत्री आवास योजनेतील हजारो घरकूल लाभार्थी घरकुलांसाठी पात्र असूनही केवळ जागे अभावी घरकुलाचा लाभ मिळण्यापासून वंचित राहत आहेत. अशा लाभार्थ्यांनी राज्य शासनाने पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेतून लाभघेतल्यास हजारो बेघरांना घर मिळणार आहे.

### जागेसाठी अनुदान मिळण्याची प्रक्रिया

घरकूल मंजूर झाल्यानंतर लाभार्थ्यांनी प्रारंभी पाचशे स्वेअर फूट जागा खरेदी करायची. त्यानंतर पंडित दिनदयाल उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेसाठी पंचायत समितीकडे प्रस्ताव पाठवावे. पंचायत समितीकडून त्या प्रस्तावाची पडताळणी करून जागेची किंमत रेडीरेकनर किंवा खरेदीसाठीनुसार जी कमी किंमत असेल ती ठरविण्यात येते. त्या किंमतीनुसार लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये पाच हजार ते एक लाखांपर्यंत अनुदान जमा करण्यात येते.

### या घरकुलांना मिळणार लाभ

केंद्र, राज्य शासनाने ग्रामीण भागातील सर्व बेघर कुटुंबांना घरे उपलब्ध करून देण्याची मोहीम हाती घेतली आहे. त्या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना, राज्य पुस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना अशा विविध घरकुल योजनेतून ग्रामीण भागात घरकूल मंजूर घर बांधकाम करण्यासाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

### योजनेला अल्प प्रतिसाद

जिल्ह्यात घरकूल बांधकाम करण्यासाठी दोन हजारपिक्षा जास्त लाभार्थ्यांना जागा नाहीत. त्या लाभार्थ्यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेसाठी प्रस्ताव करणे आवश्यक आहे. मात्र, जिल्ह्यातील बार्शी येथून पाच, माढा आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात प्रत्येक एक असे एकूण सातच प्रस्ताव आले आहेत. त्यामुळे पंडित दीनदयाल उपाध्याय घरकूल अर्थसहाय्य योजनेस अल्प प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत आहे.



पंडित दीनदयाल उपाध्याय घरकूल अर्थसहाय्य योजनेतून घरकूल लाभार्थ्यांना पाच हजारपासून एक लाखांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे. ज्या लाभार्थ्यांकडे जागा उपलब्ध नाही, अशा लाभार्थ्यांनी जागा घेऊन त्याचे प्रस्ताव पंचायत समितीकडे दाखल करावे. त्या प्रस्तावाची पडताळणी करुन अनुदान देण्यात येईल. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी घ्यावा.

**- संदिप कोहिणकर,**
अतिरिक्त सीईओ, जिल्हा परिषद, सोलापूर



## तिसऱ्या श्रावण सोमवारनिमित्त

# पालकमंत्री गोरेंनी घेतले सिद्धरामेश्वरांचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवार दि. ११ ऑगस्ट रोजी ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरात पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सिद्धरामेश्वरांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. मंदिर समितीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार केला.

यावेळी आमदार देवेंद्र कोठे, प्रभुराज मैंदर्गीकर, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर, विजया वड्डेपल्ली, माजी नगरसेविका रामेश्वरी बिर्रु, रणजिता चाकोते, अक्षय अंजिखाने, नागेश खरात, बजरंग कुलकर्णी, आनंद बिर्रु, अजय यादव,आनंद मुस्तारे, सिद्धराम खजुरगी, यशवंत पाथरूट, संदिप जाधव, सागर अतनुरे, पिनु करपे, अशोक कोडम, श्रवण साबळे, विश्वनाथ प्याटी, अंबादास सकीनाल, राम गड्डम उपस्थित होते.

# जिल्ह्यात लम्पीमुळे ५८ जनावरांचा मृत्यू

- लागण झालेली जनावरे २,०२७, बरी झाली १,५२६, बाधित ४४३



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

जिल्ह्यात जनावरांचा लम्पी त्वचारोगाचा फैलाव वाढत असून आतापर्यंत दोन हजार सत्तावीस जनावरांना या आजाराची लागण झाली आहे. जिल्हा पशूसंवर्धन विभागाकडून लसीकरण, उपचार व विलगीकरण यासह विविध उपाय राबविण्यात येत आहेत.

मात्र लम्पीवर नियंत्रण मिळविण्यात अपयश येत आहे. लम्पीवर नियंत्रण मिळविण्यासाठी येत्या काळात बाधित जनावरांची संख्या कमी करण्यासाठी पावले उचलण्यात येत आहेत. एकूण दोन हजार सत्तावीस जनावरांपैकी १५२६ जनावरे उपचारानंतर बरी झाली आहेत, तर ५८ जनावरांचा मृत्यू झाला आहे. सध्या ४४३ जनावरे या आजाराने बाधित असून पशूविभागाने उर्वरीत लसीकरण करण्याची गरज असल्याचे सांगण्यात येत आहे.

### तालुकानिहाय संख्या

अक्कलकोट-५, करमाळा-१०, माढा-२, माळशिरस - १३, मंगळवेढा-७, मोहोळ - १, पंढरपूर- ११, सांगोला-३, उत्तर सोलापूर - २, द.सोलापूर-४, एकूण-५८

### उर्वरीत जनावरांचे लसीकरण करा

पशूसंवर्धन विभागाकडून पावसाळ्यापूर्वी लसीकरण मोहीम सुरू करून लम्पीचे लस देण्यात आली होती. मात्र, लस उपलब्ध नसल्याने दक्षिणमधील अनेक जनावरांना लस मिळाले नाही. जनावरांच्या संख्याप्रमाणे लस तुटवडा पडल्याने अनेक जनावरांना लम्पीचे लसीकरण करण्यात आले नाही. त्यामुळे जनावरांचे लसीकरण केल्यास लम्पीवर नियंत्र मिळविण्यास मदत होईल.

**- ज्योतीताई कुलकर्णी, सरपंच, हत्तूर**

# सार्वजनिक मध्यवर्ती श्रीगणेशोत्सव मंडळाचा बुधवारी बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

सार्वजनिक मध्यवर्ती श्री गणेशोत्सव मंडळाचा बुधवारी बक्षीस वितरण समारंभ होणार असून यंदाच्यावर्षी उत्सव पदाधिकारी म्हणून काम करण्यासाठी इच्छुक असणाऱ्यांनी १६ ऑगस्टपर्यंत मंडळाकडे अर्ज द्यावेत अशी माहिती उत्सव अध्यक्ष विनायक महिंद्रकर यांनी दिली.

सोलापूर शहर सार्वजनिक मध्यवर्ती श्री गणेशोत्सव मंडळाची बैठक शिवानुभव मंगलकार्यालयात उत्सव अध्यक्ष विनायक महिंद्रकर यांच्या अध्यक्षतेखाली विश्वस्त पदाधिकारी कार्यकारणी सदस्य यांची आयोजित करण्यात आली होती.प्रारंभी श्री कामेश्वर गणपतीची आरती करण्यात आली. या बैठकीत ट्रस्टी सचिव संजय शिंदे यांनी मागील सभेचा वृत्तांत आणि जमा खर्च मंडला, त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली तसेच २०२५-२६ या वर्षाच्या उत्सवा करिता



निवड करण्यात येणाऱ्या पदाधिकारी साठी इच्छुकांनी आपले अर्ज शनिवार दि. १६ ऑगस्टपर्यंत सावरकर मैदान येथील वसंत पैलवान रसपान गृह येथे आणून द्यावेत. या करिता पंचकमिटीचे निवड अधिकार ट्रस्टी अध्यक्ष बसवराज येरटे यांना देण्यात आले. तसेच उत्सव अध्यक्ष विनायक महिंद्रकर यांनी २०२४-२५ या वर्षाच्या विविध स्पर्धांचे बक्षीस समारंभ बुधवार, १३ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाच वाजता श्री शिवानुभव मंगल कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे असे जाहीर केले.

या बैठकीत ट्रस्टी श्रीशैल बनशेट्टी, गौरव जक्कापुरे, विजय पुकाळे, बसवराज येरटे, हेमा चिंचोळकर, विजय बिराजदार, रविंद्र आमणे, अशोक कलशेट्टी आदिंनी मनोगत व्यक्त केले. या बैठकीत ट्रस्टी अंबादास गुत्तीकोंडा, कैलास मेंगाणे, अनिल गवळी, लता फुटाणे, विष्णू मुधोळकर, सोमनाथ मेंडके, मतीन बागवान, बाबा शेख, शिवानंद येरटे, गिरीश शहाणे, सिद्राम मजगे, अंजली मंगोडेकर, गणेश चिंचोळी, मल्लिनाथ पाटील, सुनिल शरणार्थी, संतोष खंडेराव, विरेश सक्करगी यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.तदनंतर आजोबा गणपतीचे दिवंगत ट्रस्टी अध्यक्ष चिदानंद वनारोटे, श्रीमती सुमनताई रोडगे व ज्ञात अज्ञात व्यक्तिंच्या निधनामुळे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

# दुचाकी चोरणाऱ्या भंगार विक्रेत्यास अटक

## • सदर बझार पोलिसांची कारवाई; चोरीच्या ११ दुचाकी जप्त


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

सदर बझार पोलिसांनी दुचाकी चोरणाऱ्या भंगार विक्रेत्यास अटक करून त्यांच्याकडून २ लाख ३१ हजार ४०० रुपये किंमतीच्या चोरीच्या ११ दुचाकी जप्त केल्या.

साहिल महेबूब शहापूरे (वय २२, रा. दक्षिण सदर बझार, अशोक नगर, मुर्गी नालाजवळ, सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या दुचाकी चोराचे नाव आहे. तर साहिल शहापूरे याने चोरलेल्या दुचाकी स्क्रॅप करण्यासाठी मदत करणारे त्याचे वडील महेबूब शहापूरे, दुचाकी तोडण्यासाठी मदत करणारा महेबूब उर्फ बाबू बागवान आणि गुडलक ट्रेडर्सचा मालक रहिम इरफान शेख (रा. सोलापूर) यांनादेखील या गुन्ह्यात आरोपी करण्यात आले आहे. साहिल शहापूरे याच्याकडून सहा सदर बझार पोलिस ठाण्यातील, दोन एमआयडीसीमधील तर फौजदार चावडी आणि जेलरोड पोलिस ठाण्यातील प्रत्येक एक दुचाकी चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे.

सदर बझार पोलिस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही दिवसापासून दुचाकी चोरीच्या घटना वाढलेल्या होत्या. त्यामुळे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांच्या मागे तगादा लावला होता. त्यामुळे पोलिस कर्मचारी हे दुचाकी चोरांचा माग काढत होते. त्यावेळी पोलिसांना हरिभाई देवकरण प्रशालेच्या मागील बाजूस एकजण एमएच १३ डीएफ ७३०४ क्रमांकाच्या दुचाकीवर संशयास्पदरीत्या फिरताना मिळून आला होता. त्यास ताब्यात घेऊन पोलिसांनी चौकशी केली असता त्याच्याकडील दुचाकी ही चोरीची असल्याचे निष्पन्न झाले होते. त्यामुळे पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर त्याने त्याचे नाव साहिल शहापूरे असे सांगून त्याने वेगवेगळ्या ठिकाणाहून ११ दुचाकी चोरल्याचे सांगितले. तसेच ८ दुचाकी या चालू स्थितीत तर ३ दुचाकी तोडून त्याचे पार्ट वेगवेगळे केल्याचे सांगितले. त्यामुळे पोलिसांना साहिल यास दुचाकी स्क्रॅप करण्यासाठी मदत करणारे त्याचे वडील महेबूब शहापूरे, महेबूब बागवाना आणि स्क्रॅप दुचाकी विकत घेणारा रहिम शेख यांनादेखील या गुन्ह्यात आरोपी करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहायक आयुक्त सुधीर खिरडकर, पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर, भालचंद्र ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक सागर काटे, सहायक फौजदार औदुंबर आटोळे, हवालदार शहाजहान मुलाणी, राजेश चव्हाण, संतोष पापडे, सागर सरतापे, एजाज बागलकोटे, सागर गुंड, सोमनाथ सुरवसे, हणमंत पुजारी, विशाल बोराडे, अनमोल लट्टे, उमेश चव्हाण, राम भिंगारे, परशुराम म्हेत्र, अर्जुन गायकवाड यांनी केल.



### ७० हजारांच्या कर्जासाठी सुरु केला दुचाकीचोरीचा धंदा

सदर बझार पोलिसांनी अटक केलेल्या साहिल शहापूरे या भंगार विक्रेत्यास ७० हजार रुपयांचे कर्ज झाले होते. ते कर्ज फेडण्यासाठी त्याने दुचाकी चोरीचा धंदा सुरु केल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. साहिल हा दुचाकी चोरून त्याच्याच दुकानात त्या तोडून स्क्रॅप करीत होता. ही सर्व बाब त्याचे वडील महेबूब यांना माहिती होती असे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे.

# जिल्ह्यात मेफॉड्रोन ड्रग्जचा पुरवठा करणारी टोळी जेरबंद

- १८ ग्रॅम मेफेड्रोन एमडीसह
- ८ जणांना अटक स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्ह्यात मेफेड्रोन एमडी ड्रग्जचा पुरवठा करणारी टोळी सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केली असून या टोळीकडून ७२ हजार रुपये किंमतीचे १८ ग्रॅम मेफेड्रोन एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. या कारवाईत पोलिसांनी ११ लाख ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मोहसीन इस्माईल शेख (वय ३३, कुमारस्वामी नगर मशीदजवळ, शेळगी, सोलापूर), याकूब अली बागवान (वय ५१, रा. मम्मत पूरा, जि. कलबुर्गी, कर्नाटक), मोहम्मद मतीन हाजी शेख (वय ४९, रा. दर्गा रोड घट्टेवाडी, मोमनपूरा, कलबुर्गी, कर्नाटक), बाबा फरीद अब्दुल सलीम बागवान (वय ३७, रा. बटली अलावा, मोमीनपुरा, कलबुर्गी, कर्नाटक), मुजफ्फर अब्दुल जब्बार शेख (वय ३१, रा. गणेश पेठ, हिंगुलांबिका मंदीर, सोलापूर), इरफान इस्माईल शेख (वय २२, रा. कुमारस्वामी नगर मशिदजवळ, शेळगी, सोलापूर), मुबारक राजअहमद शेख (वय ३२, रा. आदर्श नगर, शेळगी, सोलापूर), अस्लम महम्मंद युसूफ बागवान (वय ४५, रा. ईडब्ल्युएस प्लॉट नं. ३, विडी घरकुल, हैद्राबाद रोड, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. सोलापूर जिल्ह्यात मेफेड्रोन एमडी ड्रग्जचा पुरावठा होत असल्याबाबतची माहिती ग्रामीण पोलिसांना मिळाली होती. हा पुरवठा कशा पध्दतीने व कोणाकडून होत आहे याबाबत स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून शोध घेतला जात होता.

६ ऑगस्ट रोजी पोलिसांना पुण्याहून सोलापूरकडे येत असलेल्य केए ०५ एमएक्स २९४२ या कारमधून चार व्यक्ती मेफेड्रोन एमडी ड्रग्ज घेऊन येत असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी पुणे महामार्गावरील पाकणी पाटीजवळ संशयित कारला थांबण्याचा इशारा केला



असता कारचालकाने न थांबता त्याने कार तशीच वेगात दामटली. त्यामुळे पोलिसांनी कारचा पाठलाग करून कार सिमको ब्रिजवर थांबवली. या कारमधील मोहसीन शेख, याकूब बागवान, मोहम्मद शेख, बाबा बागवान या चौघांना ताब्यात घेऊन कारची तपासणी केली असता कारमध्ये १८ ग्रॅम मेफेड्रोन एमडी ड्रग्ज मिळून आले. हे मेफेड्रोन एमडी ड्रग्ज जप्त करून याबाबत सोलापूर तालुका पोलिस ठाणत गुन्हा दाखल करण्यात आला असून चौघांना अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या चौघांकडे हे ड्रग्ज कोणाला देण्यात येत असल्याबाबत चौकशी केली असता त्यांनी सोलापूर शहरातील मुजफ्फर शेख, इरफान शेख, मुबारक शेख, अस्लम बागवान यांना देऊन त्यांच्याकडून शहर व जिल्ह्यातील लोकांना मेफेड्रोन एमडी ड्रग्ज विकण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे पोलिसांनी तात्काळ हालचाल करून या चौघांनोदेखील ताब्यात घेऊन अटक केली. अशाप्रकारे या गुन्ह्यात आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्यातील सर्व आरोपींना न्यायालयाने सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती.

ही कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर अधिक्षक प्रितम यावलकर, पोलिस निरीक्षक संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलिस ठाण्याकडील पोलिस निरीक्षक दिपक भिंताडे, सहायक पोलिस निरीक्षक विशाल वायकर, भिमगोंडा पाटील, पोलिस उपनिरीक्षक सुरज निंबाळकर, श्रीकांत गायकवाड यांच्या पथकाने केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# भक्तांचे रक्षण करण्यासाठी भगवंताचा अवतार : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**

श्रीमद्भागवत हा चित्तशुद्धीचा अमोघ उपाय असून त्यामध्ये भगवंताच्या विविध अवतारांचे विस्तृत विवेचन आलेले आहे. भक्तांचे रक्षण भगवंत कसे करतात, हे सांगताना श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी प्रवचनसत्राच्या सतराव्या दिवशी अर्जुन आणि अश्वत्थामाच्या युद्ध प्रसंगाचा दाखला देत, अर्जुनाच्या भगवंतावरील अखंड भक्तीचे अत्यंत भावपूर्ण निरुपण केले. महर्षी व्यासांनी सांगितलेले श्रीमद्भागवत शुकाचार्यांनी राजा परीक्षिताला कथन केले. परीक्षिताला ही कथा ऐकण्याची इच्छा होती, परंतु त्यापूर्वी तो परीक्षित कोण आहे,



**श्रावणमास प्रवचनमाला**
**भाग - १७**

हे जाणून घेणे आवश्यक ठरते आणि परीक्षिताचे चरित्र समजून घेण्याआधी पांडवांचे चरित्र ऐकणे गरजेचे आहे. कारण पांडवांच्या जीवनातूनच भगवान श्रीकृष्णाचे चरित्र उलगडते आणि श्रीकृष्णाचे चरित्र समजणे म्हणजेच श्रीमद्भागवताचा सार कळणे होय, असे म हाराज सांगतात. मानवी जीवनात 'दया' हा गुण किती अनमोल आहे, हे सांगताना महाराजांनी द्रौपदीचे उदाहरण दिले. अश्वत्थाम्याने द्रौपदीचे पाचही पुत्र रात्रीच्या वेळी निर्दयपणे मारले. तिच्या अंतःकरणात असह्य वेदना उसळल्या, डोळ्यांतून अश्रू थांबेना. तरीसुद्धा जेव्हा अर्जुनाने अश्वत्थाम्याला पकडून आणले आणि त्याचा वध करण्यास सिद्ध झाला, तेव्हा द्रौपदीचे हृदय करुणेने ओथंबून आले. ती अर्जुनाला म्हणाली- 'तो आपले गुरु द्रोणाचार्यांचा पुत्र आहे, त्याला गुरुपुत्र म्हणून सोड. मी मुलगा गमावण्याचे दुःख भोगत आहे; तेच दुःख त्याची आई गौतमीवर ओढवू नकोस. तिचा शेवटचा आधार हाच आहे.' अशा शब्दांत तिने आपली धर्मनिष्ठा, न्यायप्रियता, करुणा, समदृष्टी आणि कपटरहित स्वभाव प्रकट केला. याप्रसंगी महाराजांनी 'आई' या शब्दाचा भावार्थ अत्यंत मार्मिकरीत्या उलगडला. 'आई' ही फक्त दोन अक्षरे नसून, तो प्रेमाचा अथांग सागर आहे, असे सांगत त्यांनी समाजातील आईच्या स्थानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर महाराजांनी कुंती मातेकडील एक विलक्षण प्रसंग सांगितला- युद्धानंतर ती भगवान श्रीकृष्णाकडे संकटाचे दान मागते. कारण संकटकाळातच आपण भगवंताचे स्मरण अधिक करतो आणि संकटे आपल्याला सतत भगवंताच्या नावाशी जोडून ठेवतात. त्यामुळेच महाराजांनी स्पष्ट सांगितले- 'संकटे येणे हीच मानवी जीवनाची खरी शोभा आहे.' शेवटी, भीष्माचार्य आणि श्रीकृष्ण यांच्या संवादातून कर्माचा सिद्धांत भाविकांच्या मनावर ठसविला. धर्मराज व भीष्माचार्य यांच्या संवादातून 'विष्णुसहस्रनाम' जपाचे महत्त्व सांगून, महाराजांनी भगवन्नामस्मरणाची अमूल्यताही पटवून दिली आणि आता उत्तरेच्या गर्भातील बालकाचे भगवान श्रीकृष्णाकडून झालेले अद्भुत रक्षण, हे चरित्र पुढील सत्रात ऐकण्यास मिळणार असल्याची आनंदवार्ता देत त्यांनी प्रवचनाचा समारोप केला.

# शिवसेना उबाठाकडून जनआक्रोश आंदोलन





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने जिल्हा परिषद पूनम गेट जवळ जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्रातील भ्रष्ट मंत्र्यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले.

यावेळी उपनेते शरद कोळी, अस्मिता गायकवाड , जिल्हाप्रमुख अजय दासरी, संभाजी शिंदे, गणेश वानकर, धनंजय डिकोळे, संतोष पाटील, उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आंदोलन करण्यात आले.

जय भवानी जय शिवाजी बाळासाहेब ठाकरे उध्दव ठाकरे झिंदाबादच्या घोषणा देऊन सदरचा भाग दणाणून गेला.भ्रष्ट मंत्र्यांच्या धीक्कार असो भ्रष्ट मंत्र्यांना त्वरीत राजीनामा दिलाच पाहिजे अशा घोषणा देऊन निषेध व्यक्त केला. रम्मी खेळणाऱ्या मंत्री कोकाटे यांचा धिक्कार असो, आपल्या आईच्या नावाने डान्स बार चालविणाऱ्या योगेश कदमांचा धिक्कार असो, समाजकल्याण मंत्री शिरसाटाचा धिक्कार असो गुंडागर्दी करणाऱ्यांना त्वरीत अटक करावी. त्या मंत्र्यांचा धिक्कार करून आंदोलनमध्ये मोठ्या घोषणा देण्यात आल्या.

यावेळी महिला आघाडीच्या सिमा पाटील, बसवंती, उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर, प्रताप चव्हाण, रवि कांबळे, विक्रम काकडे, संजय पौळ, नजीर शेख, अमीता जगदाळे, मंगल मोरे , नाना मोरे, दत्ता माने, संतोष केंगनाळकर, दत्ता वानकर, सुरेश जगताप, दत्तात्रय खलाटे, लहु गायकवाड, संताजी भोळे, जगदीश कलकेरी, सुहास शिंदे, अनिल जाधव, चंद्रकांत मानवी, तुषार खंदारे, अमीत भोसले, राम वाकसे, कामगार सेनेचे कार्याध्यक्ष अजय खांडेकर, रवि म्हेत्रे उपस्थित होते.



# रस्त्यावर अभ्यास करीत तडवळेच्या विद्यार्थ्यांचे अनोखे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

बार्शी तालुक्यातील तडवळे ते यावली रस्त्यावरील लोखंडे वस्तीच्या विद्यार्थ्यांना शाळेसाठी रस्ता नसल्याने जिल्हा परीषद पूनम गेटसमोरील रस्त्यावर अभ्यास करीत अनोखे आंदोलन केले. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

बार्शी तालुक्यातील जिल्हा मार्ग क्रमांक २५ वरील तडवळे ते यावली रस्त्यावर २० ते २५ वस्त्यांचा लोखंडे वस्ती आहे. येथील विद्यार्थी व शेतकर्यांना रहदारीसाठी रस्ता नसल्याने पावसाळ्यात रहदारीसाठी त्रास होत आहे. रस्ता नसल्याने व चिखल असल्याने विद्यार्थ्यांना चार चार दिवस शाळांना सुट्टी घ्यावी लागत आहे. या रस्त्याबाबत ग्रामपंचायतसह विविध विभागाकडे पाठपुरावा केला. मात्र विद्यार्थी व शेतकऱ्यांना रस्त्यावर मुरूम टाकून देण्यात आले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पालकांसह जिल्हा परीषद पूनम गेटसमोरील रस्त्यावर अभ्यास करीत उपोषण आंदोलन केला.



# आस्था सामाजिक संस्थेतर्फे ६८ लिंग पदयात्रेतील भक्तांना फराळ वाटप

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

श्रावणमासानिमित्त ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगाचे दर्शन घेण्यासाठी रविवारी पदयात्रा आयोजन ६८ लिंग भक्त मंडळ, वीरशैव व्हिजन यांच्या वतीने करण्यात आले होते. आस्था सामाजिक संस्थेतर्फे भक्तांना शाबुदाना खिचडी, केळी, बटाटा वेफर्स, शाबुवडा, काजू चिक्की, शाबुचिवडा, चहाचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, सचिव शिवानंद सावळगी संचालक देविदास चेळेकर प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे वेदांत तालिकोटी सिद्धू बेऊर, सागर शिरशाड, बाहुबली शटगार, सचिन आळंद यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथर्व शिंदे, वेदांत सोमशेट्टी, सुरज छंचुरे, उदय छंचुरे, पिंटू कस्तुरे धानेश सावळगी यांनी परिश्रम घेतले.

# जनमंगल फाउंडेशनतर्फे शुक्रवारी आरोग्य शिबिरासह विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

जनमंगल महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त जनमंगल फाउंडेशनच्या वतीने शुक्रवार दि. १५ ऑगस्ट रोजी आरोग्य शिबिर, गुणवंत विद्यार्थी पुरस्कार वितरण सोहळा यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष कानिफनाथ थोरात यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिवानुभाव मंगल कार्यालय पूर्व मंगळवार पेठ येथे शुक्रवारी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. जन मंगल फाउंडेशन, कमल मेडिकेअर कॅन्सर सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल आणि यशोधरा सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर होणार आहे. याच ठिकाणी सायंकाळी ५ वाजता पाल्यांच्या गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. महिला बचत गट कर्ज वितरण, नियमित कर्ज वेळेत फेडणाऱ्या उत्कृष्ट कर्जदारांचा सन्मान, दुचाकी वाहन कर्ज वितरण करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे हे राहणार आहेत. यावेळी जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, उपनिबंधक शहर डॉ. प्रगती बागल, वस्त्र उद्योगचे प्रादेशिक उपायुक्त उज्वला पळसकर, जिल्हा विशेष लेखा परीक्षक विष्णू डोके, विशेष लेखा परीक्षक वर्ग दोन संतोष मानूरकर, सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे, महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे, पत्रकार नंदकुमार येच्चे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या निमित्ताने सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले असून महाप्रसाद देण्यात येणार आहे. यावेळी नयना पलंगे, भालचंद्र साखरे, विशाल मोरे, संतोष क्षीरसागर उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवारी संगीतमय कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिनानिमित्ताने संगीत प्रेमींसाठी मोक्ष माइंड सोल्यशन व यशोदा म्युझियम यांच्या संयुक्त विद्यमाने सिंग टुगेदर म्युझिकल जर्नी हा संगीतमय कराओके कार्यक्रम शुक्रवार दि. १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता संभाजीराव शिंदे प्रशाला, जुना विडी घरकुल, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अमोल लहांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रम सर्वांसाठी मोफत आहे. या ग्रुपच्या गायकांकडून एकापेक्षा एक सरस अशा गीतांचे सादरीकरण होणार आहे. या पत्रकार परिषदेस मल्लिकार्जुन कंबद, श्रीनिवास ताटीपामूल, घनश्याम जितूरी उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : मंगळवार | दिनविशेष - अंगारक चतुर्थी |
| दि. १२ ऑगस्ट २०२५ | (चंद्रोदय ०९.०५ ) |
| विक्रम संवत् २०८२ | मंगळागौरी पूजन. |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| तिथी कृ. तृतीया (०८.४०) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पूर्वाभाद्रपदा (११.५०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सुकर्मा (१८.५२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१९.३८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ** : आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन** : आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क** : मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह** : कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ** : चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक** : सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु** : शुभ रंगः जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वतःच्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर** : नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ** : सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन** : आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# रोटरीतर्फे १०० महिलांना मिळणार उद्योग मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**गुळवंची, दि. ११ ऑगस्ट-**


रक्षाबंधन या कार्यक्रमाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटी सोलापूर यांच्यावतीने गावातील बचतगटातील महिलांची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये बहुसंख्येने महिला उपस्थित होत्या.

या क्लबचे महिला सक्षमीकरणच्या प्रमुख डॉ.शिवगंगा मैंदर्गी यांनी विविध बचत गटामार्फत महिलांना वेगवेगळ्या उद्योग सुरू करू शकतात त्याची सखोल माहिती डॉ. शिवगंगा मैंदगी यांनी दिली. आपण तयार केलेल्या वेगवेगळ्या साहित्याचा मार्केटिंग व ब्रॅण्डिंगच्या अत्याधुनिक पद्धतीने बाजारात याचा प्रचार व प्रसार करू शकतात. समान कौशल्य असलेल्या महिलांचा गट स्थापन करून त्या महिलांना त्या संबंधित उद्योग स्थापन करणे व त्या उद्योगाच्या विकासासाठी क्लबद्वारे लागणारी सर्व मदत करण्याचे आश्वासन क्लबचे अध्यक्ष डॉ. अकबर नदाफ, रोटे अनिल चंडक व इतर सदस्यांनी दिले. शिलाई उद्योग, पापड उद्योग, कडक भाकरी उद्योग, चटणी उद्योग, मेहंदी कोन उद्योग अशा अनेक उद्योगा विषयी माहिती देण्यात आली. याप्रसंगी क्लबचे सचिव बसवराज बिराजदार, योगीनाथ कुडते, महेश साळुंके उपस्थित होते. या बैठकीसाठी गुळवंची गावातील रहिवासी श्रद्धा संतोष कवडे यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन गुळवंची गावाचे सुहास भोसले यांनी केले.

# पांगरी परिसरात अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**पांगरी, दि. ११ ऑगस्ट-**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीच्या निमित्ताने जोषाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था चिंचोली तालुका बार्शी जिल्हा सोलापूर यांच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी पांगरीचे सरपंच मनिषा धस व समाजसेवक मेजर बाळासाहेब मोरे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. नागनाथ ग्रुप पांगरी, ग्रामपंचायत कार्यालय पांगरी, लहुजी वस्ताद चौक पांगरी, लहुजी प्रतिष्ठान चिंचोली इत्यादी ठिकाणी जोषाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था चिंचोली या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनिल खुणे यांनी शाहीर आण्णाभाऊ साठे यांचा जीवनपट उलगडला.कार्यक्रमासाठी स्थानिक लेव्हलचे ग्राम पंचायतचे सदस्य पोलीस पाटील तंटामुक्त अध्यक्ष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंती उत्सव मंडळ आणि आलेल्या पाहुण्यांचे शाल श्रीफळ फेटे देऊन सत्कार करण्यात आले. यावेळेस पांगरी पोलीस स्टेशनचे सपोनी हेमंत काटकर यांनी धावत्या भेटी दिल्या व प्रतिमांचे पूजन केले.



# रुद्रशक्ती गुरुकुल मर्दानी प्रशिक्षण केंद्रात रक्षाबंधन सण उत्साहात

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

रुद्रशक्ती गुरुकुल मर्दानी प्रशिक्षण केंद्रात खेळाडूंनी बहीण भावाच्या अतूट नात्याची व प्रेमाची जपणूक करणारा सण म्हणजे रक्षाबंधन साजरा केला. यावेळी मुलींनी आपल्या हाताने लोकर, रेशमी धागे, मनी अशा गृहपयोगी वस्तूंचा वापर करून बनवलेल्या राख्या गुरुकुलामधील खेळाडू भावांना लाडू व पेढेने तोंड गोड करुन मनगटावर राखी बांधल्या. तेव्हा भावांनी ही आपल्या बहिणींसाठी चॉकलेट्स, पेन, अशा वेगवेगळ्या भेट वस्तू देऊन भावाचे कर्तव्य बजावण्याची परंपरा जोपासली. हा उपक्रम राबविण्यासाठी प्रमुख मार्गदर्शक योगीनाथ फुलारी रुद्रशक्ती गुरुकुल मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन, यांनी परिश्रम घेतले.

# मल्लिकार्जुन कमटम यांना तेलुगू युनिव्हर्सिटीचा पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

सोलापुरातील तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम या संस्थेच्या उल्लेखनीय कार्याबद्दल अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम यांना हैदराबाद येथील सुरुवात प्रताप रेड्डी तेलुगु युनिव्हर्सिटी मंडली वेंकट कृष्णाराव इंटरनॅशनल तेलुगु सेंटर या संस्थेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती ग्रंथालयमचे सचिव तिप्पण्णा गणेरी आणि शोभा बोल्ली यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पुरस्कार सोहळ्यासाठी तेलंगणाचे सुरवरम प्रताप रेड्डी तेलगू विद्यापीठाचे कुलपती तथा राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे उपाध्यक्ष आचार्य वेलूदंड नित्यानंद राव हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त आयएएस अधिकारी डॉ. के. व्ही. रामनाचारी, आंध्रप्रदेशचे आ. बुद्धप्रसाद आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. २५ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पत्रकार परिषदेत पत्रकार परिषदेस मल्लिकार्जुन कमटम, बालराज बोल्ली, श्रीनिवास यनगंदुल, रामुलु पोतू आदी उपस्थित होते.



# अवयवदान दिनानिमित्त १३ ऑगस्टला महारॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

अवयवदान दिनानिमित्त सोलापुरात बुधवार दिनांक १३ ऑगस्ट रोजी सोलापुरात महारॅलीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर यांनी पत्रकार परिषदेत दिली यावर्षीचे घोषवाक्य अंगदान जीवनदान संजीवनी अभियान असे आहे. त्या अनुषंगाने दि. १३ ऑगस्ट रोजी जागतिक अवयवदान दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर, अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, कुंभारी. अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापूर, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ऑगस्ट रोजी शहरातील महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या महारॅलीचे आयोजन करण्यात आलेले आहे. सकाळी ८ वाजता पोलीस आयुक्त एम. राजकुमार, सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु लक्ष्मीकांत दामा व इतर मान्यवरांच्या असते महारॅलीचा प्रारंभ करण्यात येणार आहे.

या रॅलीमध्ये वैद्यकीय महाविद्यालय, आयुर्वेदीक महाविद्यालय, होमिओपॅथीक महाविद्यालय, डेंटल कॉलेज, नर्सिंग महाविद्यालय, तसेच शहरातील इतर महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थीनी, तसेच ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कॅडेटस् सहभागी होणार आहेत. या रॅलीमध्ये अवयवदानाबाबत पथनाट्य, पोस्टर्स यांचे प्रदर्शन करण्यात येणार आहे.

रॅलीची सुरुवात डॉ. वैशंपायन स्मृति शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथून सुरुवात होणार असून पोटफाडी चौक, सिद्धार्थ हॉसिंग सोसायटी, कुंभार गल्ली, जगदंबा चौक, लष्कर, सात रस्ता, संगमेश्वर कॉलेज, गरुड बंगला, रोटरी बगीचामार्गे अश्विनी सहकारी रुग्णालय येथे समारोप होणार आहे. याशिवाय शहर व ग्रामीण पोलीसांसाठी अवयवदानाबाबत कार्यशाळा तसेच स्लोगन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, भित्तीपत्रक स्पर्धा इ. कार्यक्रम आयोजित केले आहेत. या उपक्रमात नागरिक, विद्यार्थी-विद्यार्थीनी, शासकीय, निमशासकीय संस्था, सामाजिक संस्था यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, डॉ. सुहास कुलकर्णी (अधिष्ठाता, अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय), डॉ. प्रशांत औरंगाबादकर (वैद्यकीय अधीक्षक, अश्विनी सहकारी रुगणालय), राजेंद्र वडजे ( संचालक एन.एस.एस. विभाग, सोलापूर विद्यापीठ), डॉ. एन. बी. तेली (फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा), डॉ. प्रवीण जाधव (ऑर्गन डोनेशन कोऑर्डीनेटर) यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस संयोजक अश्विनी सहकारी रुग्णालयाचे संचालक अशोक लांबतुरे, डॉ. सुहास कुलकर्णी, डॉ. प्रशांत औरंगाबादकर, डॉ. राजेंद्र वडजे, डॉ. एन.बी. तेली, डॉ. प्रवीण जाधव, डॉ. श्रीकांत येळेगांवकर, डॉ. अभिजित जगताप आदी उपस्थित होते.

**अवयवदानाचे प्रमाण १० लाख लोकांमागे ०.०८**

संपूर्ण भारतात अवयवदानाचे महत्त्व व त्याची चळवळ उभी राहणे ही काळाची गरज आहे. भारतासारख्या अफाट लोकसंख्येच्या देशात अवयवदानाचे प्रमाण हे इतर देशांच्या तुलनेत सर्वात कमी आहे. देशात अवयवदानाचे प्रमाण १० लाख लोकांमागे ०.०८ एवढेच आहे. इंग्लंडमध्ये हे प्रमाण १४.८ आहे. अमेरिकेत २६.३ इतके आहे. स्पेनमध्ये जगात सर्वाधिक म्हणजे ३४.२ इतके आहे. हृदय प्रत्यारोपणाची गरज असलेल्या रुग्णांची संख्या भारतात ५०,००० असून प्रत्यक्ष हृदय प्रत्यारोपणाचे प्रमाण फक्त १,५०० आहे. ३०,००० यकृत प्रत्यारोपणाची गरज असताना १,५०० जणांना यकृत प्रत्यारोपण केले जाते. २,००,००० मूत्रपिंड प्रत्यारोपणाची गरज असताना प्रत्यक्ष प्रत्यारोपण ६,००० इतके आहे. ३०,००,००० डोळे प्रत्यारोपणाची गरज असताना प्रत्यक्ष प्रत्यारोपण १,५०,००० इतकी आहे.

# 'विद्यानिकेतन'मध्ये अण्णाभाऊ साठे जयंती

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

विद्यानिकेतन हायस्कूलमध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापक गोपीनाथ नवले, पर्यवेक्षक शंकरगिरी, शिक्षक विद्याधर रंगदाळ, लिपीक सुधाकर महिंद्रकर यांच्या हस्ते लोकमान्य टिळक, अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी आंतरवर्गीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. व यामध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्यात आली. स्पर्धेसाठी संतोष बनसोडे व रुपादेवी राजगे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन सहशिक्षिका शुभांगी बुलबुले यांनी केले तर आभार शंकर गिरी यांनी मानले.

## महत्वाचे...



### पोलीस चालक पदावर निवड झाल्याबद्दल प्रेमराज बागल या युवकाचा सत्कार

**पंढरपूर, दि. ११ ऑगस्ट-**

गादेगाव येथील प्रेमराज दिलीप बागल यांची नुकतीच महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस चालक पदावर यशस्वी निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पहार घालून सत्कार करून कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्रेमराज बागल यांचे वडील दिलीप बागल यांचाही सन्मान करण्यात आला. याप्रसंगी प्रेमराज बागल यांनी यशस्वी निवडीसाठी घेतलेल्या परिश्रमांची माहिती उपस्थितांसमोर मांडली. त्यांचे हे यश इतर तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे, असे मत नागेश फाटे यांनी व्यक्त केले. यावेळी उद्योगपती हरिभाऊ काळे, डॉ. रमेश फाटे, सौरभ काळे, संग्राम कापसे, ज्ञानेश्वर पवार उपस्थित होते.

### पिलीव येथे दोन सैनिकाच्या सेवानिवृत्तीनिमीत्त सन्मान

**पिलीव, दि. ११ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव ( झिंजेवस्ती) येथील सैनिक संतोष देशमुख व अमोल काळे हे दोघे देशसेवेत सैनिक म्हणून आपली सेवा बजावुन नुकतेच ते दोघेही सेवानिवृत्त झाले याबद्दल पिलीव परीसरातील वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर, त्यांचे सहकारी यांनी त्यांचा आगळावेगळा सन्मान करुन खऱ्या अर्थाने आपले



देशाप्रती असणारी देशभक्ती बजावली सुरुवातीला ओपन जिपमधुन त्या दोघांची पिलीव बाजारपेठेतुन मिरवणूक काढण्यात आली. नंतर हॉटेल आरंभ याठिकाणी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्या दोघांचा सन्मान केला. यावेळी विठ्ठल मदने सर, जे के रजपुत गुरुजी तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणारे सुनिल देशमुख सर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास पिलीवचे माजी लोकनियुक्त सरपंच नितीन मोहीते, माजी सरपंच अमोल मदने- पाटील, फळवणीचे माजी सरपंच सचिन पाटील, दोघांचेही आई वडील ,मित्र परिवार तसेच पत्रकार दामोदर लोखंडे, संजय पाटील, प्रमोद भैस, सुजित सातपुते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, दोघांचेही मित्र परिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संतोष देशमुख व अमोल काळे यांनीही आपले देश सेवेत असतानाचे अनुभव सांगीतले. सूत्रसंचालन संतोष लोखंडे यांनी केले तर आभार अतुल आर्वे यांनी मानले.



### अखिल भारतीय क्षत्रीय महासभेच्या जिल्हाध्यक्षपदी रणजितसिंह जामदार

**पिलीव, दि. ११ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील रणधीरसिह जामदार यांची अखिल भारतीय क्षत्रीय महासभेच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी तर माळशिरस तालुका अध्यक्षपदी प्रमोद भैस यांची नुकतीच सर्वानुमते निवडी करणयात आल्या त्यांना निवडीचे पत्र मेवाड उदयपूर राजस्थानच्या महाराणी साहीबा निवृती कुमारी यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी प्रदेशाध्यक्ष ठाकुर राजेंद्रसिंह राजपूत, पश्चिम महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बांदलसिह ठाकुर तसेच प्रदेश उपाध्यक्षा छाया रजपूत, पिलीव शहरच्या राष्ट्रवादी महीला अध्यक्ष पुनम भैस उपस्थित होते.



### हजरत शेख नुरद्दीन बाबा ऊर्स निमित्त आज गरजूंना धान्य वाटप

**अक्कलकोट, दि. ११ ऑगस्ट-**

हजरत शेख नुरद्दीन बाबा ऊर्स निमित्त एन.एस.सोशल ग्रुपच्या वतीने गरीब गरजू महिलांना संसारोपयोगी धान्य वाटपाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती एन.एस. सोशल ग्रुपचे अध्यक्ष नुरदिन शेख, उपाध्यक्ष मझहर नीटोरे यांनी दिले. सदर कार्यक्रम १२ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम चौक खासबाग गल्ली येथे आयोजित करण्यात आला आहे. यावेळी गरीब गरजू महिलांना पाच किलो गहू व पाच किलो तांदूळ वाटप करण्यात येणार आहे. कार्यक्रमास आमदार सचिन कल्याणशेट्टी, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, माजी उपनगराध्यक्ष महेश हिंडोळे, माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर, नावेद डांगे, समाजसेवक तम्मा शेळके, महबूब मुल्ला मोट्याळ, अविनाश मडीखांबे, शिवराज स्वामी, नितीन महाराज रईस टिनवाला, अतिक बागवान , ईरू गवंडी, सोलापूर येथील बी. एस. फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष बाबा सालार ,एबीएस ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष अब्दुल शेख, आर वन ग्रुप संस्थापक अध्यक्ष रियाज हुंडेकरी, नन्नू कोरबू आदी मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. यावेळी ग्रुपचे पदाधिकारी शब्बीर शेख महबूब पालंडे, अरबाज शेख, समाजसेवक तम्मा मामा शेळके, सद्दाम शेख, नुरद्दीन जिगरानी, रमजान शेख , फिरोज शेख, बुडन पटेल, सोहेल नीटोरे, यासीन शेख, जुबेर कमलीवाले, अजहर हिप्परगी, आजम सुतार, एजाज सुतार, शब्बीर बंदेनवाज, भीमाप्पा आयगोळे, अबू शेख, इब्राहिम हिप्परगी, नुरद्दीन खलिफा, मेहबूब मुल्ला मोटयाळ आदी उपस्थित होते.

# ...म्हणूनच मला पक्ष सोडावा लागला

## संजय क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेत केले स्पष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ११ ऑगस्ट-**

भाजपचा जिल्हाध्यक्ष व पालकमंत्री विखे पाटील यांचा प्रतिनिधी म्हणून सचिन कल्याणशेट्टी यांनी जिल्ह्यात निर्णय प्रक्रिया करत असताना भाजप कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडून अनगरकरांना मदतीची भूमिका बजावली होती. आणि या कारणानेच मलाही पक्ष सोडावा लागला होता. याचा परिणाम लोकसभा निवडणुकीत झाला असे स्पष्टीकरण राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते आणि पूर्वाश्रमीचे भाजपचे विधानसभेचे उमेदवार संजय क्षीरसागर यांनी दिले आहे.

सोवळेश्वर येथील कार्यक्रमात आमदार कल्याणशेट्टी यांनी माजी आमदार राजन पाटील यांची पाठराखण करणारे केलेल्या वक्तव्याचा समाचार श्री. क्षिरसागर यांनी या पत्रकार परिषदेत घेतला. ते म्हणाले, अनगरकर परिवाराला मदत म्हणजे तालुक्याच्या विकासाला मदत असे म्हणणे म्हणजे तालुक्याची दिशाभूल आहे. राज्यात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार आल्यानंतर अजितदादा महायुतीत नसताना सुद्धा पक्षश्रेष्ठीचा आदेश घेऊन कल्याणशेट्टी जसे मोहोळ तालुक्यात भाजप संपवण्यासाठी अवतरले तसेच पक्ष सोडण्यापूर्वी



मी ही पक्षश्रेष्ठींना भाजपचा खासदार मोहोळ तालुक्यातूनच पडणार म्हणून ऑन रेकॉर्ड सांगितले होते. मोहोळ तालुक्यातील जनतेच्या आशीर्वादाने केवळ मोहोळ तालुक्यातल्या लीडमुळेच भाजपच्या खासदाराला पराभव पत्करावा लागला.

याला सर्वस्वी आमदार सचिन कल्याणशेट्टी हेच जबाबदार आहेत असा गंभीर आरोप श्री. क्षीरसागर यांनी यावेळी केला. यापुढच्या काळात ही अनगरकरांना मदत करण्याची कल्याणशेट्टीची किंवा भाजपची भूमिका म्हणजे शेवटी पालथ्या घड्यावर पाणी असेच आहे. कल्याणशेट्टी यांनी मोहोळ तालुक्याची वकिली चालू केल्यापासून अनगरकर यांचा पक्ष घटक पक्ष नसतानाही त्यांच्या सोईचे निर्णय घेतले होते. लोकसभा निवडणुकीच्या अगोदर सोलापूर येथे झालेल्या महायुतीच्या बैठकीत एक तरी मताचा लीड देतो असे तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटलांना ठणकावून सांगणाऱ्या अनगरकराना तालुक्यातील जनतेने ६४ हजार मतांनी मागे टाकले. मग त्यावेळी दिलेल्या शब्दाचे काय झाले हे त्यांचे वकील कल्याणशेट्टी यांनी सांगावे. अक्कलकोट तालुक्यात तानवडे परिवाराशी बेइमानी करून आयत्या बिळात नागोबा झालेल्या कल्याणशेट्टी यांनी मोहोळ तालुक्याची दिशाभूल करू नये. असा इशाराही संजय क्षीरसागर यांनी दिला.

# ई- पीक पाहणी त्वरीत करुन घ्या; महसूल प्रशासनाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ११ ऑगस्ट-**

शेतकऱ्यांनी स्वतःच्या मोबाईलद्वारे ७/१२ उताऱ्यावर शेतात लागवड केलेल्या खरीप पिकांची नोंदणी १ ऑगस्ट २०२५ पासून सुरू झाली आहे. महाराष्ट्र शासनामार्फत महसुल विभागाचा ई-पीक पाहणी प्रकल्प २०२१ पासून संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार या प्रकल्पात सुधारणा करून रब्बी हंगाम २०२४ पासून पीक पाहणी ही डिजिटल क्रॉप सर्वे प्रणालीद्वारे संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे.

सध्या खरीप हंगामातील पीक पाहणी कार्यवाही सुरू आहे. खरीप हंगाम २०२५ साठी ई-पीक पाहणी डीसीएस मोबाईल ॲपचे व्हर्जन ४.०.०. अद्ययावत स्वरुपात गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध करण्यात आले आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी पचे अपडेट करून घ्यावे. खरीप हंगामातील शेतकरी स्तरावरील पीक पाहणी १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर या कालावधीत तर सहाय्यक स्तरावरील पीक पाहणी १५ सप्टेंबर ते २९ ऑक्टोबर २०२५ कालावधीत राबविण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांनी शक्य तितकी पीक पाहणी स्वतः पुर्ण करावी. पीक पाहणी दरम्यान काही अडचणी आल्यास, संबधित गावकामगार तलाठी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच खरीप २०२५ ची पीक पाहणी सर्व शेतकरी बांधवांनी शासनाने दिलेल्या विहित मुदतीत पुर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

# भटक्या विमुक्त समाजातील नागरिकांचे परिश्रमातून शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज दि ११ ऑगस्ट-**

मोहोळ तालुक्यातील नरखेड भागातील भटक्या विमुक्त समाजातील वंचित घटकातील गोरगरीब जनतेला 'पंतप्रधान अन्न सुरक्षा योजना' धान्य मिळण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या निर्देशानुसार व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, तहसीलदार सचिन मुळीक, गटविकास अधिकारी विवेक जमदाडे यांच्या आदेशानुसार संजीव खिलारे यांच्या अथक परिश्रमातून शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

अनेक नागरिकांचे जन्म दाखले नसल्याने त्यांना कोणताही लाभ मिळत नसल्याचे सर्वेक्षणातून समोर आले. व भटक्या समाजाला पंतप्रधान अन्नसुरक्षा योजनेचे धान्य मिळावे व त्यांना मूलभूत सोयी सुविधा मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केले आहेत. यावेळी भाजपा महाराष्ट्र राज्य परिषदेचे सदस्य संजीव खिलारे, गुरुराज तागडे, सरपंच बाळासाहेब मोटे, ग्रामसेवक तात्यासाहेब नाईकनवरे, मंडळ अधिकारी किसन दळवे, तलाठी विलास मोटे, महेश राऊत, सुधीर पाटील,विलास पवार शासकीय कर्मचारी उपस्थित होते.

# जलसंपदामंत्री विखे-पाटील यांच्या हस्ते पडसाळी पंपगृहाचे उद्घाटन

## पंपगृहाची घेतली माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प योजना क्रमांक दोन अंतर्गत पडसाळी येथे उभारण्यात येणाऱ्या पंपगृहाचे पूजन व उद्घाटन जलसंपदा विभागाचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी पंपगृहाच्या कामाची सखोल माहिती घेऊन पाहणी केली.

याप्रसंगी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) चे उपाध्यक्ष तथा आमदार राणा जगजीतसिंह पाटील, दत्ताभाऊ कुलकर्णी, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता श्री. थोरात, कार्यकारी अभियंता अमोल नाईक आदी मान्यवर उपस्थित होते. मंत्री विखे पाटील यांनी प्रथम सिंचन प्रकल्पाच्या कामांची सविस्तर पाहणी



केली. कृष्णा मराठवाडा योजनेतील टप्पा क्रमांक दोन अंतर्गत पडसाळी येथे उभारण्यात येणाऱ्या पंपगृहाचे पूजन विधिवत पार पडले. प्रकल्पाच्या कार्यपद्धती, प्रगती आणि भविष्यातील लाभधारक क्षेत्राचा आढावा घेण्यात आला. या प्रकल्पामुळे सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना स्थिर व भरपूर पाणी मिळणार असून, शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे.

# अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**वेळापूर, दि. ११ ऑगस्ट-**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त खंडाळी-दत्तनगर येथे जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा या विचारधारेचा जागर प्रसार करण्याच्या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खंडाळी येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत शालेय बॅग वाटप करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रघुनाथ पांढरे गट विकास अधिकारी माळशिरस, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब धाइंजे, विक्रम पराडे, सुषमा महामुनी, काकासाहेब जाधव, मिलिंद सरतापे, भाऊसाहेब गोसावी, बाबुराव पताळे पाटील, भक्ती नाचणे, राजेंद्र उकिरडे, विनोद थिटे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन मार्गदर्शन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती, खंडाळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सुळेवाडी स्मशानभूमीची दुरवस्था

## नागरिकांना मरणानंतरही भोगाव्या लागताहेत यातना

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ११ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी हे सोलापूर जिल्हयातील शेवटच्या टोकाचे गाव ,हे गाव जरी दुष्काळी असले तरीही हे तालुक्यातील अधिकाऱ्यांचे गाव म्हटलं तरी वावगे ठरणार नाही कारण याच गावातील अनेक वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ मोठ्या पदावर कार्यरत आहेत. पण या गावात तशया अजुन रस्ते किंवा इतर बाबतीत म्हणाव्या अश्या सुधारणा झाल्याच नाहीत.



या गावातील अनेक कुटुंबातील लोक वसई,मुंबई, पुणे किंवा इतर ठिकाणी नोकरीला किंवा व्यवसायासाठि जातात .त्यामुळे घरी मोजकेच लोक असतात. याठिकाणी गावाच्या दक्षिण बाजुला स्मशानभूमी आहे या पण स्मशानभूमीकडे जाणयासाठी गेल्या अनेक वर्षापासून रस्ताच नाही. सदरच्या स्मशानभूमीकडे जाणयासाठी सर्व्हे नंबरने कायमस्वरूपी रस्ता काढणे आवश्यक आहे.

तर या स्मशानभूमी मध्ये प्रचंड काटेरी झाडे-झुडपे वाढली आहेत.तर याठिकाणी लाईटचहि सोय नाही. यामुळे जर का रात्री - अपरात्री मयत झाले तर त्यावर अंत्यसंस्कार कसे करायचे हा गहण प्रश्न अद्यापही सुळेवाडी करांपुढे आहे. खरेतर जिल्हा परिषद असो की ग्राम पंचायत कडे असणारा पंधरावा वित्त आयोग असो यातुन स्मशानभूमीचे काम करता येते .जिल्हा परिषद सुदधा स्मशानभूमीसाठि स्वतंत्र निधी देते तरीही याठिकाणी सुळेवाडी येथील स्मशानभूमीचि दुरावस्था का असा प्रश्न सुळेवाडी येथील सुजाण नागरिक प्रशासनाला विचारत आहेत. सुळेवाडी येथील स्मशानभूमी रस्ता, लाईटचि सोय व झाडे झुडपे काढुन मरणानंतरच्या यातना ताबडतोब थांबवाव्यात अशी मागणी सुळेवाडीचे युवा नेते विक्रम सुळे यांनी निवेदनाद्वारे माळशिरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे अन्यथा सुळेवाडी येथील नागरिकांना आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करावे लागेल असा इशारा त्यांनी दिला आहे.

# मडिखांबेंच्या सतर्कतेने मैंदर्गीत पुरामधून कर्मचारी सुखरुप बाहेर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ११ ऑगस्ट-**

तालुक्यातील मैंदर्गी व हालहळ्ळी जवळ बोरी नदीवर चेन्नई सूरत मार्गचे काम चालु असलेल्या ठिकाणी अचानक आलेल्या पाण्यामुळे कामावरील कामगार अडकल्याचे रिपाइं तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांना मिळताच तहसिलदार विनायक मगर यांना फोन करुन उपाययोजना करण्याची विनंती केल्यामुळे तात्काळ संबंधित पोलिस,तलाटी,सर्कल यांना पाठवून मदत कार्य सुरु करण्यात आली. अविनाश मडिखांबे यांच्या एका फोनमुळे हवालदार जगदीश राठोड,गाव कामगार तलाटी विलास घाटे व सूरत चेन्नई संबंधित कंत्राटदारचे सुप्रवायजर यांना तहसिलदार मगर यांनी तात्काळ पाठवले.त्यात बोरोटीचे यल्लप्पा कांबळे यांच्या मोटार सायकल सह अडकलेल्या कामगार सुखरुप बाहेर काढण्यात यशस्वी झाली आहे.तरी या मार्गावरुन ये-जा करण्याऱ्यांनी सावधान व सतर्क रहाण्याचे आव्हानही मडिखांबे यांनी केली आहे.

# रक्तदान हेच खरे श्रेष्ठदान : उद्योजक चंडक

**तभा वृत्तसेवा,**
**द.सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही.जी. शिवदारे संकुलामध्ये सहकार महर्षी कै. वि. गु. शिवदारे स्मृती समारोह सप्ताहाच्या निमित्ताने लायन्स क्लब ऑफ सोलापूर व रोटरी क्लब ऑफ सोलापुर नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबीर संपन्न झाले.




रक्तदात्यांना संबोधित करताना ज्येष्ठ उद्योजक माननीय किशोर चंडक जी म्हणाले की, रक्तदान हे खरे श्रेष्ठ दान आहे .भारतीय संस्कृती नेहमीच सर्व प्रकारच्या दान व ज्ञानाची संस्कृती राहिलेली आहे. आपल्या रक्तदानाने आपण एखाद्या माणसाचा जीव वाचवू शकतो .यासारखे दुसरे पुण्य नाही म्हणून सर्वांनी रक्तदान करणं हीच खरी समाजसेवा आहे. संस्थेचे विश्वस्त माननीय प्रा. बी.व्ही. शेटे म्हणाले की, सर्वात पुण्याचं काम म्हणजे रक्तदान आहे. त्यासाठी सर्व युवकानी या पवित्र कार्यास सामील होऊन देशसेवा करावी. या शिबिरामध्ये ७८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी नंदा लाहोटी, रोटे संतोष सपकाळ, राधिका सोनी , युगंधर जिंदे, लायन्स क्लब ऑफ सोलापूर व रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ चे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे चेअरमन माननीय राजशेखर शिवदारे, नरेंद्र गंभीरे, सुभाष मुनाळे, अण्णासाहेब कोतली, सिद्ध संघ प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्राध्यापक एम. बी.पाटील क्रीडा संचालक यांनी केले तर आभार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस .सुत्रावे यांनी मानले.

# चांगल्या परताव्याचे आमिष दाखवत ९८ लाखांचा गंडा

## इंजिनियरची पोलिसात धाव..!

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.११ ऑगस्ट-**

अक्कलकोट येथील प्रसिद्ध सुशिक्षित इंजिनिनियर यांना भांडवली बाजारात पैशाची गुंतवणुक करून मोठा परतावा देण्याचे अमिष दाखवित विश्वास संपादन करून चक्क ९८ लाख पेक्षा अधिकची रक्कम गुंतवणुकीच्या नावाखाली प्राप्त करून परतावा मागणी वेळेस १० टक्के रक्कम भरण्याची मागणी केल्याने चक्क फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे.

ही घटना लक्षात आल्याने सुशिक्षित इंजिनियरने पोलीसात फिर्याद दाखल केली आहे. याची व्याप्ती किती आहे याचा उलगडा करणे पोलीसांसमोर मोठे आव्हान आहे. यामुळे फसवणुक झालेल्यांनी पुढे येऊन तक्रार दाखल करणे गरजेचे आहे.

चांगला परतावा मिळवून देतो म्हणून ऑनलाइन ॲपवर सोशल मीडिया ग्रुपवरून गुंतवणूक करायला लावले. त्याचा परतावा न देता अक्कलकोटच्या सिव्हिल इंजिनिअरची तब्बल ९८ लाख १९ हजार ४९९ रुपयांनी फसवणूक केली आहे. ही घटना १३ मार्च २०२५ ते १४ मे २०२५ या कालावधीत




घडली. याबाबत राजशेखर सिध्देश्वर बोधले (वय ४१, रा. सुभाष गल्ली, अक्कलकोट) यांनी फिर्याद दिली आहे. फसवणूक काळात अनोळखी व्यक्तीने सोशल ग्रुप आणि एका मोबाइल नंबरवरून फिर्यादीस कॉल व मेसेज करून त्यांची भांडवली बाजारात गुंतवणूक करून जास्तीत जास्त नफा मिळवून देतो, अशी माहिती दिली. त्यांची वरील रक्कम गुंतवणूक करून घेतली. त्याचा परतावा न देता तो देण्याकरिता आणखीन पैशांची मागणी केली. एकूण असे ९८ लाख १९ हजार ४९९ हजार रुपये रुपयांची फसवणूक झाली, या कालावधीत फिर्यादीच्या बँक खात्यातून पैसे लुटले आहेत. अधिक तपास पोलिस निरीक्षक सुरेश चिल्लावर करीत आहेत.


# पंढरपूरहून अयोध्या-तिरुपती-वाराणसी रेल्वे सुरू करा

## शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.११ ऑगस्ट-**

शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेच्या वतीने पंढरपूरचे स्टेशन मास्तर यांच्याकडे तीर्थक्षेत्र पंढरपूर मधून तीर्थक्षेत्र पंढरपूर ते तीर्थक्षेत्र अयोध्या, तीर्थक्षेत्र पंढरपूर ते तीर्थक्षेत्र तिरुपती बालाजी, तीर्थक्षेत्र पंढरपूर ते तीर्थक्षेत्र वाराणसी या तिन्ही ठिकाणी आठवड्यातून एकदा रेल्वे गाडी सुरू करण्यात यावी अशी मागणी शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेना प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी श्री बाबा हरी मठाचे महंत श्री विठ्ठलगिरी महाराज, श्री चौरंगीनाथ मठाचे विश्वस्त श्री योगी रवीनाथ महाराज, शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना शहर प्रमुख श्रीनिवास उपळकर, समाजसेवक गणेश भिंगारे, नागेश लिगाडे, माऊली कोळी, विशाल डोंगरे आदी उपस्थित होते.

तीर्थक्षेत्र पंढरपूर ते तीर्थक्षेत्र अयोध्या, तिरुपती बालाजी, वाराणसी रेल्वे गाडी सुरू करावी अशी मागणी बऱ्याच वर्षांपासून भाविक भक्त व वारकरी करीत होते याची दखल घेत पंढरपूर शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेनेच्या वतीने मागणी करण्यात आली. या तिन्ही ठिकाणी भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने, रेल्वेची सोय झाल्यास प्रवासाला सुलभता येईल. त्याच बरोबर या तिन्ही ठिकाणांना धार्मिकदृष्ट्या खूप महत्त्व आहे. त्यामुळे तीर्थक्षेत्र पंढरपूर, तीर्थक्षेत्र अयोध्या, तीर्थक्षेत्र तिरुपती बालाजी, तीर्थक्षेत्र वाराणसी या ठिकाणी जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. रेल्वेची सोय झाल्यास, त्यांना सोयीस्करपणे प्रवास करता येईल. आणि चार ही तीर्थक्षेत्र जोडली जातील, रेल्वेमुळे या भागामध्ये आर्थिक विकासही होईल. पंढरपूर हे भारताची दक्षिण काशी तसेच महाराष्ट्र व वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत श्री.विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आहे. अयोध्या हे श्री प्रभू रामचंद्रांचे जन्मस्थान आहे. वाराणसी हे शिव-शक्तीचे स्थान असून बारा ज्योतिर्लिंगापैकी एक काशी विश्वेश्वर हे ज्योतिर्लिंग आहे. तिरुपती बालाजी हे विष्णूचे मंदिर आहे. या चारही तीर्थक्षेत्रांना रेल्वेने जोडल्यास, भाविकांची सोय होईल आणि या भागांमध्ये पर्यटनालाही चालना मिळेल. यामुळे या तीन तीर्थक्षेत्रांना पंढरपूर मधून आठवड्यातून एकदा रेल्वेगाडी सुरू करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.



CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बार्शीत १७ हजार दुबार मतदार? चौकशीची शिवसेना(उबाठा) गटाची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.११ ऑगस्ट-**

बार्शी विधानसभा मतदारसंघामध्ये लोकसभा निवडणुकीनंतर ते विधानसभा निवडणुकीपर्यंत पाच महिन्यांच्या कालावधीमध्ये साधारणतः १७ हजार २१४ दुबार मतदार आढळून आले आहेत त्याचबरोबर मयत मतदार यांची नावे कमी केलेली नाहीत. तसेच १८ वर्षांखालील युवकांचे



नावे मतदार यादीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या लेटर हेडवर रहिवाशी दाखला देऊन, वयाची व इतर कागदपत्रे बनावट तयार करुन ऑनलाईन मतदार नोंदणी केल्याचे आढळून आले. या सर्व बाबींचा विचार करुन लवकरात लवकर निर्णय घेऊन सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सखोल चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. त्यासंबंधीचे निवेदन देण्यात आले. यावेळी युवासेना जिल्हा सचिव दिपक तिवाडी, युवासेना विस्तारक ॲड.हेमंत रामगुडे, ॲड.पांडुरंग घोलप, अर्जुन सोनवणे, राहुल बुरसे उपस्थित होते.

## महत्त्वाचे



### श्री गुरु मुक्तेश्वर महाराजांची अकलूज येथे ईस्ट लिंग पूजा

**अकलूज, दि. ११ ऑगस्ट-**

अकलूज येथील शिवभक्त विठ्ठल रामचंद्र बागल यांच्या घरी श्रावणी तिसऱ्या सोमवार निमित्त वेळापूर मठाधिपत शिवाचार्यश्री गुरु मुक्तेश्वर महाराज यांची ईस्टलिंग महापूजा (बिनीवा) मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला सुमारे तीन तास हे पूजन चालू होते यजमान ज्ञानेश्वर विठ्ठल बागल व रतन ज्ञानेश्वर बागल यांनी महाराजांची पाद्यपूजा करून पूजन केले पूजेसाठी मुळे गुरुजी, आप्पा वाळके व वेळापूर मठातील बटू यांनी सहकार्य केले. याप्रसंगी बागल कुटुंबातील प्रमुख विठ्ठल बागल, कुसुम बागल, भारत बागल, संगीता बागल, शिवाजी बागल, पार्वती बागल यांचे बरोबर चंद्रकांत कुंभार व शामा चंद्रकांत कुंभार उपस्थितीत होते. या पूजेचा लाभ परिसरातील अनेक शिवभक्तांनी घेतला पूजेनंतर महाप्रसाद झाला. यावेळी श्री गरु मुक्तेश्वर महाराज यांच्या गुरू गादीस ५० वर्षे पूर्ण होत असून त्यांचा ७५ वा वाढदिवस आहे मार्च महिन्यामध्ये आहे. याचे औचत्य साधून जगद्गुरु रंभापुरी महाराज व जगद्गुरु उज्जैनचे महाराज यांना निमंत्रित करण्यात येणार असल्याचे विठ्ठल बागल यांनी सांगितले त्याच बरोबर या कार्यक्रमाचे नियोजन बाबत चर्चा करण्यात आली.



### जलसंपदा मंत्री विखे-पाटलांचे झाले 'उत्तर'मधील गावोगावी स्वागत

**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील उत्तर सोलापूर येथील गावडी दारफळ पडसाळी उपसा सिंचन येजनेच्या पंपगृहचे पूजन व पाहणी करण्यासाठी आले असता भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार यांनी स्वागत केले. यावेळी मंत्री महोदयांचे कारंबा, नान्नज, वडाळा, पडसाळी, गावडी, दारफळ, मार्डी येथे भजपा कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्याकडून स्वागत करण्यात आले. यावेळी तुळजापूरचे भाजपा आमदार राणाजगजितसिंह पाटील तसेच उत्तर सोलापूर भाजपा तालुकाध्यक्ष संभाजी दडे तसेच मार्डी येथे रूक्मिणीदेवी पतसंस्था मार्डी येथे भेट दिली. त्याप्रसंगी रूक्मीणीदेवी पतसंस्थेत चेअरमन इंद्रजित पवार यांनी केले. व्हाईस चेअरमन कम लाकर माने, माजी भाजपा तालुकाध्यक्ष काशिनाथ कदम, युवराज पवार, कदीर कुडले, श्रीकांत वैदकर, गणेश पवार, प्रभाकर फुलसागर, अंबीर बोंगे, संभाजी पवार, रुकमोद्दीन शेख, शिवाजी सोनार, तात्या नागणकरे, अझहर शेख, अमर पवार, पांडुरंग पवार उपस्थित होते.



### सांगोला महाविद्यालयामध्ये सुरेश गाडेकर यांचा सन्मान

**सांगोला, दि. ११ ऑगस्ट-**

सांगोला येथील सांगोला महाविद्यालयातून बी.सी.एस व एम.एस्सी संगणक शास्त्राची पदवी प्राप्त केलेले सुरेश तुकाराम गाडेकर यांचे पाल्य विराज गाडेकर याने आय.आय.टी. जेइइ ॲडव्हान्स एआयआर अखिल भारतीय तंत्रशिक्षण गुणवत्ता यादीमध्ये १८९७ नंबरवर आहे. जेइइ मेन्स परीक्षेत ९९.६३ टक्के गुण मिळाले आहेत. विराज गाडेकर सध्या गुजरात येथे शिक्षण घेत आहे. त्याच्या या मिळालेल्या यशाबद्दल संस्थेचे सदस्य म.सि.झिरपे, सुरेश फुले, प्र.प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षिकेत्तर कर्मचारी यांनी सुरेश गाडेकर यांचा सन्मान केला.

### जिव्हाळा मागासवर्गीय संस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन

**बार्शी, दि. ११ ऑगस्ट-**

जिव्हाळा बहुउद्देशीय मागासवर्गीय संस्थेच्या कार्यालयाचे उदघाटन व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंतीनिमित्त खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी उद्योजक विनय संघवी, डॉ. राहुल मांजरे-पाटील, बार्शी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, प्रा. जे.टी जाधव, जिव्हाळा संस्थेच्या संचालक मंडळातील बब्रुवान धावारे, राजु थोरात, युवराज वाघमारे, निलेश खुडे आदी उपस्थित होते.


## भाजपातर्फे हर घर तिरंगा अभियान राबविणार

■ चेतनसिंह केदार-सावंत यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.११ ऑगस्ट-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात कार्यक्रमामध्ये हर घर तिरंगा अभियान साजरा करण्याबाबत केलेल्या आवाहनानुसार भाजपतर्फे दि.१३ ते १५ ऑगस्ट दरम्यान हर घर तिरंगा हे अभियान मोठ्या उत्साहात साजरे केले जाणार आहे. क्रांतीदिनापासून ते स्वातंत्र्यदिनापर्यंत प्रत्येक घर, दुकान व कार्यालयावर राष्ट्रध्वज लावण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली या अभियानातील कार्यक्रमांचे



आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांना त्यांच्या घरावर तिरंगा लावण्यासाठी प्रेरित करण्याचा संकल्प भाजपच्या वतीने करण्यात आला आहे. देशप्रेमाचे वातावरण निर्माण होण्यासाठी, देशप्रेमाची भावना जागृत होण्यासाठी दि.९ ऑगस्टच्या क्रांतीदिनापासून ते स्वातंत्र्यदिनापर्यंत प्रत्येक घर, दुकान व कार्यालयावर राष्ट्रध्वज लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अधिकाधिक लोकसहभागासाठी बूथ स्तरापर्यंतचे कार्यकर्ते जनजागृतीवर भर देणार आहेत. शाळा, महाविद्यालयांशी संपर्क साधून ध्वजारोहणासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. दि.११ ते १४ ऑगस्ट या काळात पक्ष संघटनेच्या प्रत्येक मंडलात तिरंगा यात्रा होणार आहेत. दि.१२ ते १४ ऑगस्ट दरम्यान महापुरुषांचे स्मारक, पुतळा परिसर, स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मारक परिसराची स्वच्छता करण्यात येणार आहे. देशभक्तीपर गीत, तिरंगा यात्रा, मेळावे, सार्वजनिक ठिकाणी होर्डिंग लावून देशभक्तीचा प्रचार व वातावरण निर्मिती करण्यात येणार आहे. दि.१४ ऑगस्ट रोजी विभाजन विभीषिका दिवस साजरा करण्यात येणार आहे. तसेच घरोघरी तिरंगा फडकवणे, महापुरुषांच्या स्मारक, पुतळ्यांची स्वच्छता, फाळणी विभीषिका स्मृतिदिन अशा विविध कार्यक्रमांचा समावेश असल्याची माहिती चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

## एसटी फसली चिखलात; प्रवाशांचे हाल मोडनिंब बसस्थानकातील प्रकार

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ११ ऑगस्ट-**

मोडनिंब (ता.माढा) येथील बस स्थानक परिसरात रविवार (दि. १०) एसटी बस गाळात रुतली. वाहक व चालकांनी अथक प्रयत्न करूनही रुतलेली बस हलता हलेना. महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांत ताळमेळ नसल्याने एसटी प्रवाशांवर पश्चात्तापाची वेळ आली आहे. या ठिकाणी चिखलात एसटी बस फसली. सुमारे तासाभरानंतर जेसीबीच्या सहाय्याने एसटी बस चिखलातून बाहेर काढण्यात आली. यामुळे सुमारे तासभर प्रवाशांना उशीर झाला. तासभर वाट पाहून चालकाने प्रवाशांना इतर गाड्यांत बसवून पाठविले. शासनाच्या विविध विभागांचा एकत्रित गोंधळ प्रवाशांच्या पश्चात्तापास कारणीभूत ठरत आहे. उजनीहून सोलापूर महापालिकेसाठी जलवाहिनीचे काम नुकतेच पूर्ण झाले. मोडनिंब बस स्थानक परिसरात जलवाहिनीने अनेक वळणे घेत प्रवास केला आहे. बस स्थानकामध्ये परिवहन



> मोडनिंब येथे अक्कलकोट बारामती बस येथील चिखलात फसली. चालक व वाहकांनी कुदळी, फावडी घेऊन रुतलेले टायर मोकळे करण्याचा प्रयत्न केला.अनेक प्रयत्न करूनही बस जागची हलेना.चालक वाहकांच्या या प्रयत्नांना यश मिळत नसल्याचे पाहून स्वखर्चातून जेसीबीच्या साह्याने बस बाहेर काढून दिली.
>
> **-प्रशांत गिड्डे, मनसे जिल्हाध्यक्ष**

महामंडळाच्या गाड्यांची वर्दळ असते. जलवाहिनीचे काम झाल्यानंतर ती बुजवण्यासाठी कठीण मुरुमाऐवजी मातीचा वापर करण्यात आला. थोडासा पाऊस आला तरी या परिसरात चिखलाचे साम्राज्य पसरते. अक्कलकोट बारामती बस येथील चिखलात फसली. अनेक प्रयत्न करूनही बस जागची हलेना. चालक व वाहकांनी कुदळी, फावडी घेऊन रुतलेले टायर मोकळे करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो फोल ठरला. चालक वाहकांच्या या प्रयत्नांना यश मिळत नसल्याचे पाहून मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांनी जेसीबीच्या साह्याने बस बाहेर काढून दिली.



## २७ वर्षानंतरही लक्षात ठेवलात हे आमच्यासाठी सुखद

■ एस. एम. काळे : आचेगावात माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**आचेगांव, दि. ११ ऑगस्ट-**

दहावीनंतर २७ वर्षांनीसुद्धा माजी शिक्षकांना गुरुजनांना स्नेह -मेळाव्याच्या निमित्ताने बोलावून त्यांच्या प्रती आदर व्यक्त करणे हे आम्हा शिक्षकांचे परमभाग्य असल्याची भावना श्री शावरसिद्ध हायस्कूल आचेगांवचे माजी मुख्याध्यापक एस. एम. काळे यांनी व्यक्त केले.

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री स्वामी समर्थ सेवा मंडळ सभागृहात आयोजित आचेगांव श्री शावरसिद्ध हायस्कूलच्या १९९७-९८ च्या माजी शिक्षक, विद्यार्थी स्नेहमेळावा प्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रपंचाकडे लक्ष देऊन व्यसनापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणे आपण समाजाचे काही देणं लागतो म्हणून समाजकार्य देखील करण्याचा प्रयत्न करा असा सल्लाही श्री. काळे यांनी दिला. यावेळी माजी पर्यवेक्षक लिंबण्णा दुलंगे, शिवशरण म्हेत्रे, इराप्पा कांबळे, कलप्पा तळवार, शिवाजी साबळे, दाजी माने, रेवणसिद्ध पाटील, मुख्याध्यापक इब्राहिम बिराजदार, पर्यवेक्षक बसवराज पाटील, अमीन पाटील, बाबुराव जाधव, शावरसिद्ध म्हेत्रे आदी आजी-माजी शिक्षक उपस्थित होते. यावेळी लिंबण्णा दुलंगे, शिवशरण म्हेत्रे, शिवाजी साबळे, इराप्पा कांबळे, रेवणसिद्ध पाटील, कलप्पा तळवार आदी शिक्षकांनी व डॉ रवींद्र बनसोडे, सैपन शेख, सुभाष भीमाण्णवरु, बलवान गोतसुर्वे, अनिल बर्वे, लक्ष्मण म्हेत्रे, मडीवाल कलशेट्टी, श्रीशैल तीर्थकर, शोभा सोनकडे, जगदेवी मायनाळे, राजभाई कारंजे आदी माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रतिमा पूजन व द्विपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. सुभाष भिमण्णवरु यांनी प्रास्ताविक केले. माजी शिक्षकांचा स्मृतीचिन्ह, शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. या स्नेह मेळाव्यातील 'एक दिवसीय शाळेत' सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपले परिचय आपल्या शिक्षकांना गुलाब पुष्प देऊन केला व त्यातील काहींनी आपले कलागुण सादर केले, तब्बल २७ वर्षांनी आपल्या माजी शिक्षकांना व मित्रांना भेटण्याचा योग आल्याने सर्वांचा आनंद गगनात मावत नव्हता. माजी शिक्षक साबळे यांचे गीत आणि इतर शिक्षक विध्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून जुन्या आठवणीना उजाळा दिला. विध्यार्थीदशेत एक तास लवकर संपत नव्हता पण २७ वर्षांनी भरलेली 'एक दिवसीय शाळा' सकाळ पासून सायंकाळ पर्यंत भरून सुद्धा फार लवकर संपल्याची भावना सगळ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती. सूत्रसंचालन बलवान गोतसुर्वे यांनी केले तर आभार अनिल बर्वे यांनी मानले.

## पंढरपूर येथील 'नटराज'च्या नृत्यकांनी जिंकली सोलापुरकरांची मने

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.११ ऑगस्ट -**

सोलापूर येथील संस्कारभारती महानगर सोलापूर व सर्व शास्त्रीय नृत्य संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त कृष्णरंग हा शास्त्रीय नृत्याचा कार्यक्रम सोलापूर येथील श्री शिवछत्रपती रंगभवन येथे संपन्न झाला. यामध्ये पंढरीतील लक्ष्मी बडवे संचलीत नटराज नृत्य संस्थेच्या श्रीया बडवे, श्रीशा देशपांडे, श्रुती कुलकर्णी, सृष्टी बजाज, श्रिया पाटील, श्रुती चौधरी, तनिषा कुसुरकर, रागिनी ठिगळे, ओवी कोठारी, समृद्धी मामालाया या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

या कार्यक्रमात विविध गावातील ३० संघातून सुमारे १५० विद्यार्थी सहभागी झाले होते. या कलाविष्कारात जान्हवी पुजारी दुदगीकर, श्रेया बडवे व श्रीशा देशपांडे यांच्या विविध आदांवर प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात प्रचंड दाद दिली.

या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील आचार्य शाहीर हेमंतराजे पु. मावळे, स्वाती दातार, सांगली येथील हेमंत मराठे, तर सोलापूर येथील उद्योजिका सुहासिनी शहा उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. ईरेश स्वामी, श्रीकांत कुलकर्णी, अनंत देशपांडे, ऋषिकेश पागे तसेच सोलापूर येथील नृत्य निरंजन भरतनाट्य अकॅडमीच्या संचालिक जान्हवी पुजारी दुदगीकर यांनी विशेष परिश्रम घेतले.





## पुण्यश्लोक अहिल्यादेवी विशेषांकाचे राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त उज्ज्वलकुमार माने यांनी संपादित केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी या विशेषांकाचे प्रकाशन तिरुवनंतपुरम् येथे केरळचे महामहीम राज्यपाल मा. श्री. राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते राजभवनात करण्यात आले.

अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याविषयी समग्र माहिती असणारे इतिहास संशोधक व अभ्यासक यांचे लेख या विशेषांकात आहेत. अहिल्यादेवींच्या जीवनकार्याची माहिती उज्ज्वलकुमार माने यांनी दिली. या कार्यक्रमाला सोलापूर येथील अश्विनी सहकारी रुग्णालयाचे संचालक अशोक लांबतुरे, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाच्या माजी सदस्या सुरेखाताई लांबतुरे, सामाजिक कार्यकर्ते मधुकर गवळी उपस्थित होते.

## निमगावच्या महोत्सवात १२० वावडी स्पर्धकांचा सहभाग; मान्यवरांची हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ११ ऑगस्ट-**

निमगाव (ता.माळशिरस) येथील पैलवान प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेल्या वावडी महोत्सवात झालेल्या स्पर्धेत १२० वावडी स्पर्धकांनी सहभाग घेतला. सकाळपासूनच खंडोबा मंदिरामागील मैदानावर स्पर्धकांचे आणि प्रेक्षकांची गर्दी झाली होती. स्पर्धेत खुल्या गटातील प्रथम क्रमांक महाराजा प्रतिष्ठान, शिवतांडव ग्रूप व ६५ ग्रूप ला विभागून देण्यात आला.

येथील खंडोबा मंदिराच्या पाठीमागील विस्तीर्ण माळरानावर या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेचे आयोजक पैलवान प्रतिष्ठानचे दत्ता मगर यांनी आवाहन केल्यावरून स्पर्धेला माळशिरसचे आमदार उत्तमराव जानकर, सहकार महर्षि साखर कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील, खासदारकन्या इशितादेवी मोहिते-पाटील, सदगुरू साखर कारखान्याचे उपाध्यक्ष बाळासाहेब कर्णवर उपस्थित होते. रील स्टार ऐश्वर्या जाधव स्पर्धेचे प्रमुख आकर्षण होते. ऐश्वर्या जाधवने प्रेक्षकांच्या मागणीनुसार भर पावसात दोन लावणीनृत्य सादर केले. तिच्यासोबत फोटो काढण्यासाठी मात्र युवकांनी गर्दी केली होती




स्पर्धेचे निकाल : १ ते ८ फूट पर्यंतचा छोटा गट : प्रथम क्रमांक विभागून मल्हार प्रतिष्ठान व बळीराजा ग्रूप, द्वितीय क्रमांक विभागून धर्मवीर प्रतिष्ठान व नाद लाल मातीचा, तृतीय क्रमांक विभागून सात मित्रांची व लेखणी सम्राट, चतुर्थ क्रमांक विभागून कुंभारराजे ग्रूप व शंभू राजे ग्रूप. ८ ते १२ फूट पर्यंतचा मध्यम गट : प्रथम क्रमांक विभागून ६५ शिवशंभू ग्रूप, मैत्री ग्रूप व महाराष्ट्र केसरी कुस्ती संघ, द्वितीय क्रमांक विभागून पवार तालीम, शैतान व भगव वादळ. तृतीय क्रमांक विभागून ६५ ग्रूप, सिंदुर व धर्मरक्षक. चतुर्थ क्रमांक विभागून धर्मवीर प्रतिष्ठान व नाईक साम्राज्य. १२ फुटा वरील खुला गट : प्रथम क्रमांक विभागून महाराजा प्रतिष्ठान, शिवतांडव व ६५ ग्रूप

द्वितीय क्रमांक विभागून विश्वकर्मा ग्रूप, होय हिंदूच, होलार गल्ली व मल्हार प्रतिष्ठान. तृतीय क्रमांक विभागून छत्रपती संभाजी राजे,श्री गणेश मंडळ व लहुजी साम्राज्य. चतुर्थ क्रमांक शिवमुद्रा ग्रूप. परीक्षक म्हणून भारत मगर,संभाजी मगर, रामचंद्र आसबे, संजय वाघमोडे, निलेश मगर, गोरख खराडे यांनी काम पाहिले.